सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# अखंड जनसेवेची शपथ!

**५ डिसेंबर २०२४ हा दिवस महाराष्ट्राच्या राजकारणात सुवर्ण अक्षराने कोरला जाणार यात शंका नाही. कारण महाराष्ट्रात भाजपा महायुतीने सत्ता स्थापन केली आणि देवेंद्र ३ पर्वाचा प्रारंभ झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री, देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री, देशातील बडे उद्योगपती, फिल्मस्टार यांच्यासह लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके ज्येष्ठ, लाडक्या शेतकर्यांसह लाडके मतदार, लाडके कार्यकर्ते अशा ४० हजार मान्यवरांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस यांचा ऐतिहासिक शपथविधी सोहळा गोरज मुहूर्तावर मोठ्या थाटात पार पडला. राजकीय चाणक्य ही बिरुदावली लोकांनी दिलेले फडणवीस यांनी केवळ मुख्यमंत्रीपदाचीच शपथ घेतली असे नव्हे तर लाडक्या देवाभाऊंनी अखंड जनसेवेची शपथ घेतल्याने महाराष्ट्रातील कोट्यवधी जनता सुखावली आहे.**

विशेष

**प्रशांत माने,** मुख्य संपादक
भ्र. ९८८११९१४४३

मोदी है तो मुमकिन है! आणि एक है तो सेफ है! हा नारा देत नूतन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' अशी घोषणा देखील केलेली आहे. राज्यासमोर मोठी आव्हाने असतानाही केवळ मुख्यमंत्री पदाचीच नव्हे तर अखंड जनसेवेची शपथ घेणारे लाडके मुख्यमंत्री फडणवीस यांचा कार्यकाळ महाराष्ट्रासाठी सुवर्णकाळ असणार यात शंका नाही.

आगामी पाच वर्षे केंद्र आणि राज्यात भाजपा युतीचे डबल इंजिन सरकार असल्याने हे शक्य असल्याचे सूर्यप्रकाशा एवढेच स्वच्छ आहे. विकसीत भारताच्या वाटचालीत महाराष्ट्राचेही मोलाचे योगदान असणार याचीही खात्री महाराष्ट्राच्या जनतेला आहे.

२०१४ ते २०१९ हा पाच वर्षाचा मुख्यमंत्रीपदाचा काळ यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर महाराष्ट्राच्या २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुका तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या पार पडल्या अन् भाजपाचे तब्बल १०५ आमदार विजयी झाले. भाजपा आणि शिवसेना (एकत्रित) युतीला महाराष्ट्राच्या जनतेने सत्तेचा कौल दिलेला असतानाही श्री. उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा विषय पुढे करून भाजपाची साथ सोडली अन् काँग्रेस- राष्ट्रवादीशी घरोबा केला. ठाकरेंचा हा घरोबा दोन्ही काँग्रेससाठी जणू राजकीय जीवदानच ठरला. उध्दव ठाकरेंनी काँग्रेसशी केलेला घरोबा एकनाथ शिंदे यांना पसंत पडला नाही तर काकांच्या निवृत्त न होण्याच्या हट्टामुळे अजित पवार नाराज होते. शिंदेंनी उध्दव ठाकरेंना तर अजितदादांनी काका शरद पवारांना कात्रजचा घाट दाखवला आणि भाजपाच्या आश्रयाला येत राज्याच्या सत्तेत महत्वाची पदं मिळवली. एकनाथ शिंदे मुखमंत्री तर अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. अडीच वर्षे महायुतीचे सरकार राज्यात चालले आणि २०२४ च्या एप्रिल- मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत केंद्रात भाजपाला म्हणावे तसे यश मिळाले नाही. महाराष्ट्र विकास आघाडीने राज्याच्या लोकांमध्ये रूजविलेल्या फेक नॅरेटिव्ह भाजपाच्या यशात महाराष्ट्रात आडवा आला. महाराष्ट्रातील ४८ पैकी ३० जागा महाविकास आघाडीने जिंकल्याने या यशाची हवा त्यांच्या डोक्यात शिरली. परंतु चाणक्य फडणवीसांनी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणकीपूर्वी असे काही डावपेच आखले की, महाविकास आघाडी चारीमुंड्या चित झाल्याचे राज्यातील निकालानंतर दिसून आले.

देवेंद्र फडणवीसांनी केवळ भाजपाचे १३२ आमदारच विजयी केले असे नाही तर सोबत असलेल्या महायुतीतील मित्रपक्षांच्याही शंभर आमदारांनाही विजयी केले अन् भाजपा महायुतीने महाराष्ट्रातील २८८ आमदारांपैकी तब्बल २३० इतक्या विक्रमी जागा मोठ्या मताधिक्याने जिंकल्या. मी पुन्हा येईन या आपल्या घोषणेला सिध्द करत देवेंद्र फडणवीस यांनी ५ डिसेंबररोजी तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. विशेष म्हणजे मुख्यमंत्री पदावरून उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्याची प्रेरणा देखील शिंदेंना फडणवीसांकडूनच मिळालेली असणार. शपथ घेताच अवघ्या काही वेळातच मंत्रिमंडळाची बैठक घेवून फडणवीसांनी जनसेवेला सुरुवात करून आपण मुख्यमंत्री पदाबरोबर अखंड जनसेवेचीही शपथ घेतल्याचे सिध्द केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना हे देखील स्पष्ट केले की, राज्याला सद्यस्थितीत सक्षम विरोधी पक्षनेता नसला तरी आम्ही विरोधकांच्या संख्याबळावर न जाता त्यांनाही योग्य तो सन्मान देणार आहोत. इतकेच काय तर त्यांनी मांडलेल्या योग्य प्रश्नांचाही मान राखला जाईल. आपल्यावर सातत्याने गंभीर टिका करणार्या विरोधकांना माफ करून राज्य विकासाच्या कारभारात विरोधकांनाही सहभागाची संधी देवू. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही भूमिका विरोधकांना पटो अथवा न पटो पण महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेला मात्र नक्कीच आवडलेली आहे. कारण ही भूमिका स्पष्ट करून फडणवीसांनी सुसंस्कारी राजकारणाचा धडाच जणू काही राजकारण्यांसमोर ठेवला आहे. मागील १० वर्षात राजकारणाचा घसरलेला दर्जा पाहता मुख्यमंत्री फडणवीसांची ही राजकीय भूमिका राजकारणाचा ढासळलेला दर्जा सुधारण्यास नक्कीच दिशादर्शक ठरणारी आहे.

महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी घोषणा देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर अनेक आव्हाने देखील आहेत. पण संकट समयी बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजेच फडणवीस हे ब्रीद असल्याने केंद्राच्या साथीने नक्कीच देवाभाऊ महाराष्ट्राला थांबू न देता विकासाच्या मार्गावर गतीने पळवतील हे नक्की. वास्तविक पाहता आगामी पाच वर्षात राज्यातील भाजपा महायुती सरकारसमोर काही महत्वाची आव्हाने असून ती समन्वयाने आणि केंद्राच्या मदतीने हाताळणे देखील महत्वाचे आहे. बांग्लादेशी आणि रोहिंग्यांची घुसखोरी थांबवणे. गायब होणार्या मुलींची वाढती संख्या पाहता लव्हजिहाद सारखा गंभीर प्रश्न. युसीसी म्हणजेच युनिफार्म सिव्हिल कोड महाराष्ट्रात अंमलबजावणी करणे कारण उत्तराखंड राज्याने अंमलबजावणी केलीय तर गुजरात, आसाम, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांनी अंमलबजावणीसाठीच्या दिशेने पावले उचलली आहेत. १९६० साली स्थापन झालेल्या वक्फ बोर्डाकडे गेल्या ६४ वर्षात एक लाख एकर जमीन कशी आली आहे. गडकिल्ल्यांवरील दर्गे, अतिक्रमणे हा गडजिहादचा गंभीर प्रश्न, सामाजिक आराजकता, मराठा आरक्षण, विरोधाला विरोध म्हणून विकासालाही विरोध करणारे विरोधक, शेतकरी आत्महत्या, सरकारी तिजोरीवरील भार कमी करण्यासह विकसित भारताच्या वाटचालीत महाराष्ट्राचे योगदान देणे आदी आव्हाने देखील राज्यातील नूतन महायुती सरकारला यशस्वीपणे हाताळावी लागणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता, विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता, जनसंघ-भाजपाच्या परंपरेचे पालन करणारा पाईक, बूथलेव्हलपासून पक्षाचे काम करणारा तळमळीचा कार्यकर्ता अन् महापौर पदापासून राजकीय सुरुवात करणारा आणि उत्कृष्ठ संसदपटू अशी ख्याती मिळवणारा सुसंस्कारी प्रसंगी सभ्यता पाळून समोरच्या टिकाकाराला योग्य जागा दाखवणारा राजकारणी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी तिसर्यांदा विराजमान झाला आहे. महाराष्ट्राची नस ओळखणारा राजकारणी म्हणून शरद पवारांची ओळख आहे अन् ती रास्त देखील आहे. पण आता या पंक्तित देवेंद्र फडणवीस यांचेही नाव नक्कीच आलेले आहे. पक्ष आदेश येताच उपमुख्यमंत्रीपद स्वीकारून पक्षनिष्ठा म्हणजे काय असते हा राजकीय यशाचा फंडाच जणू फडणवीसांनी आपल्या पक्षातील नेते, कार्यकर्त्यांसह विरोधी पक्षांनाही दिला आहे. पक्ष फोडले म्हणून टाहो फोडण्यापेक्षा पक्ष का फुटले याचे वास्तव आत्मपरीक्षण करण्यापेक्षा 'रस्सी जल गयी मगर बल नही गया' या म्हणीप्रमाणे वागणाऱ्या राजकारण्यांनीही आता नव्या राजकारणाच्या नांदीला प्रारंभ करावा लागणार आहे. असो विरोधकांनी जनसेवेसाठी प्रामाणिकपणे विरोधकांची भूमिका पार पाडावी तर सत्ताधाऱ्यांनी मतदारांच्या प्रचंड मताधिक्याचा मान राखूनच महाराष्ट्राच्या विकासाचे राजकारण करावे. म्हणजे महाराष्ट्रातील कोट्यवधी मतदारांनी दिलेला मतांचा कौल सत्कारणी लागणार आहे.

केंद्रातील मोदी सरकार अन् राज्यातील फडणवीस सरकार यांची आगामी पाच वर्षाच्या कार्यकाळातील विकासाची घौडदौड अशी असेल की, देश आणि महाराष्ट्रातील मायबाप जनता म्हणेल हेच रामराज्य देशावर कायमस्वरुपी असावे...तथास्तु...

**शेख हसीना यांचे सरकार कट्टरतावाद्यांनी उलथवल्यापासून ते आजतागायत बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराचे सत्र थांबण्याची चिन्हे नाहीत. बांगलादेशातील काळजीवाहू सरकारचे प्रमुख असलेल्या मोहम्मद युनूस यांची याविषयीची हतबलता आणि निष्क्रियता ही यासाठी सर्वस्वी कारणीभूत. बांगलादेशातील 'सनातन जागरण मंचा'चे प्रवक्ता आणि 'इस्कॉन'चे चिन्मय कृष्ण दास प्रभु यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. त्यानंतर बांगलादेशमधील हिंदू मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले असून, त्यांनी युनूस सरकारच्या हिंदूविरोधी धोरणांना विरोध दर्शविला आहे.**

# हिंदूशक्ती युगे युगे...

लक्ष्यवेध

विजय कुलकर्णी

'प्रभू प्रणोम' असे अत्यंत आदबीने आणि चेहऱ्यावर स्मित करत हिंदू बांधवांना प्रेमाने अभिवादन करणारे चिन्मय कृष्ण दास. बांगलादेशातील हिंदूंमध्ये चिन्मय हे त्यांच्या कीर्तनांसाठी आणि अध्यात्मिक उपदेशांसाठी सुप्रसिद्ध. चितगांवच्या 'पुंडरिक धाम'चेही ते प्रमुख. पण, बांगलादेशात हिंदूंच्या न्याय्य-हक्कांसाठी आणि हिंदूहितासाठी आंदोलन केले म्हणून त्यांच्यावर चक्क देशद्रोहाचा ठपका ठेवण्यात आला.

एवढेच नव्हे, तर सरकारविरोधी आंदोलनात चिन्मय कृष्ण दास यांनी भगवा ध्वज फडकावला, हादेखील तेथील कट्टरतावाद्यांच्या हातातले बाहुले असलेल्या सरकारच्या दृष्टीने राजद्रोह! यावरून बांगलादेशातील वातावरण हिंदूंसाठी किती असुरक्षित आणि धोकादायक आहे, याचीच प्रचिती यावी. ऑगस्ट महिन्यात शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर बांगलादेशात झालेल्या हिंदूंवरील अनन्वित अत्याचाराची तर गणतीच नाही. हिंदूंची घरे, दुकाने, शेती अशी दिसेल ती मालमत्ता आगीच्या तोंडी देऊन, हिंदूंचे रक्तही सांडण्यात आले.

हिंदू आयाबहिणींच्या अब्रूवरही या इस्लामी





कट्टरतावाद्यांची वक्रदृष्टी पडली. परिणामी, कित्येक हिंदूंना त्यातल्या त्यात सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याची वेळ आली. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यापेक्षा युनूस सरकारने 'जमात-ए-इस्लामी'सारख्या कट्टरतावादी संघटनांना वेळोवेळी पाठीशी घातले. एवढेच नाही, तर हिंदूंवरील अत्याचार हा केवळ प्रपोगंडा असल्याचे धक्कादायक मत काही दिवसांपूर्वीच युनूस यांनी व्यक्त केले होते. यावरून त्यांचा या सगळ्या प्रकरणांकडे बघण्याचा दृष्टिकोन हा हिंदूद्वेषाने किती कलूषित आहे, याचीच कल्पना यावी. म्हणूनच चितगांवमध्ये हजारो हिंदूंना घेऊन आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या चिन्मय कृष्ण दास यांच्यावर युनूस सरकारने कारवाईचा बडगा उगारला.

त्यांना ढाका विमानतळावर उतरताच अटक करण्यात आली. त्यांच्यावर बांगलादेशच्या राष्ट्रध्वजाचा अपमान केल्याचा ठपकाही ठेवण्यात आला. तसेच न्यायालयाने त्यांचा जामीनही तातडीने नाकारला. त्यामुळे सध्या चिन्मय कृष्ण दास तुरुंगात असून, त्यांच्या समर्थनार्थ हिंदू बांधव ठिकठिकाणी रस्त्यावर उतरले आहेत. पण, शांतपणे आंदोलन करणाऱ्या हिंदूंवरही बांगलादेशातील पोलिसांनी दडपशाही चालवली असून, लाठीचार्ज केल्याच्या घटना मागील दोन दिवसांत घडल्या आहेत.

चिन्मय कृष्ण दास यांनी त्यांना अटक करतेवेळी बांगलादेशातील हिंदू बांधवांना एकतेचा संदेशही दिला. एकप्रकारे 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक हैं तो सेफ हैं' असेच चिन्मय कृष्ण दास यांनी अप्रत्यक्षरित्या सूचविले. तेथील विदारक, जीवावर बेतणारी परिस्थिती लक्षात घेता, या दोन्ही घोषणा बांगलादेशी हिंदूंच्या दृष्टीनेही जीवनमंत्र ठराव्या. या एकूणच प्रकरणानंतर मोदी सरकारनेही बांगलादेशकडे गंभीर चिंता व्यक्त करीत.

हिंदूंसह अल्पसंख्याकांची सुरक्षा सुनिश्चित करण्याचा सल्ला दिला आहे. पण, त्याकडे गांभीर्याने पाहण्याचे आश्वासन देण्याऐवजी युनूस सरकारने हा बांगलादेशचा अंतर्गत मुद्दा असल्याचे सांगत भारतालाच उलटे सुनावण्याचा उफराटेपणा दाखविला आहे.

दुर्दैव हेच की, बांगलादेशमधील हिंदू आध्यात्मिक गुरूच्या अटकेविषयी भारतातील पुरोगामी जमातही चिडीचूप आहे. गाझा आणि अन्य मुस्लीम राष्ट्रांतील मानवाधिकारांवर 'सेव्ह गाझा' वगैरे म्हणून व्यक्त होण्याची चढाओढ लावणारे हे पुरोगामी, माध्यमांतील पत्रकार या प्रकरणी मात्र अपेक्षेप्रमाणे मूग गिळून गप्प आहेत. त्यामुळे मानवाधिकारांच्या नावाखाली अन्याय-अत्याचारांवर व्यक्त होण्याचा हा सोयीस्करपणा सर्वस्वी निंदनीय. त्यामुळे भारत सरकारसह जगभरातील हिंदूंनीही आता चिन्मय कृष्ण प्रभु यांच्या सुटकेसाठी बांगलादेश सरकारवर दबाव वाढवून 'हिंदूशक्ती युगे युगे'चा परिचय करून देणे, हे परम कर्तव्यच!

# चिनी सैन्यासमोर मोठे आव्हान

## चिनी तरुण सैन्यात जाण्याकरिता तयार नाहीत



राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

चीन सध्या आपल्या सैन्यात तरुणांच्या कमतरतेचा सामना करत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांची सैन्यात जाण्याची इच्छा कमी होणे. आधुनिक जीवनशैली, उच्च शिक्षण आणि चांगल्या नोकऱ्यांच्या शोधात युवक सैन्याकडे आकर्षित होत नाहीत. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे तरुण पिढी सैन्य सेवांपेक्षा इतर व्यवसायांकडे आकर्षित होत आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढत्या संधींमुळे तरुणांमध्ये सैन्य सेवा करण्याची इच्छा कमी होत आहे. यामुळे चिनी सैन्याला युवकांच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे.

पीपल्स लिबरेशन आर्मी म्हणजे चिनी सैन्य, कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायनाच्या नेतृत्वाखाली काम करते आणि १५ लाख ताकदीचे जगातले सर्वात मोठे सैन्य आहे. याशिवाय २० लाखांहून जास्त सैनिक रिझर्व्ह लिस्टवर असतात, म्हणजे गरज पडले तर त्यांना सैन्यात बोलावले जाऊ शकते. जागतिक महाशक्ती बनण्याकरिता राष्ट्रपती शी जिनपिंग त्यांच्या सैन्याला २०३५ पर्यंत सर्वात आधुनिक सैन्य बनवणार आहेत. परंतु अमेरिकन वर्तमानपत्र 'इकॉनॉमिस्ट'च्या प्रमाणे चीनमध्ये सध्या सैन्यामध्ये नवीन तरुण भरती होत नाही. शी जिनपिंग यांच्या आव्हानाला दाद न देता युवक सैन्यामध्ये भरती होण्याकरिता तयार नाहीत. याकरिता अनेक कारणे आहेत.

चीन एक म्हातारा देश होत आहे. १९७९ पासून २०१५ पर्यंत चीनने 'वन चाईल्ड पॉलिसी' अंमलात आणली होती. त्याचे परिणाम आता चीनच्या सरकारी आकड्याप्रमाणे १६ ते २४ या वयोगटांमध्ये, जे भरतीचे वय असते, तिथे संख्या अत्यंत कमी झालेली आहे. 'वन चाईल्ड पॉलिसी'मुळे ज्या चिनी नागरिकांना मुले आहेत, ते आपल्या मुलांचे अत्यंत कौतुक करतात. त्यांना एक राजकुमार म्हणून वाढवले जाते. याशिवाय चीनमध्ये आर्थिक क्रांती झाल्यामुळे आता चीनमधील सर्वात मोठा वर्ग हायर मिडल क्लास आहे. श्रीमंत हायर मिडल क्लासमधून युवक सैन्यात जायला तयार नसतात. त्यांना जास्त शिकून, जिथे जास्त पैसे मिळतील, आरामाचे जीवन जगता येईल अशा नोकऱ्या पाहिजे असतात. आता वन चाईल्ड पॉलिसी ही जरी बाद करण्यात आली आहे तरी त्यानंतर लोकसंख्या वाढायला तयार नाही. कारण शिकलेल्या आणि कॉर्पोरेट जगतामध्ये काम करणाऱ्या मुलींना आपले कुटुंब वाढवण्यामध्ये रस नसतो. त्यांना लहान मुलांची काळजी घ्यावी लागेल आणि ज्यामुळे कॉर्पोरेट जगतामध्ये त्यांची प्रमोशन्स मागे पडतील.

सैन्यात नोकरी करण्यापेक्षा तंत्रज्ञान जगतात किंवा आर्थिक क्षेत्रामध्ये काम करणे तरुण मुले आणि मुलींना अत्यंत आवडते.

चिनी सैन्यामध्ये कॉर्पोरेट जगताप्रमाणे भक्कम पगार दिला जाऊ शकत नाही. याशिवाय चिनी सैन्यामध्ये पेन्शन नाही. चिनी युवकांना अत्यंत थंड भागामध्ये किंवा भारत-चीन सीमेवर तैनात होऊन कठीण जीवन जगण्यामध्ये फारसा रस नाही. चिनी नेतृत्व त्यांच्या जनतेला सांगण्याचा प्रयत्न करते की, चीन ही एक अत्यंत महत्त्वाची सिव्हिलायझेशन आहे आणि ते येणाऱ्या काळामध्ये जगावर राज्य करणार आहेत.

पहिले चिनी नागरिक, कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायनामध्ये जायला तयार असायचे. त्यामुळे त्यांना आयुष्यामध्ये प्रगती करण्यामध्ये मदत मिळायची. शिवाय त्यांना इतरांप्रमाणे चिनी सरकारकडून त्रास दिला जात नव्हता. परंतु आता चीनचे आर्थिक जगत वेगाने वाढत असल्यामुळे पैसे कमावण्याच्या आणि आयुष्यात वर जाण्याच्या अनेक इतर संधी चीनमध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनून आयुष्यात प्रगती करायची कल्पना बहुतेकांना आवडत नाही.

चिनी मीडियामध्ये ज्यांना आयुष्यात यश मिळाले अशा प्रकारचे उद्योजक, प्रोफेशनल सेलिब्रिटीज यांच्या सक्सेस स्टोरीज येत असतात; ज्यामध्ये इतर क्षेत्रांमध्ये होणारी प्रगती ही पुढे येते. त्या मानाने चिनी सैन्याच्या कुठल्याही सक्सेस स्टोरी पुढे आलेल्या नाहीत. उलटे अनेक उच्च पदांवर असलेल्या चिनी जनरल्सचे भ्रष्टाचारामुळे कोर्ट मार्शल करण्यात आले.

चिनी डिफेन्स मिनिस्टरलासुद्धा बडतर्फ करण्यात आले होते. म्हणजे सैन्यात उच्च पदाला जाऊन मोठा धोका निर्माण होत आहे. याआधी चिनी सैन्यामध्ये भरती होणारे युवक हे लहान गावे, खेड्यांतून यायचे. परंतु आता तिथे भरपूर नोकऱ्यांची निर्मिती झाल्यामुळे खेडे आणि छोट्या गावातले युवक सैन्यात यायला तयार नाहीत.

चिनी सैन्यामध्ये सैनिकांची कमी पडत असल्यामुळे त्यांची शस्त्र सिद्धता, संरक्षण सिद्धता आणि सैन्याचे आधुनिकीकरण मागे पडत आहे त्यांची सैनिकी शक्ती कमी होत आहे. 'सायबर वॉरफेयर'सारख्या क्षेत्रात काम करण्याकरिता त्यांना पुरेसे युवक मिळत नाहीत. यामुळे अत्याधुनिक शस्त्रे तयार आहेत, पण ती चालवण्याकरिता मिळणारे सैनिक चिनी सैन्याला मिळत नाहीत. सैनिकांची कमी एवढी कमी आहे की, चीन आता नेपाळी गुरखा आणि तिबेटीयन अल्पसंख्यकांनासुद्धा सैन्यात भरती होण्याकरिता प्रयत्न करीत आहेत.

मात्र, नेपाळी युवकांचे शिक्षण कमी असल्यामुळे आणि त्यांना चिनी भाषा अजिबात येत नसल्यामुळे ते फारसे चांगले सैनिक बनू शकत नाहीत. तिबेटीयन युवक हे स्वाभाविकरीत्या अत्यंत मवाळ असतात. त्यांना चिनी सैन्यामध्ये भरती होण्यामध्ये अजिबात रस नाही. सध्या चीन दादागिरी करून अनेकांना सैन्यामध्ये येण्याकरिता भाग पाडत आहे, परंतु अशा प्रकारचे बळीचे बकरे चिनी सैन्याला किती मजबूत बनवू शकतील, हा संशोधनाचा विषय आहे.

चिनी सैन्यात नेपाळी गुरखा भरती युवकांची कम तरता या समस्येवर उपाय म्हणून चीन नेपाळी गुरखा आणि तिबेटीयन अल्पसंख्यकांना सैन्यात भरती करत आहे मात्र, या निर्णयामुळे नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. हिमालयीन प्रदेशात चीन आणि भारत यांच्या दरम्यान सीमावाद आहे. गुरखा सैनिकांच्या मदतीने चीन या प्रदेशाचे अधिक प्रभावीपणे संरक्षण करू शकतो. नेपाळी गुरखा भरतीमुळे येणाऱ्या अडचणी गुरखा सैनिकांना चिनी भाषा आणि संस्कृती शिकण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे त्यांना इतर चिनी सैनिकांसोबत काम करण्यास अडचण येते.

नेपाळी गुरखा भरतीमुळे नेपाळ आणि भारत यांच्याशी चीनचे संबंध बिघडू शकतात. चिनी सैन्यातील अनेक जण गुरखा सैनिकांच्या भरतीला विरोध करतात. चिनी सैन्यातील तिबेटी युवक भरती चीन सैन्यातील युवकांची कमी भरून काढण्यासाठी तिबेटी युवकांकडे वळत आहे. तिबेटी लोक हिमालयाच्या प्रदेशात राहतात आणि त्यांच्याकडे कठोर वातावरणात जगण्याची क्षमता असते. यामुळे ते हिमालयाच्या प्रदेशात होणाऱ्या युद्धात फायदेशीर ठरू शकतात.

तिबेटी युवक भरती करून चीनला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. तिबेटी आणि चिनी तरुणांची पृष्ठभूमी, भिन्न संस्कृती आणि भाषा हा फरक फार मोठा आहे. यामुळे संवाद आणि समन्वय साधणे कठीण होते. अनेक तिबेटी युवकांचा शिक्षण स्तर कमी असतो. यामुळे त्यांना आधुनिक युद्धात वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे कठीण होते. तिबेटी लोक चीनच्या विरुद्ध असतात. अशा परिस्थितीत तिबेटी युवकांना चिनी सैन्य शिस्त शिकवणे आणि चिनी सैन्यात भरती करून त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण असते. यामुळे चिनी सैन्य शक्ती कमजोर होऊ शकते.

तिबेटी युवक भरतीमुळे तिबेट प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो आणि चीनला आंतरराष्ट्रीय पातळीवर विरोधाला सामोरे जावे लागू शकते. निष्कर्ष चिनी सैन्यातील युवकांची कमी ही गंभीर समस्या आहे. तिबेटी युवक, नेपाळी गुरखा भरती हा या समस्येवर उपाय असू शकतो; परंतु त्यामुळे काही नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. चीनला या आव्हानांना तोंड देण्यासाठी दीर्घकालीन रणनीती आखावी लागेल.

तिबेटी, गुरखा सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि त्यांच्यावर विश्वास ठेवण्यासाठी चीनला दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतील. मात्र तिबेटी, गुरखा सैनिकांचा वापर भारत गुप्तहेर म्हणून करू शकतो. कारण या दोन्ही जमाती चीनपेक्षा भारतावर जास्त प्रेम करतात. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

# इव्हीएम... आक्षेप आणि निराकरण!



विचारमंथन

प्रतिनिधी

सोशल मीडियावर इव्हीएमवर जे आक्षेप घेतले आहेत, त्यांचे निराकरण मी केले आहे. मी इव्हीएम समर्थक आहे म्हणून हे आव्हान स्वीकारले. ज्यांनी आक्षेप घेतले त्यांचे निवडणूक कशी घेतली जाते याचेच ज्ञान मूळात तोकडे आहे. अर्धवट माहितीवर विचारलेल्या बहुतेक शंका सुद्धा अर्धवट आहेत. तरीही मी प्रत्येक आरोपाचे निखालस निराकरण केले आहे. यावर आता हे महाशय आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. त्यांच्या आक्षेपांना मी दिलेली उत्तरे...

चुनाव आयोग किंवा इव्हीएम समर्थक लोकांसाठी काही साधे सोपे सरळ प्रश्न-

✻ आपल्यापेक्षा कितीतरी प्रमाणात प्रगत असलेल्या देशात इव्हीएम ऐवजी बैलेटवर वोटिंग का होते?

- तिकडे लोकसंख्या आपल्या तुलनेत खूप म्हणजे खूपच कमी आहे. नागरिक साक्षर आहेत, भाषा एकच आहे, दोन किंवा तीन पक्ष आहेत, बूथ बळकावून शिक्के मारणे असे प्रकार तिकडे होत नाहीत. आणी हो, प्रगत चीनमध्ये मतदान होतच नाही, आपण असेच करायचे का? आपला देश मशीन वापरून मतदान घेतो याचे त्या देशांना कौतुक वाटते. त्या देशांची पथके निवडणूक काळात इथे येऊन पाहणी करून जातात.

✻ किती लोक, पक्ष, जनप्रतिनिधिनना इव्हीएम हवी?

- बहुसंख्य, ही पद्धत आणताना समिती नेमली गेली होती. १९९२ साली. त्यात लोकप्रतिनिधी व तंत्रज्ञ सुद्धा होते. त्यांनी अनुकूल अहवाल दिल्यावरच ही पद्धत आणली गेली.

✻ जर बहुतांशी जनतेला इव्हीएम नको असेल तर ते रद्द करणे योग्य, लोकशाहीस साजेसे नाहीये का?

- ही बहुतांश जनता कोण? जनता तर ६० ते ८० टक्के मतदान करते आहे. हरलेले प्रतिनिधी म्हणजे जनता नव्हे.

✻ पाच वाजताची व फाइनल वोटिंग आकडेवारीमध्ये ८ टक्के वाढ कशी झाली?

- निवडणूक आयुक्त यांनी पूर्ण चार्ट दिला आहे. आकडेवारी अवाजवी वाढली हा आरोप पार खोटारडा आहे.

✻ आजवर ती वाढ एक टक्यांपेक्षा जास्त झालेली नसताना ही वाढ अविश्वसनीय नाहीये का?

- अवाजवी वाढ झाली हा आरोपच खोटारडा आहे.

✻ आठ टक्के वाढीच्या हिशोबाने प्रत्येक केंद्रावर किमान १००० लोक शिल्लक हवेत

- वरचे उत्तर

✻ तसे शिल्लक असतील तर त्यांच्या वोटिंगला पर वोट एक मिनिट (जो प्रत्यक्षात ३ मिनिट असतो) धरला तरी ६, ७ तासाचा होतो, तितका लागलाय का?

- इव्हीएमची रचना अशी आहे की, मिनिटाला ४ मतेच टाकता येतात. बूथ बळकवायचा प्रयत्न झाल्यास, तिकडचा निवडणूक अधिकारी फक्त १ बटण दाबून मशीन लॉक करू शकतो. तुम्ही कधी जन्मात मतदान केलेले दिसत नाही. नाहीतर एवढे फालतू प्रश्न पडले नसते.

✻ प्रत्येक बूथवर एकूण १०००, १२०० मतदार नोंदणी असताना १००० मतदार शिल्लक असणे शक्य आहे का?

- धादांत खोटा आरोप. बूथवर प्रत्येक उमेदवाराचा प्रतिनिधी शेवटपर्यंत असतो. त्याने हरकत घेतली असे उदाहरण नाही.

✻ मतदारांचा उत्साह, वेळ संपल्यावर सुध्दा केंद्रावर शेकड़ोंच्या रांगा- अशा हेडलाइन आल्या होत्या का?

- आल्या होत्या. रांगा मी स्वतः बघितल्या आहेत. सर्वच पक्ष कार्यकर्ते ५ ते ६ या काळात कामाला लागतात व ज्यांनी मतदान केले नाही त्यांना आठवण करून देतात.

✻ वोटिंग संपल्यावर लगेच आकड़े प्रसिद्ध का नाहीत?

- काही हजार केंद्रे आकडे पाठवत असतात. त्यांचे संकलन व्हायला वेळ लागतो. काही कर्मचारी सुद्धा मानवी चूक करून ठेवतात. ती दुरुस्त करायला सुद्धा वेळ लागतो.

✻ इव्हीएम मशीनचे पार्ट्स इटरत्र का सापडतात?

- असे काही घडलेले नाही.

✻ खाजगी वहानात इव्हीएम का सापडतात?

- असे काही घडलेले नाही.

✻ चुनाव आयोगाची वेबसाइट बंद का पडते?

- नासाची वेबसाईट बंद पडते. बंद पडली तर काय बिघडले? आजपर्यंत एकदाही बंद पडलेली नाही अशी एकही वेब साईट नाही.

✻ कोणते इव्हीएम कुठे पाठवायचे याचा निर्णय घेणारी यंत्रणा चुनाव आयोगाऐवजी सरकारकडे का आहे?

- हे सुद्धा आयोगच ठरवतो. सरकार नाही.

✻ इव्हीएम चार्जिंग १५, २० दिवसांनी सुद्धा ९९ टक्के कसे असते?

- बिनबुडाचा आरोप. मूळात सील केलेले मशीन चार्ज कसे करता येईल?

✻ चुनाव आयोगाचे अध्यक्ष कोण निवडते?

- सरकार

✻ त्या समितीतुन विरोधी पक्ष, कोर्ट जज का काढले?

- सरकारी निर्णय आहे.

✻ सर्वस्वी सरकार प्रतिनिधी चुनाव आयोग अध्यक्ष का निवडतो?

- तशीच पद्धत आहे.

✻ महायुतीच्या एकूण १३५ आमदारांना इव्हीएमवर पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मतं कशी मिळाली आहेत?

- लोकांचे प्रेम! लाडक्या बहीणी, जागृत हिंदू.

✻ गावांच्या गावात विरोधकांना ० मते कशी?

- साफ खोटा प्रचार आहे. असेही झालेले नाही.

✻ उमेद्वाराच्या गावात त्याला स्वतःला ० मते कशी?

-असेही कोठे झाले नाही. जो असे खोटे बोंबलत होता. त्याला ४५०० मते पडलेली आहेत. त्याचा खोटेपणा आयोगानेच उघड पाडला आहे.

✻ फी भरण्याची तयारी असूनही पुर्ण मोजनी का नाही?

- पहिल्या ३ पराभूत उमेदवारांनाच मागणी करता येते.

✻ ४ महिन्यापूर्वीच्या निवडणुकीत ९ खासदार असलेला पक्ष १३२ आमदार आनतो व ८ खासदार असलेला पक्ष १० आमदार आनतो हे विश्वसनीय आहे का?

- त्यावेळी युती आणि आघाडीमधील मतांचा फरक फक्त अर्धा टक्का होता. म्हणजे मत विभाजन टाळल्याने, एक गठ्ठा मुस्लिम मते मिळाल्याने विजय मिळाला होता.

✻ बैलेटमध्येहि ग़ैरप्रकार होउ शकतात, हे खरे असले तरी बैलेट ही भौतिक, वस्तुरूप गोष्ट असल्याने व प्रत्येकाच्या हाती कॅमेरे असल्याने ग़ैरप्रकाराची शक्यता कमी नाहीये का?

- मशीन आणि इव्हीएम ही सुद्धा भौतिक गोष्ट आहे. त्यात पडलेली स्लीप सुद्धा भौतिक आहे. प्रत्येक निवडणूक केंद्रात कॅमेरा सुद्धा असतो.

✻ अगदी लोकसभा बर्खास्त करून सुद्धा पुन्हा बैलेटवर घ्यायलाही हरकत नाही.

- बरे. २०२९ मध्ये बघू.

# शांतता! कोर्ट चालू आहे

## ...क्या यही तेरा इन्साफ है?



सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

शहाण्याने न्यायालयाची पायरी चढू नये, असे भारतीय समाजात पूर्वापार मानल्या जाते. न्यायालय व त्यातील कार्यवाही संबंधात बृहत समाजात एक प्रकारची भीती सदैव मनात वसत असते. सुदैवाने सभ्य समाजाला न्यायालयांचे प्रत्यक्ष दर्शन व अनुभव घेण्याचे प्रसंग अपवादानेच येतात, हे मात्र खरे! अर्थात, प्रत्यक्ष न्यायालयांचा अनुभव असलेल्या व्यक्ती आवर्जून एकच बाब सांगतात, ती ही की, न्यायालयांच्या एकंदरीत स्वरूप व कार्यपद्धतीविषयी जनतेच्या मनात प्रचंड गैरसमज व प्रगाढ अज्ञान आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, हिंदी चित्रपटांचा समाजावर असलेला प्रभाव व चित्रपटांमध्ये केलेले न्यायालय, न्यायाधीश व वकील वर्गाचे चित्रण!

भारतीय परंपरागत समाजात न्यायनिवाडा करण्याचे कार्य पंचायत करीत असे. अजूनही काही समाजांमध्ये पंचायत ही सर्वोपरी असते. ब्रिटिशांनी ज्या वेळेस ईस्ट इंडिया कंपनीकडून १८५८ साली राज्य कारभार आपल्याकडे घेतला, तद्नंतर सकल देशांमध्ये एकच कायदा औपचारिक न्याय यंत्रणा त्यांनी स्थापन केली. भारतीय दंडविधान १८६० हा पाश्चात्त्य न्याय-पद्धतीस भारतात लागू करण्याच्या प्रक्रियेचा भरभक्कम पाया! भारतीय स्वातंत्र्य लढ्यामधील बहुतांश धुरीण हे शिक्षणाने अधिवक्ता होते तसेच स्वतंत्र भारतातही सर्वोच्च पद भूषविणारे अनेक नेते हे अधिवक्ता होते व आहेतही. स्वातंत्र्योत्तर भारताच्या आशा-आकांक्षा यांचे स्पष्ट प्रतिबिंब १९५० च्या दशकातील हिंदी चित्रपटात उमटलेले आढळून येते. प्रचलित कायद्यानुसार गुन्हेगार असलेली व्यक्ती परिस्थितिवश व निरुपायाने गुन्हेगारीकडे वळते तसेच गुन्हेगार हा जन्मजात नसतो, हे मार्मिकतेने मांडणारा पहिला लक्षणीय चित्रपट म्हणजे, १९५१ सालचा 'आवारा' हा चित्रपट. १९५८ साली आलेल्या 'लाजवंती' चित्रपटात बलराज साहनीने ॲडव्होकेट निर्मलकुमार यांची भूमिका साकारली होती. अर्थात, या चित्रपटात वकिलीच्या व्यापात व संशयी स्वभावाने पत्नीशी बेबनाव झालेला एक संसारी व्यक्ती हे प्रधान कथासूत्र असल्यामुळे वकिली व न्यायालय या बाबी या चित्रपटात फारशा दृष्टीस पडत नाही. चिरतरुण, सदाबहार देव आनंदने 'पेईंग गेस्ट' (१९५७) चित्रपटात निर्धन तरुणाचा, जो वकील असतो, त्याची फर्मास भूमिका रंगवली होती. हा एक संगीतमय प्रणयप्रधान चित्रपट असल्यामुळे त्यात वकिली नावालाच होती. पण, देव आनंद यांची लक्षणीय भूमिका असलेला चित्रपट होता तो 'बात एक रात की' (१९६२). या चित्रपटात देव आनंदने सत्य व प्रामाणिकतेशी समर्पित ॲडव्होकेट राजेश्वरची भूमिका साकारली होती. खुनाच्या खोट्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या नीला या तरुणीची, खऱ्या खुन्याला उजेडात आणणारी ही कथा 'द पॅराडाईन केस' या चित्रपटाची सहीन सही नक्कल होती.

तद्नंतर देव आनंदने 'दुनिया' (१९६८) चित्रपटात ॲडव्होकेट अमरनाथ शर्मा 'अमर'ची भूमिका साकारली, अर्थात ती त्याच्या प्रतिमेस साजेशी होती. वकिलांना चित्रपटात महत्त्वपूर्ण बनवण्याचे कार्य १९६० च्या दशकातील हिंदी चित्रपटांनी केले. १९६४ सालच्या अती-यशस्वी 'संगम' चित्रपटात राजेंद्रकुमार मॅजिस्ट्रेट (नावालाच) असतो तर सुनील दत्तने 'मेरा साया' (१९६६) व 'वक्त' (१९६५) या चित्रपटात गंभीर व विचारी वकील रंगवला. भारतातील बहुचर्चित नानावटी खून खटल्यावर आधारित 'ये रास्ते है प्यार के' (१९६३) हा चित्रपट बनला होता. (भारतात ज्यूरी पद्धतीने न्याय- निवाडा झालेला नानावटी खून खटला हा शेवटचा खटला होता). या चित्रपटाच्या उत्तरार्धात न्यायालय व वकिलांचे मनोज्ञ दर्शन घडते.

अशोककुमारने ॲडव्होकेट ब्योमकेश मुखर्जी तर मोतीलालने अभियोक्ता अली खानची भूमिका समरसून वठवली होती. इफ्तिखार हे रुबाबदार अभिनेते कनिष्ठ वकिलाच्या भूमिकेतही लक्षात राहतात. सुनील दत्तने १९७७ सालच्या 'चरणदास' चित्रपटात ॲडव्होकेट टंडन ही भूमिका केली होती. पण भारतीय चित्रपटांमध्ये न्यायालये व वकील यांच्यावर तयार झालेला सर्वोत्तम चित्रपट म्हणजे 'कानून' (१९६०) फाशीच्या शिक्षेवर या चित्रपटात गंभीर चिंतन होते. पण ज्या प्रकारे या चित्रपटात न्यायालये व साक्षी-पुरावे चित्रित केले गेले होते, त्याला तोड नाही. अशोककुमार यांचा न्यायाधीश व राजेंद्रकुमार यांनी रंगवलेला बचाव पक्षाचा वकील, चिरस्मरणीय! १९७० च्या दशकात वकील असलेल्या नायकाचा मनोरंजक प्रवास पडद्यावर आणला तो सुभाष घई यांनी 'विश्वनाथ' या चित्रपटाद्वारे. शत्रुघ्न सिन्हा यांनी आक्रमक वकील विश्वनाथ फार तडफेने साकारला होता. १९८० साली प्रदर्शित झालेल्या 'दोस्ताना' चित्रपटातही शत्रुघ्न सिन्हा यांनी अहंमन्य व गर्विष्ठ वकील रवी कपूर ही भूमिका त्यांच्या विशिष्ट शैलीत रंगवली होती. १९७३ च्या 'परवाना' (१९७८) च्या 'दिल्लगी', १९८१ च्या 'चेहरे पे चेहरा' (हा चित्रपट 'डॉ. जेकील व मिस्टर हाईड' या इंग्रजी कादंबरीवर आधारित होता) 'फांसी के बाद' (१९८४), 'अमीर आदमी गरीब आदमी' (१९८५), 'इन्सानियत के दुश्मन' (१९८७), 'जुल्मो सितम' (१९८८) या चित्रपटातही शत्रुघ्न सिन्हा यांनी वकील रंगवला, पण त्या भूमिकांमध्ये फारसे काही नव्हते.

अमिताभ बच्चनने सर्वप्रथम 'महान' (१९८३) चित्रपटात वकिलाची भूमिका केली, पण अमिताभ बच्चन यांनी वकिलाच्या चिरस्मरणीय भूमिका निभावल्या त्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात! 'जमानत' (२००८) मधील अंध वकील शिवशंकर, 'पिंक' (२०१६) चित्रपटातील 'नाही म्हणजे नाही' हे ठासून सांगणारा वकील दीपक सहगल तर 'बदला' (२०१९) चित्रपटातील धूर्त वकील बादल गुप्ता! या चित्रपटातील भूमिका आपणास विचार प्रवृत्त करतात हे निश्चित. जम्पिंग जॅक म्हणून विख्यात असलेल्या जितेंद्रने १९८४ सालच्या 'जस्टिस चौधरी' चित्रपटात व 'जज मुजरीम' (१९९६) या चित्रपटात न्यायाधीशाची भूमिका केली तर 'मजबूर' (१९९०), 'न्याय-अन्याय' (१९९०) व 'जय काली' (१९९२) चित्रपटात वकिलाची भूमिका केली.

अर्थात, या सर्व सरधोपट भूमिका होत्या, हे सांगणे न लगे! राज कपूरची शेवटची चित्र भूमिका म्हणजे ॲडव्होकेट सत्यप्रकाश माथूर ही 'वकील बाबू' (१९८२) चित्रपटातील लक्षात न राहण्याजोगी भूमिका. अभिनय सम्राट दिलीपकुमारने 'अमर' (१९५४) चित्रपटात वकिलाची भूमिका तर 'दास्तान (१९७२)' व 'किला' (१९९०) या चित्रपटात न्यायाधीशाची भूमिका केली.

(पान ६ वर)



# कुटुंब मित्र

पूर्ण कुटुंबाचे सहभोजन एक आवश्यकता! (एक है तो सेफ है)

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने

भ्र. ९८२२४६२९६८

## Family Psychologist

१. माझं काय चुकलं? त्या माउलीच्या अश्रूंचा बांध फुटला होता... ''मुलगा सकाळी ९ वाजता ऑफिसात जातो. मी पहाटे उठून, स्नान करून पूर्ण स्वयंपाक करते व बरोबर वेळेच्या आत त्याला डबा करून देते. गेल्या वर्षी त्याला नोकरी लागल्यापासून हे सुरू आहे. पण गेल्या आठवड्यापासून मी पाहतेय की, तो डबा खातच नाही. नेतो, तसाच वापस आणतोय. त्याला रागावली तर त्याने माझ्याशी बोलणे टाळायला सुरुवात केली. सांगा माझं काय चुकलं?''


मी त्यांच्या मुलाला आणि पतीला बोलावलं. मुलाने सांगितलं की, ''ऑफिसातील एका मुलीची सोबत मिळावी म्हणून तो कॅन्टीनमध्येच जेवतो. आईला उत्तरे देणे कठीण म्हणून तिच्याशी बोलणे टाळतोय.'' घरी तो मोबाईल घेऊन बसतो. आई-वडील टीव्ही बघतात. मधुमेहामुळे वडील आधी जेवतात. रात्रीची न्यूज पाहताना टीव्हीसमोर बसून हा जेवतो. त्यानंतर आई एकटी जेवते. ही समस्या फक्त कम्युनिकेशन गॅपमुळे नव्हती. पन्नाशीतल्या बायकांची मुले आईवर अवलंबून नसतात. पती आपल्या जगात मश्गुल असतात. आई मात्र काया-वाचा-मने गेली २५ वर्षे घरच्या मंडळीत व घरकामातच कायम गुंतलेली असते. प्रत्यक्ष वार्तालाप होत नसल्यामुळे, आता कुणालाच माझी गरज उरली नाही. मी राब-राब राबते, पण कुणालाच त्याची किंमत नाही, असे विचार त्रास देऊ लागतात. मेनोपॉजमुळे मन:स्थिती आधीच नाजूक असते. शिवाय जास्त वेळ मोबाईल वापरल्यामुळे चीडचीड, आहारावर अपुरे नियंत्रण, वयानुसार बेढब झालेले शरीर या सगळ्या गोष्टींचा एकत्रित वाईट परिणाम मनावर आणि शरीरावर होत जातो. या काळात जर स्त्रियांना कुठलेही ध्येय नसेल तर मात्र परिस्थिती आणखी कठीण होत जाते. चांगल्या क्षमता असूनही संसारिक जबाबदाऱ्यांमुळे अर्धवट सोडलेले शिक्षण किंवा नोकरी करण्याबद्दलच्या अतृप्त इच्छा, झालेले अपेक्षाभंग अशा कारणांमुळे त्यांना न्यूनगंड व अपराधीपणाची भावना तयार होते. तसेच जर कुठल्याही कारणाने घरातील वातावरण चांगले नसेल, चांगला छंद किंवा मैत्रिणी नसतील आणि अशा वेळी वर वर्णन केलेली घटना घडली तर ती बिचारी मनाने कोलमडून जाते. त्या कुटुंबाचे समुपदेशन करताना किमान रात्रीचे जेवण सोबत घेणे, संवाद-सहभाग वाढविण्याचे आवश्यक बदल सुचविले. वडिलांना व मुलाला आईच्या मनस्थितीची कल्पना दिली. त्यांना त्यांची चूक कळली. आता सगळे ठीक आहे.

२. हे असं कसं झालं? सधन, सुशिक्षित घरची मुलगी शिकली आणि मोठ्या शहरात नोकरीला लागली. पालकांनी मुलीला नवीन कार व छोटा फ्लॅटसुद्धा घेऊन दिला. उद्देश हा की, अधूनमधून त्या शहरात गेल्यावर तिच्या सोबत पालकांना राहता यावे. दोन वर्षे सगळे छान चालले. आईला आधी लक्षात आले की, मुलीचे बोलणे कमी झाले आहे. काही दिवसांपासून संध्याकाळी तिचा फोन नॉट रिचेबल होऊ लागला. पण जेव्हा मध्ये लागोपाठ तीन दिवस तिचा फोनच लागला नाही, तेव्हा मात्र सगळ्यांनाच काळजी वाटली. नंतर अचानक एका रात्री तिचा फोन आला की, तिने एका मुस्लिम मुलाशी निकाह केला असून ती सध्या दुबईमधून बोलते आहे. तसेच तिने तिची कार, फ्लॅट वगैरे सर्व विकले. ती दुबईमध्येच राहणार आहे; आणि ती अगदी मजेत आहे. सगळ्यांना धक्का बसला. तिच्या आईला रुग्णालयात भरती करावे लागले. घरी अक्षरशः दुःखाचा डोंगर उसळला. तिला घरच्यांनी फोन करायचा प्रयत्न केला. पण पुन्हा तिचा फोन नॉट रिचेबल होता. एक महिन्याने पुन्हा तिचा फोन आला की, तिची फसगत झाली आहे. त्या माणसाचे हे तिसरे लग्न होते, पण तिला काहीच माहीत नव्हते. मुलगा देखणा असल्याने ती त्याच्यावर भाळली. आपले शील, कार, फ्लॅट विकून आलेले पैसेसुद्धा त्याला अर्पण केले. आता तो इतर दोघींना तलाक देऊन माझ्यासोबतच राहीन म्हणतो आहे. आणि पुढे आठ महिन्यांनी ती अचानक घरी परतली. तिने सांगितले की, फक्त एक बेगम होऊन त्याच्या ८-१० मुलांना जन्म देणे हेच एक तिचे काम आहे, असे तिला सांगण्यात आले. संधी मिळाली तशी, जीव वाचवून ती पळून आली. कारण तिचे शिक्षण, पैसा या गोष्टींचे त्यांना काहीच महत्त्व नव्हते. यातून हेच शिकायचे की, मुलांना फक्त सुखसोयी आणि शिक्षण देणे पुरेसे नाही. सर्व सणांचे वैज्ञानिक महत्त्व समजावणे, त्यावर चर्चा, कार्यक्रम आयोजित करणे महत्त्वाचे आहे.

३. स्वयंपाकघर, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सुखलोलुपता बाहेर ऑर्डर करण्याच्या सवयीने घरी स्वयंपाक करणे बंद झाले. त्यामुळे अमेरिकन कुटुंबव्यवस्थाच नष्ट झाली. घरात स्वयंपाक करणे म्हणजे कुटुंबाला एकत्र ठेवणे, आपुलकीने जोडणे. ते एक कौटुंबिक संस्कृती आणि समाधानाचे केंद्र आहे. घरची स्त्री जेव्हा स्नान केल्यावर आपुलकीने प्रेमाने स्वयंपाक करते, तेव्हा तिच्या मनातील सात्त्विक विचारांचा परिणाम अन्नावर होतो. पण हॉटेलातील आचारी ओंगळ, अस्वच्छ, तामसी मनाने पदार्थ बनवतात. त्याचा वाईट परिणाम खाणाऱ्याच्या मन व शरीरावर होतो. त्याने मन चंचल, अस्थिर व चंगळवादी बनते. स्वयंपाकघर बंद केल्यामुळे अमेरिकन कुटुंबांचे काय झाले? १९७१ मध्ये ७१ टक्के यूएस कुटुंबांमध्ये मुले सोबत राहात होती, परंतु आज ५० वर्षांनंतर ही संख्या २० टक्क्यांपर्यंत घसरली आहे. कुटुंबे नर्सिंग होममध्ये राहतात. अमेरिकेत १५ टक्के स्त्रिया व १२ टक्के पुरुष कुटुंबात एकटेच राहतात. केवळ ६ टक्के कुटुंबात पुरुष आणि महिला एकत्र आहेत. अलिकडच्या काळात जन्माला आलेल्या बाळांपैकी ४१ टक्के शिशू अविवाहित स्त्रियांपासून जन्माला आली आहेत. त्यापैकी निम्म्या अपरिपक्व माता, म्हणजे शाळेत जाणाऱ्या मुली आहेत. मुळात एवढ्या कमी वयात त्या मुली आई होण्याचे कारणच चुकीचे संस्कार किंवा संस्कारांचा पूर्ण अभाव, चंगळवाद हे आहे. ही अतिशय गंभीर वस्तुस्थिती आहे. ४१ टक्के ही खूप मोठी आकडेवारी आहे. परिणामी अमेरिकेत सुमारे ५० टक्के पहिले विवाह एक वर्षाच्या आतच घटस्फोटात परिवर्तित होतात. ज्यांनी द्वितीय-तृतीय विवाह केलेत ते सर्व समस्याग्रस्त आहेत. कारण काय? आयुष्यातील व्यक्तिकेंद्रित स्वायत्तता व संस्कारांचा अभाव हे याचे कारण आहे.

माझ्या अमेरिकेतील दौऱ्यात एक विचित्र प्रसंग माझ्या पाहण्यात आला. माझ्या सांस्कृतिक अभ्यासाचा भाग म्हणून एकूण ११ अमेरिकन कुटुंबांच्या घरी तीन-तीन दिवस मला त्यांच्या कुटुंबातच राहण्याची संधी मिळाली. सगळीच कुटुंबे अतिशय श्रीमंत होती. सगळ्याच कुटुंबात मला प्रेम व आदरपूर्वक वागणूक मिळाली. मात्र, त्यांच्यासाठी जी गोष्ट दैनंदिन जीवनाचा भाग होती, ती भारतीय संस्कृतीत वाढल्यामुळे मला नवीन व विचित्र वाटली. जिथे मी राहिलो अशा एका घरी १४ व १६ वर्षांच्या दोन तरुण मुली होत्या. संध्याकाळी त्यांच्या १४ वर्षांच्या मुलीला निरोप द्यायला मी आणि घरची सगळी मंडळी बाहेर आलो. बॉयफ्रेंडसोबत ती मुलगी त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या छोट्या हाऊस-बोटीवर रात्रभर फिरून सकाळी वापस येणार होती. सगळ्यांनी त्या दोघांना शुभेच्छा दिल्या. दुसऱ्या दिवशी ती दोघे दुपारी १२ वाजता परतली. कारण रात्री जागरण झाल्यामुळे सकाळी ती दोघे उशिरा उठली होती, असे कळले. लगेच घरचे सगळे लोक तिच्या भोवती जमले व कसा गेला वेळ? मजा आली की नाही? वगैरे चर्चा करू लागले. मला मात्र त्यांची देहबोली पाहून असे वाटले की... मुलगी नुकतीच लग्नानंतर मांडव परतणीला घरी आलीय आणि आई व बहीण काही महत्त्वाचे प्रश्नं विचारत आहेत! दुपारी जेवणं झाल्यावर त्यांनी मलासुद्धा त्याच बोटीत फिरवून आणलं. अनेक दिवस-रात्र सुखाने राहता येईल व आलिशान हॉटेलात खाजगी खोलीत असतात, तशा सर्व सुखसोयी त्या बोटीतील खोलीत होत्या! शिवाय फोनवर ऑर्डर देऊन जे हवे ते त्या बोटीवर मागवता येतं. आपले पूर्वज प्रवासात अथवा तीर्थयात्रेला जाण्यापूर्वी घरात बनवलेले अन्नपदार्थ व कोरडा शिधा सोबत घेऊन जात असत. आता परिस्थिती बदलली आहे. आपल्या देशातील नागरिकांना कायमस्वरूपी खाद्यपदार्थ दुकानातून विकत घेण्याची सवय लागली तर इथली कुटुंब व्यवस्थादेखील अमेरिकेप्रमाणे नष्ट होईल. कुटुंबे उद्ध्वस्त झाली की मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य बिघडते. बाहेरील अन्नपदार्थ खाल्ल्याने शरीर लठ्ठ आणि बेढब बनते; मग लहान-मोठे आजार, इन्फेक्शन आदी समस्या उद्भवतात व खर्चदेखील वाढतो, ही वस्तुस्थिती आहे. घरात स्वयंपाक करणे आणि घरातील सदस्यांसोबत बसून खाणे हे कुटुंब व्यवस्थेसाठी आणि मानसिक स्वास्थ्यासाठीसुद्धा हिताचे आहे. त्यामुळे आपसातील सुसंवाद कायम राहतो. अर्थव्यवस्थेसाठी शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य आवश्यक आहे. म्हणूनच पूर्वजांनी आम्हाला बाहेरचे न खाण्याचा सल्ला दिला. आम्ही शाळेत असताना अमुक मुलगा हॉटेलात खायला जातो म्हणजे तो बिघडला असे समजत असत. आज आपण आपल्या कुटुंबासोबत रेस्टॉरंटमध्ये जेवतो. डॉमिनो, स्विगी, झोमॅटो, उबेर यांसारख्या फूड सर्व्हिस कंपन्यांकडून दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी शरीराला लहान-मोठे आजार होऊ देणारे अन्न खाण्यासाठी ऑनलाईन ऑर्डर करतो. अगदी उच्चशिक्षित, मध्यमवर्गीय लोकांमध्येही आता ही फॅशन झाली आहे. अनेक पालकांनी त्यांच्या शालेय मुलांची तक्रार करताना हा रात्री २ वाजता पिझ्झा बोलावतो, असे मला सांगितले आहे. आपण काय खावे हे ऑनलाईन कंपन्या ठरवतात. कारण त्यांच्या जाहिरातीत पिझ्झा सोबत कोल्ड्रिंक फ्री, अमुक फ्री अशी प्रलोभने असतात. कोल्ड्रिंकमध्ये प्रचंड प्रमाणात साखर व जंतुनाशक रसायने धोक्याच्या पातळीच्या वर असतात. त्यामुळे डॉक्टर आणि औषध कंपन्यांची कमाई मात्र नक्कीच वाढते.

कुटुंब मित्र : आज गरज आहे कुटुंब मित्रांची, सनातन संस्कृतीची! कुटुंब मित्र म्हणजे कुटुंब समुपदेशक! ज्यांना तुम्ही आपल्या समस्या सांगून मन हलके व तणाव कमी करू शकाल. त्यांनी आयोजित कार्यक्रमात भाग घेऊन सकारात्मक वातावरण घरी आणि समाजात निर्माण करू शकाल. अशा कुटुंब मित्रांच्या निर्मितीसाठी व कुटुंब प्रबोधनासाठी संघातर्फे नि:शुल्क प्रशिक्षण वर्ग आम्ही सुरू केले आहेत. त्याचा लाभ घ्यावा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## मौनचि सारथी । रामकृष्ण ।।

आकळेना काही । खेळ या दैवाचा ।।
म्हणूनी जीवाचा । कोंडमारा ।।१।।

बोलणे वागणे । स्वार्थाचे सोयरे ।।
विपरीत सारे । उमजेना ।।२।।

मनाचा आक्रोश । अनाथ हुंदका ।।
उभा जन्म मुका । आज झाला ।।३।।

प्रारब्धाचे ऋण । फेडणे चूकेना ।।
कर्माची ही दैना । सोसवेना ।।४।।

नको बोल ऐसा । दुषणांचा माथी ।।
मौनचि सारथी । रामकृष्ण ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## अवहेलना

बाप्पाने एका भक्ताला त्याच्या जवळ बोलवलं...
त्याला म्हणाला तुम्हाला सगळं कसं मोठ्ठं मोठ्ठं हवं...
मोठाल्या मूर्ती मोठ्ठा आवाज मोठमोठे
सेलिब्रेटिज मोठ्या राजकीय नेत्यांची साथ...
भक्तिभाव, भजन सगळं स्वाहा झालं...
एखाद्या डिस्को-पबचं स्वरूप गणेशोत्सवाला आलं...
तुम्ही जे करता त्याला खरंच विसर्जन
म्हणतात की केवळ धांगडधिंगा घालायचा
आणि मूर्तीला नदीत फेकून काढता पाय घ्यायचा?
टाळ, मृदंग आणि नामाचा गजर बाजूलाच राहिला...
कोणत्या डिजेचा आवाज जास्ती याच्या स्पर्धा होऊ
लागल्या..
पोस्ट विसर्जन स्कीनचे एकदा युट्यूबवर व्हिडीओ पाहा...
आणि कृपा करून, कमीत कमी
प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तरी घेणे टाळा
गणेशोत्सवाचा उपयोग व्हावा जागृत करण्या चेतना...
किती वर्षे अजून माझी अशी करणार तुम्ही अवहेलना?

गौरव गड्डमवार

## अभिनय

माणूस म्हणुनी जगण्यासाठी
रात्र दिव्यांची पुरली नाही;
जगणे दिवसा नाटक झाले प्रतिसादाचे क्षणिक उमाळे !
उगाच ओल्या वळणावरती
हिरवळ हट्टी रुसून बसली;
जुन्या हवेची दिशा निराळी मुक्त मनाची वाट वादळी !
उत्कट वेड्या ध्यास मनाचा
शोधित तिरकस वाटा वळणे;
व्यवहारातील परिणामांना झुगारून ते चढती शिखरे !
ठेवणीतल्या कुजकट वाचा
ऐकत कानी सरावले मन; एक विलक्षण अनुभव घेता
विस्मयकारी जपले ते क्षण !

राजीवलोचन पुंडलिक

# महागाईची धास्ती ; महिलांची मालकी

एकीकडे निवडणूक निकाल चर्चेत असताना काही आर्थिक बातम्या चर्चेत राहिल्या. महागाई नियंत्रणात न राहिल्यास अर्थव्यवस्थेचे नुकसान होते, हे स्पष्ट करणारा एक अहवाल समोर आला. हॉलमार्किंग नसलेले दागिने विकण्यास बंदी घालण्यास देशात वेगाने सुरुवात झाली. याच सुमारास प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरांची मालकी आता महिलांकडे राहणार असल्याचे वास्तव समोर आले.

अर्थोद्योग

महेश देशपांडे

राजकीय आखाड्यात निवडणूक निकालाने धमाल केली असताना अर्थनगरीमध्येही काही लक्षवेधी घडामोडींची चर्चा रंगली. महागाई नियंत्रणात न राहिल्यास अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होते, हे स्पष्ट करणारा एक अहवाल अलिकडेच समोर आला. दरम्यान, हॉलमार्किंग नसलेले दागिने विकण्यास विविध राज्यांमध्ये बंदी घालण्यास वेगाने सुरुवात झाल्याचे समोर आले. याच सुमारास प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरांची मालकी आता महिलांकडे राहणार असल्याचे वास्तव समोर आले. महागाईतील तीव्र वाढ नियंत्रित न केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होऊ शकते. रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या बुलेटिनमध्ये या गोष्टी सांगितल्या आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार, सणासुदीच्या काळात खपातील वाढ आणि कृषी क्षेत्रातील पुनर्प्राप्ती यांनी २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये अर्थव्यवस्थेला आधार दिला आणि मागणीतील मंदीची भरपाई केली; परंतु महागाई दरातील अनियंत्रित वाढ अर्थव्यवस्थेला हानी पोहोचवू शकते. अर्थव्यवस्थेच्या स्थितीबाबत रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की, ऑक्टोबर महिन्यात किरकोळ महागाई दरात मोठी झेप घेतली गेली आहे आणि हे सप्टेंबरमध्ये महागाईबाबत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या इशाऱ्यांचे समर्थन करते. रिझर्व्ह बँकेने बुलेटिनमध्ये म्हटले आहे की, खाद्यपदार्थ आणि खाद्यतेलाच्या किमतीत झपाट्याने वाढ झाल्यामुळे महागाई वाढली आहे. वस्तू आणि सेवांमध्ये इनपुट खर्च वाढल्यानंतर या वस्तूंच्या विक्रीच्या किमतींवर लक्ष ठेवण्याची गरज रिझर्व्ह बँकेने व्यक्त केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार महागाईमुळे शहरी भागात आधीच उपभोगाची कमी होत आहे आणि यामुळे कॉर्पोरेट्सच्या कमाई आणि भांडवली खर्चावरही परिणाम झाला आहे. अशा स्थितीमध्ये महागाईचा दर कोणत्याही नियंत्रणाशिवाय वाढू दिला तर उद्योग आणि निर्यातीसह अर्थव्यवस्थेचे नुकसान होईल. महागाईमुळे शहरी भागात वापर कमी होत असल्याचे रिझर्व्ह बँकेनेही मान्य केले आहे. 'एफएमसीजी' कंपन्यांनी जाहीर केलेल्या दुसऱ्या तिमाहीच्या निकालांमध्येही या कंपन्यांनी याचाच पुनरुच्चार केला आहे. 'एफएमसीजी' कंपन्यांनी सांगितले की, महागाईमुळे शहरी भागातील 'एफएमसीजी' आणि खाद्यपदार्थांच्या मागणीवर परिणाम झाला आहे. 'नेस्ले'चे 'सीईओ' सुरेश नारायण यांनी सांगितले की, पैसे राखून असणारे खूप खर्च करतात; पण मध्यमवर्गीयांचे हात घट्ट बांधले आहेत. ऑक्टोबर २०२४ मध्ये महागाईचा दर ६.२१ टक्क्यांच्या १४ महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे, तर खाद्यान्न महागाईचा दर १०.८७ टक्के आहे. देशात आजही अनेक ठिकाणी हॉलमार्किंगशिवाय सोन्याचे दागिने विकले जात आहेत. या संदर्भात, सरकारने दिलेल्या माहितीनुसार आता ११ राज्यांमध्ये हॉलमार्किंगशिवाय सोन्याचे दागिने विकले जाणार नाहीत. २३ जून २०२१ पासून हॉलमार्किंगचा नियम लागू झाला. तेव्हापासून आतापर्यंत सोन्याचे सुमारे ४० कोटी दागिने हॉलमार्क केले गेले आहेत. सरकार देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या टप्प्यात त्याची अंमलबजावणी करत आहे. भारत सरकार आता देशाच्या विविध भागात भेसळयुक्त सोन्याच्या दागिन्यांपासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी दागिन्यांवर हॉलमार्किंगचा नियम लागू करत आहे. भारत सरकार आता देशाच्या विविध भागात भेसळयुक्त सोन्याच्या दागिन्यांपासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी दागिन्यांवर हॉलमार्किंगचा नियम लागू करत आहे. हा नियम २३ जून २०२१ रोजीच करण्यात आला आहे; परंतु विविध जिल्ह्यांमध्ये त्याची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू आहे. सरकारने अंमलबजावणी जाहीर केलेल्या ११ जिल्ह्यांमध्ये आंध्रप्रदेश, बिहार, हरयाणा, हिमाचल प्रदेश, केरळ, ओडिशा, पुदुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड या राज्याचा समावेश आहे. या राज्यात दागिन्यांच्या दुकानात हॉलमार्किंगशिवाय दागिने आणि सोन्याच्या कलाकृती विकल्या जाणार नाहीत.



पूर्वी नोंदणीकृत ज्वेलर्सची संख्या केवळ ३४ हजार ६४७ होती; ती आता १ लाख ९४ हजार ३९ झाली आहे. याशिवाय हॉलमार्किंग केंद्रांची संख्याही ९४५ वरून १६२२ झाली आहे. 'बीआयएस केअर मोबाईल ॲप'द्वारे हॉलमार्किंगचे दागिने ओळखता येतात. या ॲपचा वापर करून, ग्राहक हॉलमार्क केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची सत्यता पडताळू शकतो. उत्पादनाच्या गुणवत्तेबद्दल किंवा 'बीआयएस मार्क'च्या गैरवापराबद्दल त्याची तक्रार नोंदवू शकतो. देशात बनावट दागिन्यांची विक्री आणि ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने हॉलमार्कबाबत माहिती दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत, केंद्र सरकारने खेड्यापाड्यात राहणाऱ्या महिलांना सक्षम करण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागातील घरांमध्ये महिलांना १०० टक्के मालकी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात नोंदणीकृत घरांची नोंदणी ही लाभार्थी कुटुंबातील महिला सदस्यांच्या नावावरच व्हावी, असा शासनाचा प्रयत्न आहे. लाभार्थींची नवी यादी तयार केली जाईल आणि त्याद्वारे प्रथमच या योजनेत नावनोंदणी करू इच्छिणाऱ्या लोकांना स्वसर्वेक्षण करण्याची परवानगी दिली जाईल. केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत दोन कोटी घरांच्या बांधकामाला मंजुरी दिल्यानंतर आता त्याचा दुसरा टप्पा सुरू करण्याची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. सध्या ७४ टक्के घरे एकट्या किंवा संयुक्तपणे महिलांच्या मालकीची आहेत. ग्रामीण विकास मंत्रालयातील एका सूत्रानुसार, पारदर्शकता राखण्यासाठी प्रथमच फेशियल रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर सर्वेक्षण करणाऱ्यांसाठी आणि सर्वेक्षण करण्यात येणाऱ्या सर्वांसाठी केला जाईल. यासोबतच अधिकृत सूत्राने सांगितले की, यावेळी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) साठी पात्रता निकष शिथिल करण्यात आले असून काही मर्यादा दूर करण्यात आल्या आहेत. आवास प्लस ॲपद्वारे नवीन सर्वेक्षण केले जाणार आहे. देशातील अनेक राज्यांना पात्र कुटुंबांना ३१ डिसेंबरपर्यंत घरे मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या मते २०१६ मध्ये योजना सुरू झाल्यापासून 'पीएमएवाय-जी'अंतर्गत २.६७ कोटी घरे बांधण्यात आली आहेत. इंदिरा गांधी आवास योजनेंतर्गत सुमारे ७७ लाख प्रलंबित घरांचे बांधकामही पूर्ण झाले आहे. २०१६ मध्ये 'पीएमएवायजी' लाँच करण्यात आले होते आणि पाच वर्षांमध्ये २.९५ कोटी पक्की घरे बांधण्याचे उद्दिष्ट होते. एकंदरीत महिला वर्गाला सुखावणारे निर्णय घेण्याचा धडाका सरकारी पातळीवर कायम आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीमध्ये गेमचेंजर ठरलेल्या 'लाडकी बहीण योजने' प्रमाणे योजना सरकार राबवत राहणार असून त्यातून आपल्या लोकप्रियतेचा आलेख उंचावत राहणार, हे स्पष्ट झाले आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

डॉ. विजया राजाध्यक्ष यांचा जन्म ५ ऑगस्ट १९३३ रोजी झाला. मराठीतील स्त्रीवादी साहित्यिका म्हणून त्यांचा नावलौकिक महाराष्ट्रभर आहे. मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ या दोन खंडात आलेल्या पुस्तकामुळे मर्ढेकरांच्या कवितेचा त्यांनी केलेला अभ्यास महाराष्ट्रीय जनतेसमोर आला. १९९१ मध्ये प्रकाशित झालेल्या या द्विखंडात्मक ग्रंथाला १९९३ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. मर्ढेकरांच्या कवितेची उकल आणि तिचे अंतरंग समजून घेण्यासाठी हे दोन्ही खंड फार महत्त्वाचे आहेत, यात शंका नाही. मर्ढेकरांची कविता नेमकी कशी अभ्यासावी? तिच्यापासून मिळणारे बोध कोणते? आणि तिच्यापासून मिळणारी अनुभूती कोणती? या सर्वांवर विजया राज्याध्यक्ष यांनी अतिशय सूक्ष्म बारकाव्यासह आपली निरीक्षणे नोंदवली आहेत.

# मर्ढेकरांची कविता: 'स्वरूप आणि संदर्भ' मधील ज्ञानात्मकता आणि वैचारिकता

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

मर्ढेकरांची कविता पुन्हा पुन्हा वाचल्यावर ती कविता वाचकांना कोणते आव्हाने देते याचा अंदाज आल्यावर तिचा अभ्यास करून तिचे अंतरंग शोधण्याचा आणि तिच्याविषयी जमेल तेवढे संशोधन करावे असे विचारातून वाचक व अभ्यासक या भूमिकातून पी. एचडीसाठी विजया राजाध्यक्ष यांनी हे संशोधन केले. प्रबंधाचे काम पूर्ण झाल्यावरही त्यांचे संशोधन सुरू राहिले. स्वतः विद्यार्थ्यांना मर्ढेकरांची कविता शिकवत असताना विद्यार्थी ती कविता समजून घेण्यासाठी उत्सुक असत. कविता अवघड असली तरी समजून घेण्याचे परिश्रम करावे, या योग्यतेची आहे ही भावना त्यांच्या प्रतिसादातून लेखिकेला जाणवत असे. या अध्यापनातून मध्यकरांची कविता समजून घेऊ इच्छिणाऱ्या वाचकांच्या नेमके अपेक्षा काय आहेत याची कल्पना देखील आली.

सगळे विद्यार्थी केवळ परीक्षेसाठी मर्ढेकर वाचणारे नव्हते. अभ्यासाला असो वा नसो त्यांना ती कविता वाचायची होती असे वर्णन जेव्हा लेखिकेने केलेले दिसतात, तेव्हा महाविद्यालयीन शिक्षणामध्ये साहित्य आणि कविता या दोन्ही बाबीकडे गांभीर्याने पाहणारे शिक्षक आणि विद्यार्थी आपल्या महाराष्ट्रात होते हे आपल्याला कळते. मर्ढेकरांच्या कवितेच्या समीक्षेबाबत इतर नामवंत साहित्यिकांनी केलेले समीक्षा विजया राजाध्यक्ष यांनी अभ्यासली. दि. के. बेडेकर यांच्या साम्यवादी दृष्टिकोनाच्या सारांशातून पृथ्वीवरील वस्तू जाताचा बुद्धीने उपयोग करण्याचे सामर्थ्य मानवी कर्तृत्वात आहे. आजच्या सुशिक्षितांचे वरच्या धनिकांशी वैर आहे. असे विचार मांडले आहेत दा. गो. देशपांडे यांनी मर्ढेकरांच्या कवितेचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला. मर्ढेकरांची कविता एक अभ्यास या शीर्षकांतर्गत धोंडो विठ्ठल देशपांडे यांनीही लेखन केले आहे. शिशिरागमा या काव्यसंग्रहाच्या काळात मर्ढेकर यांच्या जीवनातील काही घडामोडीमधील एक महत्त्वाचे घडामोडी म्हणजे आयसीएसच्या परीक्षेतील अपयश, इंग्लंडहून परत आल्यावर नोकरीसाठी झालेली स्थलांतरित या सर्व कालावधीत तो काळ महायुद्धाचा होता. त्या महायुद्धाचे पडसाद त्यांच्या कवितेत दिसू लागले. ब्रिटिश आपल्या भारताचे राज्यकर्ते होते. त्यांना त्यांच्या देशात चाललेल्या युद्धासाठी देशी सैनिक हवे होते. सैन्य भरती होत होती. १६ रुपये पगार व जेवण फुकट असे प्रलोभन दाखवले जात असे, हे सर्व पाहता गुलामगिरीत राज्यकर्ते भाकरी आणि थोड्याशा पैशासाठी माणसाच्या जीवाची बोली लावत असतात हे आपल्याला लक्षात घ्यावे लागते. पोपटपंची ही एक कविता विजया राज्याध्यक्ष यांनी चर्चेला घेतली आहे त्यात पोपटाला परमेश्वराचे नाव घ्यायचे शिकवायचे जुने दिवस संपले या बाबीचा उलगडा त्या करताना दिसतात.

इंग्रज राज्यकर्ते शिक्षण देत असले तरी ते शिक्षण त्यांना त्यांचे राज्य चालवण्याच्या दृष्टिकोनातून




होते. या गोष्टीला मर्ढेकर यांच्या प्रेमाची लव्हाळे कवितेमधून जसा दुजोरा मिळतो तसे पोपटपंची सारख्या कवितेतून वडारीण म्हणजे श्रमजीवांचे प्रतीक म्हणून मर्ढेकरांनी वापरले आहे. याचा उलगडा विजया राज्याध्यक्ष करतात. सकाळी उठोनी या कवितेमध्ये पांढरपेशा माणूस चाकोरी बद्ध जीवन जगतो ही जाणीवही लेखिकेने टिपलेली आहे.

मर्ढेकरांची कविता भिकारी पोराला पाहून जगातील वैज्ञानिक प्रगतीच्या काही उपयोग नाही असे सांगणारी आहे. परमाणुचे प्रयोग करणारे आम्ही, पोराला अन्नाची भूक आणि आम्हाला मानव्याची होळी. अशा बाबींमधून मर्ढेकर वैज्ञानिक प्रगतीच्या विकासातील फोलपणा आपल्या कवितेत प्रकर्षाने मांडतात. मर्ढेकरांच्या मनामध्ये श्रद्धायुक्त जाणीव आरंभापासून भारतीय तत्त्वज्ञानाच्या संस्कारामुळे त्यांच्यामध्ये ती रुजवली होती शिवाय पाश्चात्य विचाराचे संस्कृत त्यांच्यावर झाले होते. मर्ढेकरांनी या दोन्हीचा ताळमेळ साधनांचा विज्ञान महंत आणि भावनेचे संत या शब्दात विजया राज्याध्यक्ष यांनी त्यांचा उल्लेख केलेला दिसून येतो.

गणपत वाणी या कवितेतील मर्ढेकरांचा काव्य नायक तुकारामाची गाथा वाचताना दिसतो. यातून तुकारामाच्या विचाराचा सामाजिक जीवनावर किती प्रभाव आहे हे त्यांनी प्रतिबिंबित केलेले दिसते. मानवी जीवन अपूर्ण असून त्याला अज्ञानाने ग्रासलेले आहे या भावनेतून मर्ढेकरांची कविता सातत्याने वाचकांशी बोलत असतो. नव्या ज्ञानविज्ञानामुळे व त्यातून झालेल्या विकासातून मानवी दुःख कमी होते असे समजले म्हणजे आत्मवंचना होय असे लेखिकेने मर्ढेकरांच्या कवितेचा दाखला देत म्हटले आहे. ज्ञान विज्ञान उमाळा असलेल्या बऱ्याचशा कविता मराठी क्रांती लिहिल्या आहेत. स्वतःच्या बुद्धीवादी भूमिकेचा आणि वैज्ञानिक भावनांचा उल्लेख मर्ढेकर आपल्या कवितेतून करताना दिसतात. मर्ढेकरांनी विज्ञान युगाबरोबरच यंत्र युगाचा हे बुद्धिवादी भूमिकेतून स्वीकार केला आहे.

**इंजेक्शने वाढे शक्ति। इंजेक्शने जाई भीती**
**इंजेक्शने लठ्ठ होती। बुद्धी स्नायू**

अशा कवितेचा दाखला देतो विजया राज्याध्यक्ष यांनी आधुनिक काळामध्ये इंजेक्शनमुळे शक्ती आणि बुद्धी वाढते असा विचार करणार्या विचारसरणीचा मर्ढेकरांनी केलेला उपवास उलगडून दाखविला आहे. राहू दे जिवंत या कवितेमध्ये ज्ञानप्राप्तीसाठी भक्ती मार्गाचा वापर झालेला दिसतो. मात्र अज्ञानाने तहान शमत नाही आणि ज्ञान प्राप्तीसाठी पारंपारिक मार्ग स्वीकारण्याची तडजोड करता येत नाही. भक्ती आणि ज्ञान या दोन मार्गातील तडजोडीत अडकलेले मत या कवितेतून व्यक्त होताना दिसते. मर्ढेकर आपली बुद्धी कशी असावी याबाबत आपणास कवितेतून बोलतात ते फार महत्त्वाचे आहे.

**धैर्य दे, अन् नम्रता दे, पाहण्या जे जे पाहणे,**
**वाकुदे बुद्धीस माझ्या, तप्त पोलादाप्रमाणे,**

फार गहन असा अर्थ या कवितेतून निघतो, पोलादाप्रमाणे मजबूत आणि बलशाली पण नम्रतेमुळे वाकता येईल अशी बुद्धी कवीला हवी आहे. याठिकाणी तप्त पोलादाच्या प्रतीकातून जेव्हा पोलाद तप्त होते तेव्हा त्याला हवा तसा आकार देता येतो. त्याला हवा तसा आकार देता आला तरच त्याचा उपयोग होऊ शकतो या सर्व जाणिवातून व्यक्तिमत्वातील शांती धैर्य, नम्रता लवचिक व धारदार बुद्धी हे सर्व गुण कवींनी मागितलेले दिसून येतात. मर्ढेकरांचे स्वतःच्या बुद्धीसाठी मागितलेले हे बळकट सूत्र आहे. ही बुद्धी समकालीन वास्तवाशी निगडित असणारे अनेक प्रश्न समजून घेते, विज्ञाननिष्ठ तर्कबुद्धीने अनेक समस्या सोडवू शकते. त्यामुळे ज्ञान आणि बुद्धी याबाबत मर्ढेकरांनी जे मागणी मागितलेले आहे त्याचा विचार केला असता स्व कल्याण आणि समाज कल्याण यासाठी ते रास्त आहे असे दिसते. मर्ढेकरांच्या कवितेत मर्ढे कर गृहगोलाकडे बौद्धिक दृष्टीने पाहतात हे लक्षात घेत असतानाच त्यांच्या काही कवितेतून गणिती प्रतिमा आलेल्या दिसतात...

**आली बेरीज शून्याची। ऊणे चाड अन्यायाची**
**भाग वाण माणुसकीची। गुणा दंभे**

बेरीज वजाबाकी गुणाकार आणि भागाकार या शैक्षणिक गणित विषयातील प्रतिमा कवितेतील नव्या प्रतिमाची सिद्धता स्वतःकडे घेतली आहे. मर्ढेकरांची कविता दुर्बोध आहे असा आक्षेप त्या काळात त्यांच्या कवितेवर घेण्यात आला त्यावर विजया राजाध्यक्ष यांनी मर्ढेकरांचे ललित लेखन वाचकांसमोर नव्हते. त्यामुळे त्यांची कविता तत्कालीन वाचकांना दुर्बोध वाटली असे म्हटले आहे. (पूर्वार्ध)

# वाचावी ज्ञानेश्वरी...

समाजभान

समीर तुर्की

श्री माऊली ज्ञानेश्वर महाराज यांनी श्रीमदभगवद्गीतेवरील इतकी सटीक टीका आपल्याला दिली की त्याच्या आधारावर उभा राहिलेला वारकरी संप्रदाय आपल्याला पुढे जाऊन शिवबा देता झाला. लढवय्येपणा अंगात भिनवून वैयक्तिक पातळीवर निस्वार्थ, निर्व्यसनी, पूर्णतः अहिंसक असलेला वारकरी श्रीतुकोबांनी वर्णिलेल्या प्रमाणे नाठाळ आणि नीच मुस्लिम आक्रमकांच्या विरुद्ध छातीठोकपणे उभा राहिला. टाळ हेच शस्त्र झालं... ध्वजेची काठी हेच अस्त्र झालं... भगवी पताका दिमाखात डोलत राहिली... कधी वारकऱ्यांच्या खांद्यावर तर कधी शत्रूच्या छाताडावर...

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीनंतर साधारण सहा किंवा आठ वर्षांनंतर मुस्लिम आक्रमणे देवगिरीवर येऊन धडकली. त्याच अनुषंगाने प्रत्यक्ष श्रीनामदेवराय भूवैकुंठ पंढरी सोडून थेट पंजाबात २० वर्षे जाऊन राहिले होते. सततची मुस्लिम आक्रमणं आणि त्यांच्यामुळे धूळधाण झालेल्या झालेल्या एकूणच हिंदू समाजाला वारकरी संप्रदायाचे ज्ञानाचे कोंदण लाभले आणि एकूणच गुरुद्वारा आणि सुवर्णमंदिर पुढील काही शतके तरी देशाला टिकवण्यासाठी लढते झाले. नांदेडला गुरुद्वारेचा निम्मा अधिकार आणण्याचं महत्कार्य श्रीनामदास महाराजांनी केलं आणि शिखांच्या काही बावळटपणा करणाऱ्या खलिस्तान वगैरे विचारांच्या लोकांना थेट आणि संपूर्णपणे कधीही शीख समाजाला देशापासून तोडणे शक्य झाले नाही.

महाराष्ट्र धर्म हा मूळ संस्कारच वेदोकोविद आणि समस्त वैष्णव प्रकारांतील अत्युत्तम असणाऱ्या वारकरी संप्रदायाचे देशाला दिलेले सर्वोत्कृष्ट फळ आहे. ह्याच फळांचा गोडवा चाखूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीसमोरच तुकोबांच्या कीर्तनातून जे हवं ते वेचलं. श्री तुकोबांनी स्वतः जातिनिशी पुढचा मंडप बांधून काढला. पेशव्यांच्या राजवटीत पाणदरवाजा तर मराठ्यांच्या पात्याची धार असणाऱ्या शिंद्यांच्या राजवटीपर्यंत महाद्वार उभं राहिलं. हे मी केवळ मंदिराच्या वास्तुबद्दल सांगत नाहीये. जसजशी मंदिराची वास्तू घडवली जात होती तसतशी धर्मसंस्थापना सुद्धा लोकांच्या अक्षरशः अनुभवास येत होती. धर्मसेवेसाठी जर लढवय्येपणा आवश्यक असेल तर तो लढवय्येपणा शुद्ध, समर्थ आणि ओजस्वीपणाने केवळ आणि केवळ वारकरी संप्रदायाचे अनुसरण करणारे आणि महाराष्ट्र धर्म नेमकेपणाने समजून घेणारेच देऊ शकतात. दुर्दैवाने आज वारकरी संप्रदायाचे धुरीण राष्ट्रकारणात मागे पडले आहेत. परिणामी मराठी बाणा जोपासून हिंदूंच्याच देशाला अनेकदा फाळणी आणि त्या बरोबरच अतीव मनुष्यहानीला सामोरं जावं लागलं आहे.

गीता हाच मूळ धर्मधार आहे हे माहीत असणाऱ्या लोकमान्य टिळकांनीच सर्वप्रथम बंगालच्या फाळणीला कृतिशील विरोध केला होता. अनेकांना माहिती नसेल पण लोकमान्य सुद्धा वारकरी संप्रदायाचे पाईक होते. त्यांचे गुरू ब्रह्मर्षी श्रीअण्णासाहेब पटवर्धन हे आळंदीच्या स्वामींचे अर्थात श्रीसद्गुरू नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे पट्टशिष्य होते.

विषय हा आहे की बंगालच्या फाळणीला विरोध केला जात होता. दुर्दैवाने ती झाली आणि नंतर राजकारणाची धूरा महाराष्ट्राच्या हातात उरली नाही. त्या फाळणीनंतर आज अवघ्या एकशे वीस वर्षांत पूर्व बंगाल प्रांतात हिंदूंचे शिरकाण करण्यात आले. ४७ च्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लक्षावधी लोकांना पळवून लावण्यात आले.

लाखो लाखो स्त्रियांवर झालेल्या अत्याचारांची तर साधी नोंदही ठेवली गेली नाही. चिमुकल्या तान्ह्या बालकांना आईबापांसमोर पायाने चिरडून मारल्याचा घटनांना उत आला होता. त्यातूनही कसंबसं स्वतःला सावरून तग धरून राहिलेल्या हिंदू समाजाला दुसरा दणका बसला तो ७१ मध्ये आमार शोनार बांगला म्हणत जे काही सत्तांतर झालं आणि पाकिस्तानला पूर्व पाकिस्तान वरील हक्क सोडावा लागला त्यातदेखील सर्वाधिक जीवितहानी ही तिथल्या हिंदू समाजाचीच झाली होती.

## हे सगळं सांगण्याचं तात्पर्य काय आहे?

१९७१ नंतर बांगलादेशी हिंदूंना अक्कल शिकवण्यासाठी इस्कॉन नामक संस्था बांगलादेशात मोठ्याच प्रमाणात कार्यरत झाली. ७१ मध्ये जी अन्नान दशा बांगलादेशात निर्माण झाली होती त्यासाठी त्या काळात तब्बल २.५ मिलियन डॉलर्स.

आजच्या हिशोबाने ढोबळमानाने तब्बल २११ कोटींहून अधिक रक्कम अन्नदानासाठी उभी करून तिकडे नेऊन मुस्लिम समाजावर खर्ची घातली. ते दान सत्पात्री नव्हतं हे आता तरी इस्कॉनला कळलं असावं. असो.. झालं ते सोडून देऊ..पुढे काय झालं? जर भगवद्गीता जशी आहे तशी याच नावाने छापून ती लोकांना शिकवली जात होती तर मग आज इस्कॉनच्या शिकवणीचा नेमका काय फायदा होतो आहे?

इतकी दशके गीता शिकवला गेलेला समाज इतका हतबद्ध, हताश आणि सामर्थ्यहीन का आणि कशामुळे झाला आहे? जर गीता खरंच जशी आहे तशी च असेल तर गीतेतून समाजाला प्राप्त होणारा पौरुषार्थ आज जरासुद्धा म्हणून का म्हणून दिसून येत नाहीये तिकडे? एक कोटींच्या आसपास उरलेल्या हिंदू समाजाला अक्षरशः नपुंसकत्व दिलेल्या इस्कॉनने आता तर स्वतःच्याही लोकांना वाऱ्यावर सोडल्याच्या बातम्या कानावर पडत आहेत. हे सगळं सांगण्याचा उद्देश हा आहे की नुसती गीता गीता करून उपयोग होणार नाही. जर गीतेचा खरा अर्थ उमगला नाही तर काय होतंय हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोतच. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील सर्वोत्तम आणि सर्वोत्कृष्ट टीका आहे. स्वतः भगवंतांनीच ती आपल्याला दिलेली असल्याने भगवंतांच्या मनाप्रमाणे वागण्याची, धर्मसेवेसाठी उभं राहण्याची सद्बुद्धी ज्ञानेश्वरी वाचूनच आपल्याला मिळणार आहे. श्रीज्ञानेश्वरी आपल्याकडे असतांना आपल्याला इतर कोणत्याही टीकेची वास्तविक पाहता गरजच मुळी नाहीये.

सर्वांना विनंती... कोणाच्याही नादाने वा आवडीने का होईना कोणत्याही प्रकाशनाची गीता वाचत असाल तरीहीसुद्धा त्याचबरोबर ज्ञानेश्वरी वाचायला, समजून घ्यायला सुरुवात करा. काय भेद असतो, का असतो हे स्वतःचं स्वतःला कळून येईल. समस्त वारकऱ्यांनी प्रत्यक्ष मुस्लिम आक्रमणाची तमा न बाळगता सर्वस्व पणाला लावून धर्मरक्षणासाठी जीव ओवाळून टाकला होता. आपल्याला तर तशी कोणती वेळही आलेली नाही नि येणारही नाही.. पण किमान संकट आल्यास कसं वागायचं आहे हे तरी आपल्याला माहिती असायलाच हवंय. धर्म हेच शाश्वत सत्य आहे. त्याचं रक्षण आपलं परम कर्तव्य आहे. जर धर्मरक्षण करायचं असेल तर आपल्याला पुन्हा एकदा महाराष्ट्र धर्म अंगीकारावा लागेल. हा वारकरी संप्रदायाचे विचार आणि आचार हेच आपल्याला खऱ्या अर्थाने तो प्राप्त करवून देऊ शकतो. आचारणशुद्धता राखत, वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान समजून घेऊन जगण्यातच आपलं हीत आहे. लक्षात ठेवा श्रीविठ्ठलाने शस्त्र धारण केलेले नाही. त्याने आपल्यासमोर हात कटीवर ठेवले आहेत. तो सुद्धा वैतागला असेल आपल्या पळपुटेपणाला... त्यामुळे आता आपल्याला वाचवायला आपला देव येत नसतोय. उलटपक्षी आपलाच देव वाचवायला आपल्याला काहीतरी पौरुषत्व गाजवावं लागतंय की काय अशी वेळ येऊ घातली आहे. ह्यापूर्वीही देवांना सुरक्षित स्थळी हलवल्याचा आणि नंतर श्रीनाथमहाराजांच्या पूर्वजांनी श्रीविग्रह पुन्हा पंढरपुरात आणल्याचा इतिहास आहेच आपला...तो अगदी सर्वश्रुत सुद्धा आहेच.

आपल्याला आपल्या संतांनी सर्व काही अगदी भट्टीतून काढलेल्या तत्प दग्ध शुद्ध कांचनाप्रमाणे जेवढं हवं तेवढं सगळं ज्ञान आधीच देऊन ठेवलेलं आहे. आपण त्यातून काही वेचायचं आहे की भलत्याच लोकांच्या वळचणीला जाऊन स्वतःला बांगलादेशी हिंदूप्रमाणे असहाय्य बनवून घ्यायचं आहे हे आता ठरवावं लागेल.

बघा... विचार करा...

एकाच विषयावर मांडले जाणारे अर्थ आणि त्याचं एकूणच परसेप्शन कसं बदलतं आणि त्यातून कसे निकाल लागतात ह्याची दोन उदाहरणे म्हणून हल्लीचे बांगलादेशी हिंदू आणि महाराष्ट्रातील हिंदू ह्या गीताच अभ्यासणाऱ्या लोकांची तुलना करून तुमची तुम्हीच करून बघा... ह्याहून जास्त काही बोलणं नको.

# सीता .... अभिराम भडकमकरांची

पुस्तक परिक्षण

चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

अभिराम भडकमकर. एक नामवंत लेखक, दिग्दर्शक, अभिनेते. सीता, अटॅ एनी कॉस्ट, असा बालगंधर्व आणि इन्शअल्लाह या गाजलेल्या पुस्तकांचे लेखक. या चारही पुस्तकांचे प्रकाशक मराठीतले आघाडीचे प्रकाशक राजहंस प्रकाशन.

सीता...अगदी मोकळेपणाने सांगतो हे पुस्तक पहिल्यांदा हातात घेतले तेव्हा माझी मलाच कल्पना नव्हती की हे पुस्तक मला इतके आवडेल. बसल्या बैठकीत हे पुस्तक वाचून पूर्ण केले असे निदान माझ्याबाबतीत तरी झाले नाही. २५८ पानी हे पुस्तक तसे मी बसल्या बैठकीत सहज वाचू शकलो असतो. पण या पुस्तकाने अनेक ठिकाणी मला वेगळा विचार करायला भाग पाडले. वेगळा विचार... चांगल्या अर्थाने! हा लेखक NSD चा विद्यार्थी असल्याने भारतीय संस्कृती, त्यातही हिंदु संस्कृतीकडे त्या NSD (आणि/किंवा JNU) पद्धतीने बघणार असा माझा पूर्वग्रह होता. पण हे पुस्तक तसे नाही हे पानोपानी पटत जाताना मी विचारात गुंतत गेलो. त्यातून मी हे पुस्तक बसल्या बैठकीत, एका दमात, वाचून पूर्ण करु शकलो नाही. एकदा वाचले. सलग दुसऱ्यांदा वाचले. त्याच भरात तिसऱ्यांदा वाचले. वाचलेल्या पुस्तकाच्या यावेळी कितीतरी वर्षांनी नोट्स काढल्या. आणि अभिराम भडकमकर लिखित इतर ३ पुस्तके विकत घेतली आणि तीही वाचायला सुरुवातही केली...

आज मात्र सीता... हे पुस्तक पहिल्यांदा वाचताना मनात भीती ही होती की एक काळ मराठी साहित्यात असा होता की वेगळ्या मार्गाचे वाटसरू ठरलेल्या व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण करण्याचे मार्ग प्रशस्त होत होते. तसेच हे पुस्तक असेल का? म्हणजे नाव सीतेचे आणि चरित्र रावणाचे... काही प्रमाणात कैकयीचे या पुस्तकातले चित्रण तिच्या रूढ प्रतिमे बाहेरचे या पुस्तकात जरूर येते...पण ते मर्यादित आहे. या पुस्तकातलेच तिच्याबद्दलचे वाक्य उपयोगात आणत कैकयीचे वर्णन करायचे झाले तर...कैकयीचे रणांगण वेगळेच होते!

दुसऱ्यांदा वाचायला सुरुवात करताना आता कथानक माहित झाल्याने असेल पण माझ्या मनात शंका की हे पुस्तक आत्ताच का प्रकाशित केले असावे? ७ जानेवारी २०२४ ला पहिली आवृत्ती आणि मे २०२४ ला दुसरी आवृत्ती प्रकाशित झालेले हे पुस्तक अयोध्या राममंदिराने निर्माण केलेल्या वातावरणाचा पुस्तकविक्रीसाठी उपयोग करून घेण्याचा मुहूर्त तर गाठत नाहीये ना? हे पुस्तक तिसऱ्यांदा वाचायला सुरुवात करताना हे दोन मुद्दे डोक्यात नसल्याने जे वाटले ते शब्दबद्ध करण्याचा खटाटोप म्हणजे हे लेखन... हे पुस्तक सलग तीन वेळा वाचताना मनात सतत आलेला विचार म्हणजे या पुस्तकात साहजिकच सीतेचे वर्णन अनेक ठिकाणी अनेक वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळ्या शब्दात केले आहे. न बोलताही काय आणि कसे सांगायचे हे उमगलेली, पृथ्वीचे लघुरूप, दाहक पवित्रता, निगर्वी विनम्रतेचा पुतळा, बुद्धिगर्भ तेज, ठाम वैचारिकता, बुद्धिवंता, आभाळाची स्थितप्रज्ञता, कालजया, कालातीत वगैरे वगैरे...पण त्यातील मला सगळ्यात जास्त आवडलेले वर्णन म्हणजे सीतेचा डोहच वेगळा होता. मला हे वर्णन इतके आवडले की माझी लेखकाशी (अभिराम भडकमकर यांच्याशी) जरासुद्धा ओळख नसताना त्यांना (आणि प्रकाशकांना) ईमेल पाठवून विनंती केली की या पुस्तकाची पुढच्या आवृत्त्या काढाल तेंव्हा या पुस्तकाला उपशीर्षक (Sub Title) द्या....तिचा डोहच वेगळा असे!

आनंदाची गोष्ट म्हणजे अभिराम भडकमकराना ही विनंती आवडली असावी. कारण त्यांनी उत्तरात पाठवलेल्या ईमेलमधे सांगितले की त्यांना ही विनंती अतिशय आवडली असून ते पुढील आवृत्तीत नक्की असा बदल करतील आणि ते याबाबतीत प्रकाशकांशी निश्चितच बोलतील. अभिराम भडकमकरांच्या या उत्तराने माझी भीड जरा जरूरीपेक्षा जास्तच चेपली गेली असावी आणि त्यामुळे हे पुस्तक सलग ३ वेळा वाचताना माझ्या मनात उद्भवलेले काही मुद्दे आता मांडण्याचा प्रयत्न करतो.

या पुस्तकाची सुरुवातच होते मुळी ती डॉ. अरुणा ढेरे, डॉ. सुचेता परांजपे, मंगला गोडबोले आणि डॉ. शमसुदिन तांबोळी यांच्या अभिप्रायाने...त्यातही या पुस्तकाचा पहिला छापील शब्द सीता शक्ती! डॉ. अरुणा ढेरे यांच्या अभिप्रायाची सुरुवातच मुळी या शब्दाने होते. या पुस्तकाचा दुसरा परिच्छेद हा डॉ. मंगला गोडबोले यांचा अभिप्राय आहे. त्यातली पाहिलीच ओळ म्हणते सक्षम विचारी सीता! या नंतरचा या पुस्तकाचा परिच्छेद म्हणजे मंगला गोडबोले यांचा अभिप्राय. त्यात त्या म्हणतात... कूटनीती निपुण सीता! त्यानंतरच्या पानावर डॉ.तांबोळी म्हणतात.. स्वयंभू, प्रगल्भ, कणखर, राजनीती! यानंतर मूळ पुस्तक सुरू होत नाही. त्याऐवजी येतात शिरीष सहस्त्रबुद्धे यांचे आस्वादाचे चार शब्द या पाचही गोष्टीतील शब्द न शब्द वारंवार वाचण्याजोगा आहे. पण हे सगळे वाचताना दोन गोष्टी सारख्या मनात येतात... त्यातली पहिली गोष्ट म्हणजे आता आपल्या मराठी पुस्तकांच्या मांडणीवरही समाज माध्यमांचा प्रभाव दिसायला लागला की काय? कारण हे ५ भाग म्हणजे यू ट्यूब चॅनलवरच्या व्हिडीओला असतात तशा Thumbnail सारखे झाले आहेत. पण हा जर उद्देश असेल तर मग गंमत आहे.त्याव्यतिरिक्त मुळातच अभिराम भडकमकर यांचे हे पुस्तक इतके उत्तम आहे की ते स्वतःच्या जीवावर हमखास यशस्वी होईल. याबाबतचा माझ्या डोक्यात आलेला दुसरा मुद्दा म्हणजे हे पाचही भाग पुस्तकाच्या सुरुवातीलाच कसे काय आले? हे भाग सुरुवातीलाच आल्यामुळे संपूर्ण नाटकाची संहिता पडदा उघडल्या उघडल्या पहिल्याच अंकाच्या पहिल्याच प्रवेशातील पहिल्याच खटकेबाज संवादात उघड झाल्यासारखें झाले. अभिराम भडकमकर यांच्यासारखा नामवंत नाटककार या पुस्तकाचा लेखक असताना आणि राजहंस प्रकाशन सारखे चोखंदळ, जाणकार, कार्यक्षम प्रकाशक असताना हे असे कसे काय झाले? हे ५ भाग पुस्तकाच्या सुरुवातीला न घेता परिशिष्ट म्हणून पुस्तकाच्या शेवटी घेतले तर! त्यातून पुस्तकाचा पेपरही फुटणार नाही आणि वाचक त्याच्या मनानुसार अर्थ लावत पुस्तक वाचेल. गणितात शेवटी ठोकताळा किंवा अकाउंट्समधे शेवटी ताळेबंद येतो तसे हे अभिप्राय शेवटी आले तर माझ्यासारखा सर्वसामान्य वाचक आपापले मत या नामवंतांच्या मताशी ताडून पाहण्याचाही आनंद त्यातून घेऊ शकेल...

या पुस्तका विषयी मनात आलेले काही प्रश्न मांडतो...

१. सर्वसाधारणपणे सीतेची जी सोशिक प्रतिमा आजपर्यंत अनेकदा रंगवली गेली त्यापेक्षा पूर्ण वेगळी प्रतिमा मांडावी असे अभिराम भडकमकर सराना का आणि कसे सुचले?

२. लहानपणापासून आजपर्यंत अनेकदा आपण सगळे असे वाचत वयाने लहानाचे मोठे झालो की ज्या मांडवात राम व लक्ष्मण यांची लग्ने झाली त्याच मांडवात भरत व शत्रुघ्न यांचीही लग्ने झाली. हे पुस्तक याबाबतीत काही वेगळे चित्र सांगते. हे साहित्यिक स्वातंत्र्य की अजून काही?

३. एक वाचक म्हणून अनेकदा आलेला अनुभव असा की रामायण संबंधी पुस्तकात शत्रुघ्न आणि महाभारत संबंधी पुस्तकात नकुल व सहदेव हे बऱ्याच वेळा एकतर अनुल्लेखाने तरी मारले जातात नाहीतर कमीत कमी शब्दात त्यांची बोळवण केली जाते. सीतेचा इतका चांगल्या पण वेगळ्या पद्धतीने विचार करणारे हे पुस्तक शत्रुघ्न बाबत मात्र मळलेल्या वाटेनेच का जाते? अगदी जेमतेम एकदा, तेही एका वाक्यात त्याचा उल्लेख येतो या पुस्तकात...

हे पुस्तक वाचताना मनात आलेल्या काही प्रश्नांपैकी हे काही मोजके, नमुन्यादाखल प्रश्न... हे पुस्तक मला आवडण्याचे सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे या पुस्तकातील नायिकेचा काळ खूप जुना आहे. पण या पुस्तकाचे वैशिष्ट्य हे आहे की या पुस्तकातील अनेक मुद्दे, अनेक वाक्ये वाचकाला अलिकडच्या काळातील घटनांचा विचार करायला उद्युक्त करतात. असे काही मुद्दे याप्रमाणे....

(पान ६ वर)

**विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथील गडावरील प्राचीन राम-सीता मंदिर सुप्रसिद्ध आहे. छोट्या टेकडीवर हे मंदिर असल्याने त्यास 'गड मंदिर' म्हणूनही ओळखले जाते. वनवास काळात श्रीराम, सीता व लक्ष्मणाचे काही काळ या टेकडीवर वास्तव्य होते. येथेच श्रीरामाची व ऋषी अगस्त्य मुनींची भेट झाली. त्यांनी रामास ब्रह्मास्त्रासह अनेक अस्त्रे दिली. गडमंदिर हे अनेक देवदेवतांच्या मंदिरांचे भव्य-विस्तीर्ण असे संकुल आहे. विशेष म्हणजे लक्ष्मणाचे येथे स्वतंत्र मंदिर आहे. कवी कुलगुरू कालिदासाचा तसेच प्राकृत मराठीत 'सेतुबंध' काव्य लिहिणार्या राजा प्रवरसेनाचा या स्थानाशी संबंध आहे.**

लेखांक ४८

# महाराष्ट्रातील प्रमुख राममंदिरे

## रामटेकचे राम सीता आणि लक्ष्मण मंदिर

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



त्रेता युगात श्रीरामाचा वनवास काळात भारतातील अनेक स्थानांशी निकट संबंध आला, अनेक स्थळे रामाच्या पावन वास्तव्याने पुनीत झाली, त्या स्थानांपैकी महाराष्ट्रातील नाशिक पंचवटी सर्व परिचित आहे. तसेच आणखी एक स्थान महाराष्ट्र भूमीत आहे, ते म्हणजे विदर्भातील नागपूर जवळचे रामटेक. या टेकडीवर वनवासी राम-सीतेचे ४ महिने वास्तव्य होते. हे स्थान नागपूरपासून सुमारे ५० कि.मी. वर आहे. या टेकडीजवळ 'सूर' नदीच्या काठी थोर ऋषी अगस्ती यांचा आश्रम होता. श्रीराम व अगस्ती ऋषींची येथेच भेट झाली. येथेच अगस्ती ऋषींकडून श्रीरामास ब्रह्मास्त्र प्राप्ती होते.

'रामटेक'हे नाव या टेकडीला रामाच्या वास्तव्याने पुनीत झाल्यामुळेच प्राप्त झाले असे अभ्यासकांचे मत आहे. यापूर्वी या १०० मीटर उंचीच्या छोट्या टेकडीला 'सिंदुरगिरी' म्हणून ओळखले जात होते. नाशिकच्या 'काळाराम मंदिर' प्रमाणेच 'रामटेक राममंदिर' हे महाराष्ट्रातील एक प्राचीन राममंदिर आहे. सध्या जे विद्यमान मंदिर पाहतो ते सुमारे ६०० वर्षे प्राचीन आहे. या भागावर इ.स.२५० मध्ये मौर्य वंशीय राजघराण्याचे अधिपत्य होते. त्यानंतर सातवाहन राजघराण्याने काही काळ अधिपत्य मिळवले. त्यानंतर काही काळ वाकाटक राजघराण्याच्या ताब्यात हा भाग आला होता. राजा प्रवरसेनची या भागातच 'मनसर' तथा 'प्रवरपूर' येथे राजधानी होती. या राज घराण्यातील द्वितीय प्रवरसेन हा साहित्य, कला, संगीत प्रेमीच नव्हे तर निष्णात, पारंगत होता. प्राकृत महाराष्ट्री भाषेत या द्वितीय प्रवरसेन राजाने, रामायणावर आधारीत 'सेतूबंध' महाकाव्य लिहिलेले आहे. त्याविषयीचा स्वतंत्र लेख या लेखमालेत प्रकाशित झालेलाच आहे. महाराष्ट्री प्राकृत साहित्यातील पहिल्या रामकथेचा मान या 'सेतुबंध' महाकाव्याला आहे. संस्कृत महाकवी कवी कुलगुरू कालिदासाचेही या रामटेक टेकडीच्या परिसरात काही काळ वास्तव्य होते. राजा प्रवरासेन (द्वि) आणि कवी कालिदास हे साहित्यप्रेमी मित्र होते. रामटेकच्या निसर्गरम्य अशा वृक्षराजीने नटलेल्या परिसरातच कालिदासाने 'मेघदूत' या जगविख्यात संस्कृत काव्याची रचना केलेली आहे. सध्या तेथे 'कालिदास स्मारक' आणि कवी कालिदास विद्यापीठ याद्वारे कालिदासाच्या संस्मरणीय स्मृती जतन केलेल्या आपण पाहू शकतो. तसेच आयुर्वेदाचार्य नागार्जुन यांची रामटेक ही कर्मभूमी मानली जाते. महानुभव भक्ती पंथाचे संस्थापक स्वामी चक्रधर हे गुजरात मधील भरूच (भडोच) मधून महाराष्ट्रात येऊन याच टेकडीवर १० महिने राहिले होते. 'लीलाचरित्र' ग्रंथामध्ये त्याचा उल्लेख आहे.


### अनेक मंदिरांचा समूह : मंदिर संकुल

रामटेकवर सध्या आपण जी मंदिरे पाहतो, ती ६०० वर्षे प्राचीन आहेत. सुमारे ३०० वर्षापूर्वी नागपूरकर राजे रघुजी भोसले यांनी या मंदिरांचा व गडकोटांचा जीर्णोद्धार-पुनर्बांधणी केलेली आहे. नागपूरकर भोसले राजांनी हा परिसर व गड छिंदवाडराजांच्या ताब्यातून मिळवला होता. श्रीराम-सीता मंदिर ज्या गडावर आहे ती टेकडी केवळ १००-१५० मीटर उंचीची छोटी टेकडी आहे. गडाच्या पश्चिम व दक्षिण बाजू निसर्गतःच संरक्षित आहेत तर उत्तर आणि पूर्वे वर दुहेरी तटबंदी आहे. दोन भक्कम तटबंदीमधील विस्तीर्ण परिसरात पश्चिम भागात श्रीराम-सीता यांचे मंदिर आहे. टेकडीच्या पश्चिम बाजूने वर जाण्यास सुमारे ७०० पायऱ्या आहेत. अर्थात नव्या साईसुविधांमुळे टेकडीवर मंदिरापर्यंत मोटारने जाता येते. गडावर फार जुने तळे असून जवळच नृसिंहाचे मंदिर आहे. राममंदिर आदी मंदिर संकुलांचा परिसर 'देऊळवाडा' म्हणून ओळखला जातो. मुख्य महादरवाजा 'वराह महाद्वार' म्हटले जाते. या महा दरवाजाला लागूनच, भगवान विष्णुंच्या वराह अवताराची मूर्ती आहे. त्यानंतर तीन प्रवेशद्वारे ओलांडून आपणास जावे लागते. प्रथम तटबंदीला 'सिंधूपूर दरवाजा' आहे. द्वितीय तटबंदीला 'भैरव दरवाजा' आहे. त्याशिवाय एक गोकुळ दरवाजा पण आहे. देऊळवाड्यात अनेक मंदिरे आहेत. त्यात राजा दशरथ आणि रघुकुल गुरू वसिष्ठ ऋषी यांचे स्वतंत्र मंदिर आहे. तसेच श्री लक्ष्मणाचेही स्वतंत्र मंदिर आहे. महाराष्ट्रातील हे एकमेवाद्वितीय लक्ष्मण मंदिर म्हणता येईल. लक्ष्मण मंदिर पुढे असून त्यामागे श्रीराम-सीता यांचे मुख्य मंदिर आहे. त्याशिवाय महादेव मंदिर आहे, नंदीचे स्वतंत्र मंदिर आहे. अष्टभुजा गणेशाचे देऊळ आहे. एवढेच नव्हे तर येथील धुमेश्वर महादेव मंदिर शंबुकाची ही मूर्ती आहे. या सर्व मंदिरांची शिखरे भूमिज शैलीतील आहेत. लक्ष्मण मंदिर आणि गोकुळ दरवाजावरील कोरीव नक्षीकाम अभिजात शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. मंदिराची शिखरे, उपशिखरे, मंडप, मंडपातील खांब, खिडक्याच्या दगडी कोरीव नक्षीदार जाळ्या, सज्जे, छत्र्या, कमलपुष्पे, वेलबुट्या सारे काही नयनमनोहर आहे. हिंदू मंदिरांनी शिल्पकला कशी जतन व उन्नत केली त्याचे ही मंदिरे अनुपम दर्शन आहे. १२व्या शतकातील महानुभव भक्ती पंथीय ग्रंथामध्ये रामटेक राममंदिरात साजरा झालेल्या 'रामनवमी' उत्सवाचा उल्लेख आहे. यावरून हे सिद्ध होते की येथील रामनवमी उत्सवास ९ शतकाची प्रदीर्घ परंपरा आहे. येथे रामनवमीचा मोठा उत्सव होतो, त्याशिवाय त्रिपुरी पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते. सारा गड-परिसर भाविक श्रद्धावंतांनी फुलून जातो. त्रिपुरी यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे रात्री १२ वाजता मंदिराच्या सर्वात उंच शिखरावर त्रिपुर प्रज्वलित केला जातो. तो सोहळा पाहण्यास हजारो भाविक रात्री गडावर गर्दी करतात.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग २५)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथ टागोर यांच्या१९१६ मध्ये दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या त्यापैकी एक होती 'घरे बाहिरे 'आणि दुसरी होती 'चतुरंग.' ही एक सामाजिक कादंबरी आहे. या कादंबरीत नावाप्रमाणेच चार व्यक्तींच्या स्वभावाचे चार रंग रवींद्रनाथांनी दाखवले आहेत. या चारही व्यक्ती म्हणजे गाव-ोगावी फिरणारे आणि कीर्तन करून समाज प्रबोधन करणारे कीर्तनकार आहेत. जेव्हा व्यक्तीच्या जीवनात संघर्ष सुरू होतो तेव्हा मानसिक संतुलन राखण्यासाठी व्यक्ती जी प्रयत्नांची पराकाष्ठा करते, त्याचे सूक्ष्म चित्रण या कादंबरीत रवींद्रनाथांनी केले आहे. त्यातून त्यांचा मानवी स्वभावाचा सूक्ष्म अभ्यास दिसून येतो.

रवींद्रनाथांच्या कादंबर्यांमध्ये 'गोरा' या कादंबरीचा अपवाद वगळला तर अनेक साहित्य रसिकांना त्यांची 'चतुरंग' ही कादंबरी खूप भावते. टागोरांच्या 'घरे बाहिरे' या कादंबरीला बंगालच्या फाळणीची पार्श्वभूमी आहे. या कादंबरीत निखिल, संदीप आणि विमला अशी तीनच पात्रे आहेत. त्यांच्या आत्मनिवेदनातून ही कादंबरी पुढे जात राहते. या कादंबरीत रवींद्रनाथांनी व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांचा परस्पर संबंध चितारला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाचे सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य, निरक्षरता, स्त्रियांचे प्रश्न, नैतिकता धार्मिक रुढी आदी अनेक समस्या नवभारताचे निर्माण करू पाहणार्या समाजसुधारकांसमोर होत्या. या कादंबरीत निखिल, विमला आणि संदीप यांच्या स्वभावाचे मनोरम चित्रण रवींद्रनाथांनी केले आहे. निखिल हा एक स्वतंत्र विचारांचा आणि उमद्या मनाचा तरुण आहे. त्याचे जसे आपल्या राष्ट्रावर प्रेम आहे तसेच आपल्या पत्नीवर देखील आहे. आपल्या पत्नीचे निर्व्याज आणि नैसर्गिक प्रेम त्याला हवे आहे. हे प्रेम कोणत्याही दबावातून किंवा रुढीपरंपरेतून आलेले नसावे असे त्याला वाटते. त्यामुळे आपल्या पत्नीला तिच्या मनाप्रमाणे वागण्याचे तो पूर्ण स्वातंत्र्य देतो.

संदीपचे व्यक्तिमत्व मात्र पूर्णपणे राजकीय पुढार्यासारखे आहे. सत्य, अहिंसा, मानवता, नीतिमत्ता यासारखी अनेक मानवी मूल्ये गुंडाळून ठेवून तो जहाल राष्ट्रवादाचा अवलंब करतो आणि लोकांना भडकावणारी भाषणे करतो. त्यातून तो आपला राजकीय फायदा करून घेत असतो. त्यासाठी तो अनेक भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करतो त्याचे हे वागणे निखिलला अजिबात पसंत नसते. पण निखिलचे दुर्दैव हे की त्याची बायकोच संदीपच्या जाळ्यात अडकते. संदीपच्या भाषणांना भुलून जाऊन ती त्याच्याकडे ओढली जाते. प्रसंगी आपल्या पतीला भ्याड, नामर्द, दुर्बल आणि राष्ट्रद्रोही म्हणण्यापर्यंत तिची मजल जाते. आपल्याच घरातील पैसे चोरून नेऊन ती संदीपला देत असते. त्यामुळे निखिल आणि विमला यांचा संसार मोडण्याची वेळ येते. परंतु अशावेळी निखिल आपल्या मनावर ताबा ठेवतो. तो स्वतःचा संयम सुटू देत नाही. पुढे कालांतराने विमलाला संदीपचे सत्य स्वरूप कळते आणि आपल्या वागण्याचा तिला पश्चाताप होतो आणि मग ती निखिलला शरण जाते. पण त्यांचा संसार मात्र पुन्हा रुळावर येऊ शकत नाही. धार्मिक दंगलीत स्त्रियांना सोडवण्यासाठी धावून गेलेल्या निखिलवर प्राणघातक हल्ला होतो आणि त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू होतो आणि विमलाच्या नशिबी विधवेचे जिणे येते. अशी ही सामाजिक विषयांना स्पर्श करणारी अप्रतिम कादंबरी. या कादंबरीला स्वदेशी चळवळीची पार्श्वभूमी सुद्धा आहे. गांधीजींच्या स्वदेशी चळवळीत रवींद्रनाथांनी सुद्धा भाग घेतला होता. त्यातून आलेल्या अनुभवाचे प्रतिबिंब या कादंबरीत पाहायला मिळते. रवींद्रनाथांच्या मते केवळ विदेशी मालाची होळी करून भागणार नाही तर स्वदेशी वस्तू निर्माण करण्याचे कारखाने सुरू होणे आवश्यक आहे. स्वदेशी वस्तू मुबलक, उत्तम दर्जाच्या आणि स्वस्त मिळणे आवश्यक आहे, म्हणजे लोकांचा विदेशी वस्तूंचा वापर कमी होईल. बळजबरीने एखाद्या विदेशी वस्तू विकणाऱ्या दुकानावर आक्रमण करून त्यातील माल आणि दुकान जाळणे हे त्यांच्या दृष्टीने नैतिकदृष्ट्या अयोग्य आहे. या कादंबरीतील संदीपच्या मते राष्ट्रभक्ती ही भीतीच्या भावनेतूनच निर्माण होऊ शकते त्यामुळे अशा प्रकारची दहशत तो विदेशी माल विकणाऱ्या दुकानदारांना बसवू इच्छितो. जगाच्या इतिहासातील हिटलर आणि मुसोलिनी ही अशाच प्रकारची उदाहरणे आहेत. रवींद्रनाथ यांची 'शेषेर कविता' ही एक आगळी वेगळी कादंबरी आहे. या कादंबरीत गद्य आणि पद्य शैलीच्या सुरेख संगम आहे. कुमुदिनी ही या कादंबरीची नायिका आहे. ती साध्या सोज्वळ भारतीय पतिव्रता स्त्रीचे प्रतिनिधित्व करते. तिचा पती मधुसूदन हा मात्र अत्यंत जुलमी, क्रूर आणि स्वार्थी आहे. त्याच्या अत्याचारांना कंटाळून ती माहेरी निघून जाते. पण माहेरी गेल्यानंतर आपल्या पोटात मधुसूदनचा गर्भ वाढतो आहे हे तिच्या लक्षात येते आणि ती पुन्हा सासरी परत येते पण परत आल्यावर तिच्या लक्षात येते की तिच्या गैरहजेरीत तिच्या पतीने त्याच्या भावजयीला जवळ केले आहे. हे समजल्यानंतर तिला फार मोठा धक्का बसतो. भारतीय पतिव्रता स्त्रीची ही कहाणी रवींद्रनाथांनी अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. 'चार अध्याय' ही रवींद्रनाथ यांची शेवटची कादंबरी. १९२० मध्ये गांधीजींनी असहकार चळवळीची सुरुवात केली होती. या चळवळीचा परिणाम म्हणजे बंगालमध्ये देखील क्रांतीची लाट उसळली. या घटनेची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. राष्ट्रभक्ती म्हणजे काय? राष्ट्र कसे बनते? केवळ घोषणाबाजी, कठोर शिस्त यातून खरे स्वातंत्र्य शक्य आहे काय? अशा अनेक प्रश्नांचा धांडोळा ही कादंबरी घेते. रवींद्रनाथांनी त्यांच्या कादंबऱ्याचे अनेक वेळा वाचन केले होते.

रवींद्रनाथांचे समकालीन असलेले शरदचंद्र बाबू सुद्धा बंगालमध्ये एक प्रतिष्ठित कादंबरीकार म्हणून मान्यता पावले होते. अशा या वातावरणात रवींद्रनाथांनी कादंबरी लेखनाला सुरुवात केली आणि आपल्या आगळ्यावेगळ्या लेखनशैलीने आणि प्रतिभेने स्वतःचे एक स्वतंत्र स्थान निर्माण केले. रवींद्रनाथांच्या कादंबरी लेखनाबद्दल शरदचंद्र बाबूंनी सुंदर उद्गार काढले आहेत ते म्हणतात की मी रवींद्रनाथ यांची 'गोरा' ही कादंबरी अनेक वेळा वाचली किंबहुना तिचे पारायण केले. हिंदू धर्म म्हणजे काय हे कदाचित स्वामी विवेकानंद, डॉ. राधाकृष्णन यांच्यासारख्या विद्वानांची पुस्तके वाचून समजणार नाही ते हिंदू धर्माचे रूप 'गोरा' या कादंबरीतील आईचे चरित्र वाचून आपल्या डोळ्यासमोर स्पष्टपणे उभे राहते. रवींद्रनाथांच्या लेखणीची ही ताकद आहे. कोणत्याही श्रेष्ठ कादंबरीकाराला हेवा वाटावा अशा प्रकारचे हे त्यांचे सामर्थ्य आहे. कादंबरीकार म्हणून रवींद्र नाथांचे साहित्य जगतावर मोठेच ऋण आहे हे मान्य केले पाहिजे.

# जन्मतारखेच्या चित्तरकथा



अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

साधारणपणे पन्नास, साठ वर्षापूर्वीच्या जन्मतारखेच्या एकेक कथा आपण ऐकल्या की त्या कालावधीत जन्माला आलेल्या बालकांच्या जन्माचीच एक व्यथा डोळ्यासमोर उभी राहते. जर एवढा घोळ घालून ठेवला आहे तर त्याआधारे जन्मकुंडली काढणे म्हणजे एक महाभयंकर विनोद होऊ शकेल. अर्थात त्या शास्त्रावर कोणी किती विश्वास ठेवावा किंवा ठेवू नये? हा ज्याचा त्याचा व्यक्तीगत प्रश्न आहे.

लोकशाहीत प्रत्येकाच्या मताला महत्व आहे. त्यामुळे त्याच्या विचाराला आणि कृतीलाही तेवढेच महत्व असले पाहिजे. प्रत्येकाने एखादा विचार किती स्विकारावा किंवा किती नाकारावा किंवा त्याचे संपूर्ण समर्थन करावे किंवा त्या विचाराला प्रखर विरोध करुन आपला परिवर्तनवाद जनमानसावर ठसवावा. हा अधिकारही आपल्याला लोकशाहीने अर्थातच घटनेने दिला आहे. त्यामुळे त्या स्वातंत्र्याचा लाभ आपण पदरी पाडून घेतलाच पाहिजे. आज सार्वभोम लोकशाहीत हेच सुरु आहे. तर असो!

आपला विषय असा आहे की साठ वर्षापूर्वी पालकांचे असणारे प्रचंड अज्ञान, प्राथमिक शाळेतील गुरुजीवर असणारा संपूर्ण विश्वास, आई म्हणते, अहो हा व्हयं दिवाळीतचं झाला होता. तर वडील म्हणतात नाही...नाही... तुलं काही आठवतं नाही ते व्हयं शिमग्यालं झाला होता. आई जीवं तोडून सांगते, अहो याच्या जन्माच्या येळंला दिवाळीचे फटाके फुटत होते. वडील गुरुजींना सांगतात, अहो गुरुजी मलं चांगलं आठवते शिमग्याच्या येळला पोट्टे बोंब मारायलं आले होते. तवा झालं होतं हे काट्टं! त्यावर गुरुजी लगेच तोडगा काढतात. हे पहा तुम्हाला दोघांनाही काही कळतं नाही आणि तुमच्या लक्षातही नाही. ए मुला ईकडे ये. भिंतीजवळ उभा रहा. डाव्या हाताने उजवा कान पकड़ आणि आता उजव्या हातानं डावा कान पकडं. शाब्बास चला. वर्ष लक्षात आलं. तारीख जून महिण्यातली टाकतो, म्हणजे लेकराचं वर्ष वाया जाणार नाही.

गुरुजींच्या निर्णयामुळे एकदाची सुटका झाली अन् पुन्हा त्याह्यनं लेकराचं नुकसान पण होवू देलं नाही. त्यामुळे गुरुजीचे डोंगराएवढे उपकार घेवून जगतात हे अडाणी पालकं, पण या जन्मतारखेच्या चित्तरकथेमुळे अनेकांचे अनेक प्रकारचे फायदे तोटे कसे झाले आहेत? आमचे एक सर आम्हाला त्यांच्या जन्मतारखेची गम्मत सांगायचे, बालपणी शेतात काम करताकरता आणि गुरं वळतावळता माझं वय दहा वर्षाचं कसं झालं? हे बापाच्या लक्षातच आलं नाही. माझ्या लक्षात येण्याचा काही प्रश्नच नव्हता. त्यावेळी वाढदिवस साजरा करणे हा प्रकार ग्रामिण भागात नव्हताच. फार श्रीमंताच्या एखाद्या दुसर्या घरी तो प्रकार असेलही पण गावात वाढदिवस प्रकार औषधालाही नसायचा.

त्याविषयी पालकांचे असलेले अज्ञान आणि पोटाची खळगी भरण्याचा ज्वलंत प्रश्न, समोर रौद्र रुप धारण करुन उभा असल्यामुळे असले कौतुक सोहळे साजरे करण्याचा विचार कोणाच्याही डोक्यात येणं शक्य नव्हतं. योगायोगाने लक्षात आले तरी तो साजरा करणार कसा? मुलगा बराच मोठा झाला हे शेवटी गुरुजींच्याच लक्षात आलं. गुरुजी म्हणाले, याच वय किती? आता हे पालक अडाणी असले तरी चतुर होते. ते म्हणाले, टाका नं गुरुजी सहा वर्षे गुरुजी तात्काळ म्हणाले, अहो चांगला दहा वर्षाचा दिसतो की हा टोणगा. त्यावर हे चतुर पालक लगेच म्हणाले, अहो गुरुजी त्यो म्हशीच्या माघं असतोया. त्याच्यामुळं ते वगारं दिवसभर म्हशीचं दूध पितयं की. आणं पह्याटं उठलं की भीजवलेली उडदाची दाळं सनकावून हाणतंय. आपल्याकडं खाण्यापिण्याची काही हयगय नाही बघा. दिवसभर म्हशी माघं राहूनं कुस्त्या खेळतयं अन् भांडण करुन घरला येतंय. त्याच्यामुळं आसं ठोमश्या हाडाचं दिसतंय, पण हायं ते फक्त सहाचं वर्षाचं. अशी शिफारस पालकांनी केल्यावर आमच्या त्या प्राध्यापक सरांचा त्यावेळी पहिल्या वर्गात प्रवेश आणि वयाची नोंद सहा वर्षे अशी झाली. त्यामुळे या महाशयांची नोकरी ३६ वर्षाची होवून अगदी सन्मानानं वयाच्या ६४ व्या वर्षी ते निवृत्त झाले. पण असे उदा. अगदीच अपवादात्मक.

आमच्या पक्याच्या जन्मतारखेची चित्तरकथा तर फारचं अफलातून, त्याच्या टिसीवर तारीख १२ जून १९६०, त्याच्या बापाच्या डायरीत लिहून ठेवलेली २८ जुलै १९६० आणि आई सांगायची, हेव दिवाळीच्या टायमाले झाला होता. त्याचं लग्न होईपर्यंत त्याचा वाढदिवस साजरा करण्याचा काही प्रश्नच नव्हता. पण त्याचं लग्न झालं.

बायको मोठी हौशी मिळाली. त्यात ती तहसिलदार साहेबाची कन्या. आपल्या नवर्याचा वाढदिवस चांगला दणक्यात साजरा झाला पाहिजे अशी तीची मनातून ईच्छा होती. पण तारीख १९६० मधली नेमकी कोणती? आई सांगते दिवाळीच्या टायमाले, त्या तारखेचा काही पत्ताच नव्हता. नेमकं कोणत्या तारखेला जन्मालं आलं हे बेनं? हा मोठ्ठा प्रश्न तिच्यासमोर उभा राहायचा.

आपल्या मनातली हौस मनातच मारुन टाकावं लागते. असं स्वगत करुन ती ओरडून विचारत होती. आवं तुम्ही कधी झाले होते? या प्रश्नाचं उत्तर पकोबा कसं काय देणार बरं मंडळी? तेंव्हा आमचे पकोबा. हसून म्हणायचे. हे बघ पुलं देशपांडे म्हणायचे, माझ्यात आणि शिवाजी महाराजात एक साम्य आहे. त्यांना गुढगी रोग होता. मलाही आहे. तसे माझ्यात आणि शिवाजी महाराजातही एक साम्य आहे. त्याची बायको चिडून म्हणायची, कसलं साम्य आहे हो? काही बाता ठोकता आपल्या? त्यावेळी आवेशपूर्ण आवाजात तो म्हणायचा, इतिहासात महाराजांच्या तिन जन्म तारखा सापडतात आणि माझ्याही... आणि तुला वाढदिवस साजरा करण्याची एवढी हौस आहे तर माझे वर्षातून तिन वाढदिवस साजरे करायला काय हरकतं आहे? बालपणी आईवडील तो कौतुक सोहळा साजरा करु शकले नाही. आता तू तो सर्व कोरम पूर्ण करुन टाकं. त्यावर त्याच्या बायकोची विनोद वृत्ती जागृत व्हायची.

काहीच हरकतं नाही पती परमेश्वरा, पण त्यासाठी तुम्ही एकाच वर्षात तीन वेळा जन्माला आलातं हे अगोदर तुम्हाला सिद्ध करावं लागेलं. यावर पकोबा निशब्द व्हायचा, कारण हा प्रयोग तो जगातल्या कोणत्याच प्रयोग शाळेत सिद्ध करु शकत नव्हता. आपल्याला आपली खरी जन्मतारीख सुद्धा माहित नसावी. याविषयी त्याला मनोमन खंत वाटायची. पण त्याचे आईवडील अडाणी होते. यात त्यांचा काहीच दोष नव्हता किंवा पकोबाचाही नव्हता. शिक्षकी पेशातील त्याची सेवा दोन वर्षे शिल्लक असतांना त्याच्या संस्थेकडून त्याला पत्र मिळाले.'जातपडताळणी करुन घेणे अनिवार्य आहे. त्वरित अत्यावश्यक कागदपत्र गोळा करून आपली फाईल कार्यालयात जमा करा.' त्यात तहसिल कार्यालयातील कोटवार बुकाची नक्कल हे अत्यावश्यक कागदपत्र पकोबाने काढले. त्यावर त्याच्या जन्मतारखेची नोंद ०५ नोव्हेंबर १९६० अशी होती. ही तिसरी तारीख त्याला आश्चर्यचकित करणारी ठरली. त्याने पत्नीला ती तारीख दाखवताच तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले, अहो मी सांगत होते. तुमची आई म्हणते त्याप्रमाणं तुमचा जन्म दिवाळीच्या आसपासचाच असला पाहिजे.

आता ती तहसिलदार साहेबाची कन्या, महसूल खात्याचा पुरावा हाच तिच्या दृष्टीनं सर्वात महत्वाचा पुरावा. त्यात पकोबाची आई तेचं सांगत होती. त्यामुळं त्याच्या वयाच्या ५६ व्या वर्षी पकोबाची जन्मतारीख ०५ नोव्हेंबर १९६० निश्चित झाली. त्या तारखेवर त्याच्या गृहमंत्र्यांनं अंतिम शिक्का मारला. तेंव्हापासून त्याचा वाढदिवस ०५ नोव्हेंबरला साजरा होतो. आपल्या जन्मतारखेचा शोध लावण्यासाठी त्याला ५६ वर्षे प्रतिक्षा करावी लागली. त्याने आपल्या शाळेच्या कार्यालयात ते कागदपत्र दाखविले. त्यावर उत्तर मिळाले, आपण सेवाकालावधीच्या सुरवातीच्या पाच वर्षात हे निदर्शनास आणून द्यायला हवे होते. आता याचा काहीच उपयोग नाही. १२ जून १९६० ही तुमची जन्मतारीख ग्राह्य धरुन तुम्हाला ३० जून २०१८ या तारखेस निवृत्त व्हावे लागेलं. येणेप्रमाणे पकोबाचा सेवाकालावधी पाच महिने अगोदर समाप्त झाला. त्याच्या वयाचे ५९ वे वर्ष सुरु झाले. त्या वर्षात १२ जून ही तारीख आली. त्याच्या मुलीच्या व्हाट्सएपवर शुभेच्छा आल्या. पप्पा! खोट्या वाढदिवसाच्या खऱ्या शुभेच्छा. आज वयाच्या ६५ व्या वर्षी, १२ जून, २८ जुलै आणि ०५ नोव्हेंबर अशा वर्षातून तिन वेळा वाढदिवसाच्या शुभेच्छा आमच्या पकोबाला मिळतात. खरं सांगा आमचा पकोबा किती भाग्यवान? शिवाजी महाराजांच्या आणि त्याच्या जीवनात हे केवढे मोठे साम्य? ज्यांच्या जन्मतारखेच्या अशाच चित्तरकथा झाल्या असे किती पकोबा असतीलं किंवा होऊन गेले असतीलं? यानंतर मात्र भावी पिढ्यांच्या जन्मतारखेच्या अशा चित्तरकथा होवू नयेत. यासाठी पालकांनी जागरूक असले पाहिजे. असे या निमित्ताने सांगावसे वाटते.

# ग्रहसंकेत

**(रविवार, ८ डिसेंबर ते शनिवार, १४ डिसेंबर २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर
**ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)**

✻ **रविवार, ८ डिसेंबर-** भानुसप्तमी, संत रोहिदास पुण्यतिथी, दत्त नवरात्रारंभ, भालचंद्र महाराज पुण्यतिथी कणकवली, शिवप्रताप दिन प्रतापगड उत्सव, श्री संताजी महाराज जगदाळे जयंती ✻ **सोमवार, ९ डिसेंबर-** दुर्गाष्टमी, कल्पादि, भीम जयंती, भुजंगमहाराज पुण्यतिथी गारगोटी, सिध्दतिर्थलिंग यात्रा मुधोळ, श्री महाराणी ताराराणीसो पुण्यतिथी करवीर, श्री महालक्ष्मी यात्रा बुध ता. खटाव (सातारा), खंडोबा लंगर यात्रा वाटंबरे ता. सांगोला ✻ **मंगळवार, १० डिसेंबर-** केतेश्वर महाराज जयंती सांगली, श्री महालक्ष्मी महापूजा कोकीसरे ता. वैभववाडी, कृष्णा नदी उत्सव सांगली, बुरूड समाज सांगली ✻ **बुधवार, ११ डिसेंबर-** मोक्षदा एकादशी, गीता जयंती, खंडोबा यात्राच व मलवडी ता. दहीवडी, माणिकप्रभू उत्सव हुमणाबाद, मौनी एकादशी (जैन) ✻ **गुरुवार, १२ डिसेंबर-** स्वदेशी दिन, हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन, श्री करवीरदेव यात्रा टाकवडे शिरोळ ✻ **शुक्रवार, १३ डिसेंबर-** प्रदोष, रेणुका यात्रा यड्राव ता. शिरोळ, नवदुर्ग जत्रा कुंडई, देव ब्राम्हण जत्रा आकेरी, जनार्दनस्वामी (मौनगिरीजी) पुण्यतिथी बेटकोपरगाव जि. नगर ✻ **शनिवार, १४ डिसेंबर-** श्री दत्तात्रेय जयंती, पौर्णिमा सायं. ४.५९ नंतर, कुलधर्म, श्रीधरस्वामी जयंती, गाणगापूर क्षेत्रे श्री दत्त जयंती, भैरवनाथ यात्रा चचेगाव ता. कराड

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १४ डिसेंबर (१७ पर्यंत) ✻ **जावळ -** ८ डिसेंबर (१० पर्यंत), ११ डिसेंबर
✻ **गृहप्रवेश-** ११ डिसेंबर (१४ पर्यंत), १२ डिसेंबर (१० पर्यंत)

### मेष :- बरेच काही मिळेल

स्वतःची चूक नसताना, अपराध नसताना वाईटपणा यावा, यासारखे मोठे दुःख नाही. शुक्रवारच्या बुध- शुक्र लाभ योगामुळे या सप्ताहात आपणास बरेच काही मिळणार आहे. शनी कृपा आहे. जे-जे मनात आहे ते- ते साध्य करता येईल. थोडा धीर धरावा. फार दगदग करू नका. विश्रांतीची गरज भासेल शुभ ता. ८,१२

### वृषभः- पुढचे पाऊल

सर्व ईश्वर इच्छेने घडते. हे जेव्हा कळेल, तेव्हा आपला त्रास दूर होईल. बुध-शुक्राचा लाभयोग आपणास बरेच काही मिळवून देणारा आहे. राजकारण, समाजकारण यात पुढचे पाऊल टाकता येईल. कला गुणांचा विकास होईल. कारखानदारी, विधी, गृहनिर्माण अशा क्षेत्रात चलती प्राप्त होईल. धडाडीने रहावे. उद्दिष्ट साध्य करता येईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ८,१२

### मिथुनः- नव्या विचारांना चालना

स्वतः खुश रहा, दुसर्यांना खुश ठेवा, हेच आपल्यासाठी बेस्ट आहे. राशी स्वामी बुधाचा शुक्राशी होणारा लाभ योग अचानक पैसा मिळवून देईल. सर्व खर्च सत्कारणी कसा होईल, कसा होईल याकडे अधिक लक्ष द्यावे. कार्यक्षेत्रातील निर्णय विचाराने घ्यावेत. उत्तरोत्तर प्रगती होत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. १४

### कर्कः- प्रामाणिक राहावे

गृहक्लेश सोडल्यास आपण कोणतेही दुःख सहन करू शकतो. राशीत मंगळ आठवा शनीच्या षष्ठांगयोगात त्यामुळे सर्व काही मनासारखे घडेल, याची सध्या शाश्वती नाही. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. शिक्षण अनुभवातून प्रगती होत जाईल. प्रकृती सांभाळावी. निर्णय क्षमता वाढवावी. शुभ ता. १२, १४

### सिंहः- विचाराने रहावे

लोक दिसतात, असे नसतात म्हणून जीवनात माणसे ओळखण्यास शिका. सुखस्थ बुधाचा शुक्राशी होणारा लाभयोग सौख्य प्रधान करणारा आहे. कार्यक्षेत्रात निश्चित रहावे. अपेक्षित फलप्राप्ती होईल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणी सुटत जातील. प्रकृतीच्या तक्रारी राहतील. काळजी घ्यावी, विचाराने रहावे. शुभ ता. ८,१४

### कन्याः- मनासारख्या घटना

यशस्वी झाल्यानंतर कष्टाच्या कहाण्या कौतुकाने सांगितल्या जातात. तोपर्यंत त्या कष्टांना किंमत नसते. राशी स्वामी बुधाचा शुक्राशी होणारा लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. कामाचे नियोजन करून वाटचाल करावी. सरकारी कामे करून घ्यावीत. चिकाटीने रहावे. मनासारखी प्रगती होत जाईल, चिंता नको. शुभ ता. ८,१२

### तुलाः- नव्या कामांना गती

स्वार्थाची भावना पडयंत्राला जन्म देते. निस्वार्थी माणूस जीवनाला योग्य दिशा देतो. राशीसमोर हर्षल आल्याने विचाराने रहावे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. वैद्यकिय, संरक्षण, कृषी क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अचानक प्राप्ती वाढेल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. ८,१४

### वृश्चिकः- सौख्याच्या घटना

आपला सर्वात मोठा शत्रू आपलं अनियंत्रित मन आहे. राशीतील बुधाचा शुक्राशी होणारा लाभयोग समाधान मिळवून देणारा आहे. नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. कायद्याचा अनादर होणार नाही, याची काळजी घ्यावी. विचाराने रहावे. शुभ ता. १४

### धनुः- अडचणीतून मार्ग निघेल

चांगले कर्म करा, चांगलेच फळ मिळेल. चार दिवसांचे जीवन आनंदाने घालवावे. धनस्थ शुक्राचा बुधाशी होणारा लाभयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. नोकरी व्यवसायात मनासारखी प्रगती होईल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. गायन वादनादि कलेत प्रगती होईल. नव्या संधीचा लाभ उठवावा. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. १४

### मकरः- वादाचे प्रसंग टाळावेत

बंगला असो, अथवा झोपडे आपले घर आपलेच असते. राशीतील शुक्राचा बुधाशी होणारा लाभयोग आर्थिक कामे पटापट करणारा आहे. भागीदारीच्या व्यवसायात स्वतः अधिक लक्ष घालावे. नव्या संधी लाभतील. गृहनिर्माण, हार्डवेअर, कारखानदारी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ८

### कुंभः- उद्दिष्ट साध्य होईल

जीवनात कोण आले, कोण गेले हे महत्त्वाचे नाही. संकटात जो आपल्याबरोबर होता ते महत्त्वाचे आहे. कर्मस्थ बुधाचा शुक्राशी होणारा लाभ योग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणार आहे. नव्या कामांना गती मिळेल. संघर्षातून प्रगती साधता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. ८

### मीनः- योजना मनातच ठेवाव्या

धैर्य ठेवावे, वेळ आल्यावर आपल्याला सर्व काही मिळेल. यासाठी आपण अपार कष्ट घेतले. बुध- शुक्राचा शुक्रवारी होणारा लाभयोग एखादे असाध्य कार्य सिद्धीस नेणारे ठरेल. नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. धनस्थानी हर्षल आल्याने आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. नव्या योजना मनातच ठेवा, लगेच जाहीर करू नका. यशस्वी होतील. शुभ ता. १४

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

# ...क्या यही तेरा इन्साफ है?

१९८० च्या दशकात, त्या वेळेसचा तरुण व नवोदित अभिनेता असलेला अनिल कपूर याने 'मेरी जंग' (१९८५) चित्रपटात आपल्या निर्दोष पित्याला खटल्यात गोवून फाशीची शिक्षा देण्यास जबाबदार पाताळयंत्री वकील जी. डी. ठकराल (ही भूमिका अमरीश पुरीने फारच ताकदीने केली आहे) याचा सूड घेण्यासाठी वकील झालेल्या अरुण वर्माची भूमिका अतिशय तन्मयतेने साकारली होती, पण जनमानसात हिंदी चित्रपटातील वकील म्हणताच जी भूमिका डोळ्यासमोर उभी राहते ती म्हणजे, 'दामिनी' (१९९३) चित्रपटातील 'गोविंद श्रीवास्तव' ही अजरामर भूमिका अर्थात सनी देवल! खरोखरच कमालीचा अभिनय व अप्रतिम देहबोली!




२००० च्या दशकात नवीन सहस्रकात वकिली हा व्यवसाय म्हणून भारतात तरी उच्चभ्रू, श्रीमंत वर्गाचा व्यवसाय म्हणून बघता बघता बनला. याचे प्रतिबिंब हिंदी चित्रपटांमध्येदेखील उमटले. 'वीर-झारा' चित्रपटातील राणी मुखर्जी, 'एतराज' चित्रपटातील करीना कपूर ही वानगीदाखल काही उदाहरणे! तसे पाहिले तर स्मिता पाटीलने 'आज की आवाज' (१९८४) चित्रपटात आक्रमक वकिलाची भूमिका (रजनी देशमुख) फार तडफेने साकारली होती.

ती रेखाने 'मुझे इन्साफ चाहिये' (१९८३) मध्ये महिला अधिकारांसाठी लढणाऱ्या निर्भीड वकिलाची भूमिका केली होती तर नसिरुद्दीन शाहने 'आक्रोश' (१९८०) मध्ये अन्यायग्रस्त आदिवासी नायकास न्याय मिळवून देणारा तत्त्वनिष्ठ वकील रंगवला होता, तर भारतीय न्याय व्यवस्थेवर व्यंग्यात्मक टिप्पणी करणाऱ्या 'मोहन जोशी हाजीर हो' (१९८४) या चित्रपटात नसिरुद्दीन शाह, सतीश शाह व रोहिणी हट्टंगडी यांनी वकिलाच्या भूमिकेत धमाल केली होती. सत्य बोलण्याचा झटका आलेल्या वकिलाची विनोदी कहाणी होती ती 'क्यूं की मै झूठ नही बोलता' या चित्रपटात! नवीन सहस्रकातील सर्वोत्कृष्ट न्यायालयीन चित्रपटांचा मान जातो तो 'जॉली एलएलबी भाग-एक व भाग-दोन' या चित्रपटांकडे! हादरवून टाकणाऱ्या सत्य घटनांवर आधारित या चित्रपटांनी भारतीय न्याय यंत्रणा व तदनुषंगीक बाबींवर जो प्रकाश टाकला आहे, तो केवळ कौतुकास्पद!

विशेषतः सौरभ शुक्ला या गुणाढ्य अभिनेत्याने रंगवलेला न्यायाधीश सुंदरलाल त्रिपाठी केवळ अविस्मरणीय! अरशद वारसीने रंगवलेला वकील जगदीश त्यागी (जॉली) लक्षणीय!

बोमन इराणी व अन्नू कपूर यांनी घडवलेले बड्या वकिलांचे दर्शन थक्क करणारेच होते. बहुभाषिक 'कोर्ट' (२०१४), सशस्त्र दलातील न्यायालयांचा सुरेख धांडोळा घेणारा 'कोर्ट मार्शल' (२०२०) हे न्याय-यंत्रणेचे वास्तविक दर्शन घडवणारे काही उल्लेखनीय चित्रपट!

हिंदी चित्रपटांमध्ये वर्षानुवर्षे वकील (मुख्यत्वे सरकारी) व न्यायाधीशांच्या भूमिका करणाऱ्या ब्रह्म भारद्वाज (हे सदैव पांढऱ्याशुभ्र केसांनीच चित्रपटात दिसले), आपल्या राजबिंड्या व करारी व्यक्तिमत्त्वाने न्यायाधीशांच्या भूमिकेला एक रुबाब देणारे दया किसन सप्रू (डी. के. सप्रू) यांनी चित्रपटातील न्यायाधीशांना व वकिलांना सन्मान प्राप्त करून दिला.

एकाच खोलीत घडणाऱ्या व एक एक करत मतपरिवर्तन होत जाणाऱ्या ज्यूरींची प्रभावी कथा मांडली होती ती 'एक रुका हुवा फैसला' (१९८६) या चित्रपटात. शेवटी काय, 'खामोश! अदालत जारी है !!'

(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)



# रूचीवर्धक, पौष्टिक फळः केळ

**गरिबांपासून श्रीमंतापर्यंत सर्वांनाच आवडणारे पौष्टीक आणि रूचिवर्धक, मधुर परंतु किंमतीने स्वस्त असणारे फळ म्हणजे केळ होय.**



**आजीचा बटवा**

**नारायण कारंजकर**
**भ्र. ९४२३७५८४०१**

केळीच्या ७० पेक्षाही अधिक जाती आहेत. ही फळे बहुतेक सर्व देशात होतात. आपल्या भारतात केळीची लागवड सर्व ठिकाणी होते. गोवा, कर्नाटक ह्या प्रांतात केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. आपल्याकडे वसईची केळी प्रसिद्ध आहेत. केळ कोणत्याही ऋतुत उपलब्ध होणारे फळ असून केळीच्या झाडाच्या मुळाशी जे कोंब फुटतात ते कापून इतरत्र लावले जातात. अशा तर्हेने केळीची लागवड केली जाते. आपल्या देशातून परदेशी मोठ्या प्रमाणात केळीची निर्यात होते.

केळीचे पीठ करून टिकाऊ पदार्थ केले जातात. केळीच्या सालाचा रंग तयार करण्यासाठी चांगला उपयोग होतो. केळीच्या सालाचा क्षार कपडे धुण्यासाठी उपयोगात आणला जातो. कच्ची केळी, केळफूल, केळीचा गाभा भाजीसाठी उपयोगात आणला जातो. केळीची पाने पंक्तीत जेवणाकरता उपयोगी पडतात. विविध धर्मात केळीस महत्त्वाचे स्थान आहे. श्रीसत्यनारायणाची पूजा असो, श्रावणी सोमवाराचे उद्यापन असो अथवा श्रीमहालक्ष्मीची, हरितालिकाची पूजा असो, सर्व पूजेत केळी अवश्य असतात. दिवाळीत व्यापारी मंडळी केळीची खुंटे स्तंभाप्रमाणे पूजेच्या वेळी उपयोगात आणतात. विवाह समारंभातही केळीचे खुंट मंडपाचे प्रवेशद्वारी उभारण्यात येतात.

**विविध भाषी नावेः-**

केळास संस्कृत-कर्दली, रंभा, हिंदी-केल, कानडी-बाळे, बंगाली-केळा, इंग्रजी- फॅन्टेन बनानी, ट्री, लॅटीन- म्युसा सेपीएन्टम् (प्यॅराडीस आका) आम्लपित्त, दाह, रक्तदोष, रजोदोष, कृमि व अशी विविध भाषेत नावे आहेत.

केळफुलास इंग्रजीत प्लॅन्टेन फ्लॉवर म्हणतात. तर कच्च्या केळास 'प्लॅन्टेन ग्रीन' म्हणतात. केळात ७३.१/२ अंश जलांश, एक अंश प्रोटीन, २४.३/४ अंश कार्बोहायड्रेट असते. पिकलेले केळ मधुर आणि पौष्टीक असते. केळ पिकले की त्यात ग्लुकोज, फ्रुक्टोज, 'सूक्रोज, माल्टोज अशा चार प्रकारची साखर तयार होते. केळात अ जीवनसत्त्वाबरोबरच क जीवनसत्त्वही भरपूर प्रमाणात असते. त्यात विविध प्रकारचे अमिनो ॲसिड तर असतातच शिवाय लोह, कॅल्शियम, पोटॅशियम वगैरे खनिजेसुध्दा काही प्रमाणात असतात. आपल्याकडे फुलछाप केळी विशेष चांगली व आवडती आहेत. मधुर आणि बलवर्धक असलेल्या या केळामध्ये विविध औषधी गुणधर्म आहेत. त्यातील महत्त्वाच्या औषधी उपयोगाची माहिती आता घेऊ या...

पिकलेल्या केळांचा उपयोग खाण्यासाठी करतात. आपल्याकडे 'केळीचे शिक्रण' विशेष आवडीने खाल्ले जाते.

केळ शीतल, गुरु, वृष्य, स्निग्ध, मधुर शुक्रवर्धक, बलकर असून ते रक्तविकार मेह, क्षुधा, पित्त, योनीदोष, अश्मरी (मुतखडा) नेत्ररोग, तृष्णा यांचा नाश करते.

**केळफूल-** स्निग्ध, मधुर, तुरट, अग्निदीपक, वातनाशक आहे. क्षय, कृमि, पित्त, कफाचाही त्याने नाश होतो.

केळीचा कांदा (कर्दली कंद) रूक्ष, वातल, शीत, केश्य, रूच्च असून अग्निमांद्य, कर्णशूल, कुष्ठ यांचा नाश करतो.

**केळीचे पाणी-** शीतल, ग्राहक असून मुत्रकृच्छ मेह, तृषा, कर्करोग, अतिसार, रक्तदोष यांचा नाश करते. रानकेळीचे फळ तुरट, मधुर, गुरु असून ते शीतल, बलवर्धक, वीर्यवर्धक आहे. ते तृष्णा, दाह, शोष व पित्त यांचा नाश करते.

केळ कफकारक असून मंदाग्नि असलेल्यांनी जास्त करून खाऊ नये. ते मलबदक आहे. म्हणून ज्यांना भूक लागत नाही, अशांनी ते कमी प्रमाणातच खावे.

**विविध औषधी उपयोगः-**

शक्ती येण्यासाठी केळ महत्त्वाचे फळ आहे. पिकलेले केळ हव व मधुर आहे. ते नियमाने खाल्ले असता मनुष्याची शक्ती वाढते. ज्या पुरुषांना स्वप्नदोष असेल, ज्यांच्या शरीरातील शुक्रधातू कमी झाला असेल अशांनी रोज सकाळी व रात्री उत्तम पिकलेली दोन केळी धारोष्ण दुधाबरोबर किंवा तुपाबरोबर खावीत थोड्याच दिवसात चांगला गुण येतो. मूळव्याधीच्या रुग्णासही केळ लाभप्रद आहे. या विकारात गुदद्वारास मोड येतात. रक्त पडते. शौचास साफ होत नाही, पोटात गुबारा धरतो, अशा रुग्णांनी जेवणानंतर रोज चांगली पिकलेली केळ तुपाबरोबर खावीत. केळी केव्हाही जेवणाच्या पूर्वी खाऊ नयेत. भोजनोत्तर खावीत.

सुकवलेले कच्चे केळ व वाळवलेले कच्चे उंबर समभाग घेऊन ते चूर्ण सकाळी व संध्याकाळी दिल्यास महिलांचा रक्तस्राव व पांढरे पाणी वाहणे बंद होते. अनेकांना इसवाचा विकार असतो. इसव विशेषतः पायास होते. हा अत्यंत चिवट विकार आहे. अशा या इसवावर अत्यंत पिकलेले केळ बांधावे. केळ बांधल्यावर इसब ऊतू आल्यासारखे होते. नियमित हा उपचार केला असता इसब निश्चितच कमी होत जातो. पिकलेले केळ खाल्ल्याने अंगातील दाह कमी होतो. तहान फार लागत असेल तर केळ खावे. अरूचि (कशालाच चव न लागणे) यावर पिकलेले केळ नियमितपणे खावे. शक्यतो जेवणानंतर खावे.

केळ खाल्ल्याने मेंदूची अशक्तता दूर होऊन मेंदू तरतरीत होतो. अल्सर किंवा मधुमेह असणाऱ्यांना केळ लाभप्रद ठरते. अनेक व्यक्तींना शौचास सतत जावे लागते. त्यांनी शौचास जाऊन आल्यानंतर एक केळ खावे. त्यामुळे मल घट्ट होऊन सारखे शौचास जावे लागत नाही. शौचाचा वेग कमी होतो. कित्येकांना कृमिचा विकार असतो. अशांनी रोज निदान आठवड्यातून चार दिवस केळफुलाची भाजी जेवणात खावी. त्यामुळे पोटातील, आतड्यातील कृमी नष्ट होतात व कृमी होण्याची प्रवृत्तीही कमी होते. केळ दुधात मिसळून खाल्ल्याने लाभदायक ठरते. केळाचे सरबत खोकल्यावर रामबाण औषध असून नेत्ररोगही केळामुळे बरे होतात. स्त्रीरोगावर (अंगावरून पांढरे जाणे, कंबर दुखणे, ओठ कोरडे पडणे) केळीच्या सोपटाचा (सालाचा) रस व साखर घालून स्काळ संध्याकाळ अर्घातोळा घ्यावा. हा रस घेतल्यावर एक पिकलेले केळ व तूप एकत्र करून खावे. १५ दिवसाच्या नियमित औषधानंतर फरक पडतो. लघवीच्या कोणत्याही विकारावर गोमूत्र व केळीचे सालीचा रस वयोमानाप्रमाणे द्यावा. लघवीचे आजार त्यामुळे दूर होतात. मुत्रकृच्छावर केळी सालाचा रस अत्यंत गुणकारी आहे. काहीवेळा शरीरावराल एखादा व्रण (जखम) हाडापर्यंत जाते. त्यामुळे हाडाला अपाय होण्याची शक्यता असते. त्यासाठी केळीच्या गाभ्याचा अंगरस त्यात थोडी हळदपूड टाकून घ्यावा. उपचार करताना महिनाभर मीठ वर्ज्य करावे. लवकर व्रण बरा होतो.

केळीचा गाभा फार थंड आहे. त्यामुळे आमांश रक्तातिसार असे विकार असणारांनी केळीच्या गाभ्याची भाजी घ्यावी. कानातून पू येत असेल तर केळीच्या गाभ्याच्या पाण्याने कान धुवावा. त्यामुळे पू येणे बंद होते. केळीच्या कांद्याच्या रसात थोडासा मध घेतल्यावर वांतीवर उपयोग होते. उचकीवर- रानकेळीच्या पानांची राख एक मासा व मध एक तोळा यांचे चाटण द्यावे. सुजेवर गव्हाची कणीक व पिकलेले केळ पाण्यात कालवून ऊन करून सुजेवर बांधावे. जिभेवर खरे पडल्यास पिकलेले केळ गाईच्या दह्याबरोबर सूर्योदयापूर्वी खावे. कावीळ (कामिण) रोगावर पिकलेले केळ मधात कालवून खाण्यास द्यावे गुण येतो. केळीच्या पानावर निजल्यावर शरीरातील दाह दूर होतो. तसेच पिकलेले केळ व तूप खाल्ल्यावर पित्तरोग दूर होतो. केळीत लोह असल्याने ते पांडुरोगावर उपयुक्त आहे. उन्हाळ्यावर केळीच्या कांद्याचा रस व गोमूत्र मिसळून द्यावा. नाकातोंडातून रक्त पडत असल्यास केळीच्या सालाचे पाणी अर्धा तोळा व आवळ्याचा रस एक चतुर्थांश व उंबराचे पाणी एक तोळा त्यात थोडी साखर घालून घ्यावे. रक्त पडणे थांबते. अशक्तपणावर दररोज सकाळी एक कपभर एक दुधात केळ द्यावे. कुस्करून चामखीळवर केळीच्या खुंटाचे रसात चुना कालवून तो चामखीळीवर लावावा. चामखीळ दूर होते.

पान ४ वरून

# सीता... अभिराम भडकमकरांची

१. हे पुस्तक सलग तीनदा वाचताना पटकन मनात आले की या ना त्या कारणाने सीता अयोध्येत राहिल्याचा काळ हा सीता अयोध्येबाहेर राहिल्याचा कालावधीपेक्षा कितीतरी कमी आहे. हे वाटायला लागल्यावर असे लक्षात आले की आजही आपल्या देशाच्या उत्तर भागांत असे म्हणले जाते की दिल्ली आणि अयोध्या ही दोन शहरे अशी आहेत की या शहरांवर प्रेम करणाऱ्या, या शहरांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना या शहरांचा सहवास, निवास लाभत नाही!

२. या पुस्तकाचा मजकूर रामायणा नंतरचा काळ आठवायला लावतो असे अजून एक उदाहरण म्हणजे या पुस्तकात रावणाचे सल्लागार म्हणून छद्ममूर्ती आणि विकटकिर्ती अशी दोन काल्पनिक पात्रे प्रस्तुत पुस्तकाच्या लेखकांने रंगवली आहेत. ही नावे या पुस्तकात वारंवार येतात.

३. या पुस्तकात असूर राज्य आणि असूर वर्तनाचेही उल्लेख येतात. ते वाचताना मला सारखें जॉर्ज ओरवेलचेच- animal Farm हे पुस्तक आठवत होते... all are equal ; but some are more equal वाले!

४. या पुस्तकात एके ठिकाणी असा उल्लेख येतो की रचना बदलण्याची कल्पना मोहक असते; पण वैकल्पिक रचनेचे काय? असा उल्लेख या पुस्तकात एकदा सीतेच्या बालपणीच्या शिक्षणाचे प्रसंग सांगताना येतो आणि नंतर रामराज्य म्हणजे काय ही संकल्पना मांडताना येतो. या पुस्तकात हे संदर्भ वाचताना माझ्या व्यावसायिक आयुष्यात छझड चे काम करताना वारंवार आपले माजी पंतप्रधान कैलासवासी अटलबिहारी वाजपेयी यांनी छझड बाबत समोर आणलेले मुद्दे आठवत होते. अटलजींनी असेच वैकल्पिक रचना विशद करणारे मुद्दे त्यावेळी मांडले होते.

५. या पुस्तकात एके ठिकाणी उल्लेख आहे. विद्यावंताच्या भ्रष्टतेची किंमत समाजाला चुकवावी लागते. हा संदर्भ वाचताना कोणती सर्वपक्षीय उदाहरणे आठवत असतील याचा वेगळा सविस्तर उल्लेख करण्याची आवश्यकताच नाही.

६. शत्रूला त्याच्याच भाषेत प्रत्युत्तर देणाऱ्या राजावर प्रजानन जीव ओवाळून टाकतात असे या पुस्तकात वाचताना मनात राजा पौरस, छत्रपती शिवाजी महाराज, शास्त्रीजी, अटलजी आठवायला लागले.

७. लंकाधीपती रावण आणि त्याचे छद्ममूर्ती व विकटकिर्ती हे सहकारी यांच्यातील या पुस्तकात दिलेल्या घडामोडी वाचताना कुठेतरी आयन रँडच्या फाऊंटनहेड ही कादंबरी नजरेसमोर तरळत राहिली.

८. या पुस्तकातील एका प्रसंगात राजनीती आणि मानवी कल्याण यांची तुलना करताना आत्मियता हा पैलू घेऊन थोडी चर्चा आहे. ती चर्चा वाचताना आपल्या महाराष्ट्रात राबवली गेलेली मूळ स्वरूपातील रोजगार हमी योजना आणि त्यामागची बाळासाहेब भारदे आणि वि. स. पागे साहेबांनी त्याची केलेली तत्व चिंतनात्मक मांडणी आठवयला लागली.

९. या पुस्तकात शिवधनुष्याची चर्चा दोनदा येते.. सीतेच्या स्वयंवराचा पण म्हणून का हा पहिला प्रसंग आणि त्याबाबत नंतर सीता आणि भगवान परशुराम यांच्यात याबाबत झालेली चर्चा असा जो प्रसंग या पुस्तकात चितारला आहे त्यावेळी.

या पुस्तकातील हे दोन्हीं प्रसंग वाचताना का कोण जाणे मला फार वाटत होते की ही चर्चा आजच्या अणुबॉम्ब आणि अण्वस्त्र यांच्या उपयोगालाही तंतोतंत लागू पडणारी आहे. असा काही संदर्भ अभिराम भडकमकर सराना हे प्रसंग शब्दबद्ध करताना अभिप्रेत असतील का?

१०. या पुस्तकात एके ठिकाणी आश्रमात प्रवेश करताना नैसर्गिक स्त्रोताच्या कुंडात पदप्रक्षालन करून आत गेले असा उल्लेख आहे. मनात आले की आजही गुरुद्वारात जाताना ही पद्धत अवलंबली जातेच की! सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिरात जातानाही अशी पद्धत आहे की!

११. या पुस्तकात एके ठिकाणी भ्रमास्त्र असा शब्द आला आहे. ब्रह्मास्त्र नाही. हे वाचताना सहज मनात आले की सध्याच्या समाजमाध्यमांना हा शब्द किती मस्त लागू पडतो ना!

१२. या पुस्तकातले कित्येक प्रसंग वाचताना १९७५ साली आपल्या देशात लागू केलेली आणीबाणी आठवत होती. एके ठिकाणी राजवटी विरुद्ध वृद्ध व्यक्ती उभी राहते असा प्रसंग आहे.

त्यावेळी आणीबाणीच्या विरुद्ध उभे ठाकलेले जयप्रकाश नारायण मला आठवायला लागले. तसेच राजकारणात धारणा महत्त्वाची हा संदर्भ या ना त्या कारणाने या पुस्तकात वारंवार येतो. ते संदर्भ वाचताना स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासातील नानाविध प्रसंग मनात फेर धरायला लागतात.

१३. रामसेतूचे वर्णन या पुस्तकात प्रेमाचे अजरामर स्मारक असे जसे या पुस्तकात एकापेक्षा जास्त वेळा येते; तसेच या सेतूचे वर्णन या पुस्तकात एके ठिकाणी श्रद्धा व श्रम एकत्र आले तर काहीच असंभव नसते अशा शब्दांतही आले आहे.

हे वाचताना माझ्या नकळत माझ्या नजरेसमोर अयोध्येत राम मंदीर निर्मिती, पोखरण अणुचाचणी, कारगिल विजय, उरी सर्जिकल स्ट्राईक असे सगळे तरळत होते.

१४. या पुस्तकाच्या शेवटी शेवटी राम आणि सीता बिभीषणाला लंकेचे सेवक व्हा असे सुचवतात. ते वाचून आपले पंतप्रधान प्रधान सेवक म्हणून काम करतात हे लक्षात आले. आपल्या महाराष्ट्राचे अलिकडच्या काळातील मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे स्वतःला CM² म्हणजे chief Minister न मानता Common Man म्हणायचे ते आठवतात.

१५. केवळ शस्त्रांनी लढाई करण्याचा काळ आता संपला. लोकांच्या मनात काही धारणा निर्माण कराव्या लागतात असा किंवा या आशयाचा उल्लेख या पुस्तकात काहीवेळा आला आहे. सहजच मनात आले की यालाच हल्लीच्या परिभाषेत Narrative Set करणे म्हणतात ना?

अशी अनेक उदाहरणे देता येतील. पण थांबतो.

या पुस्तकाचे हेच यश आहे की हे विवरण राम, सीता, रामायण याच्या सारखेच त्याच्या त्याच्या काळाच्या पलीकडे जाते. या लेखनाचा समारोप करताना मला या पुस्तकात एके ठिकाणी तिचे सामर्थ्य तिच्या विचारात आहे अशा शब्दात केले आहे. माझे या पुस्तकाविषयी अत्यंत प्रांजळ मत हेच आहे की या पुस्तकाचे सामर्थ्य त्याच्या विचारात आहे.

# जीवनातील समाधान

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४४

सकारात्मकतेचे तत्वज्ञान

डॉ. नितीन ह. देशपांडे

deshapandenh@gmail.com



आनंद, सुख आणि समाधान या तीन संकल्पना एकमेकांना आतून जोडलेल्या आहेत आणि म्हणूनच त्यांना वैचारिकदृष्ट्या समजून घेण्यात स्वाभाविक गल्लत होते. या तिघांचा शोध घेण्यात आणि गवसले तर जपून ठेवण्याच्या प्रयासात अवघे आयुष्य संपून जाते. कधी सापडतात तर कधी हातून निसटतात. आनंद आणि सुख शेवटी समाधानाकडे नेतात.

एकुणातच हे नातं दिसतं त्यापेक्षा अधिक किचकट आहे. जीवनातील समाधान हे संपूर्ण आयुष्याचे मूल्यांकन असते आणि निव्वळ क्षणिक आनंद वा सुखाची पातळी नसते. संवेदना आणि स्वभाव प्रवृत्तींचे नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे केलेल्या प्रवासाचे होणारे सर्वंकष मूल्यांकन म्हणजे जीवनातील समाधान असं विधान या संकल्पनेची व्याख्या करताना बुलेटेल यांनी २००६ साली केलंय आणि ते सर्वमान्य होतंय.

**रुट विन्होवेन यांनी १९९६ साली केलेली दुसरी व्याख्या तितकीच प्रसिद्ध आहे-**

आपल्या जीवनाच्या एकूणच गुणवत्तेचं एखाद्या व्यक्तीने केलेले सखोल मूल्यमापन किंवा सोप्या शब्दात- आपण जगत असलेलं जीवन एखाद्याला कितपत आवडतं याचं त्या व्यक्तीने केलेलं तटस्थ मूल्यांकन. त्याही आधी १९८९ मध्ये एलिसन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी जीवनातील समाधानाचे वर्णन असे केले होते. सामाजिक घटकांच्या प्रभावाखाली असलेल्या मानवी आकलनाचे तुलनेनं स्थिर आणि सातत्यपूर्ण केलेलं मूल्यमापन!

या व्याख्यांमध्ये थोडा फरक अवश्य आहे पण तळाशी असलेली विचारधारा एकच आहे. जीवनातील समाधान हे व्यक्तिगत संवेदन असतं स्वतः च्या आयुष्याबद्दल आणि त्या अर्थाने ते वैश्विकही असतं कारण त्यांत मानवी जीवनाचे सार सामावलेलं असतं.

**आनंद आणि समाधान यांच्यातील फरक-**

आनंद हा तात्कालिक, क्षणिक आणि ओझरता असतो आणि तो सुखद असतो. निरामय जीवनात आनंदाचे क्षण असतातच पण निव्वळ आनंद हाच कृतार्थ आणि समाधानी जीवनाचे मोजमाप असू शकत नाही. द्योतक असू शकत नाही.

हार्वर्ड विद्यापीठातील मानसशास्त्राचे प्राध्यापक- डॅनिअल गिल्बर्ट यांच्या मते आनंद म्हणजे जे आपल्याला खुश करते. त्याचे स्वरूप क्षणभंगुर असते आणि काही घटना, कृती, विचार यांचा तात्कालिक परिणाम असतो तो !

जीवनातील समाधान केवळ स्थिर आणि दीर्घकालीन नसून त्याचा आवाका, पल्ला अधिक विस्तृत असतो. आयुष्य जसे चालले आहे तसे ते स्वीकारणे आणि त्याबद्दल समाधानी असणे हे सामान्यतः अभिप्रेत असते. त्या व्यक्तीशी संबंधित वेगवेगळ्या विचारक्षेत्रांमधून उदा. काम/व्यवसाय, नातेबंध, परिवार आणि स्वजन, व्यक्तिगत विकास, आरोग्य आणि असे इतर घटक यासाठी विचारात घेतले जातात.

**आणखी एक फरक-** जीवनातील समाधान कोठल्याही निकषांवर अवलंबून नसते. ते आकलनावर आणि ते आंतरिक निवाड्यावर तसेच विचारांती निवडलेल्या सुज्ञ घटकांवर ठरविले जाते. काही विशिष्ट बदलत्या पण सुसंगत विचारांवर ते विसंबून असते.

हे मोजमाप सामान्यतः व्यक्तिनिष्ठ असते कारण स्वतः च्या जीवनात महत्वाचे आणि अर्थपूर्ण असणारे क्षणच जीवनाच्या परिपूर्णतेची झलक असतात.जे घटक स्वतः ला पटत नाहीत, त्यांच्यावर अवलंबून राहण्यात काय हशील?

बरेचदा जीवनाची गुणवत्ता हा वाक्प्रचार आपण ऐकतो. पण ही संकल्पना ऐहिक, भौतिक विचारांशी जोडलेली असते आणि ज्याला आपण जीवनाचा स्तर (स्टँडर्ड ऑफ लिविंग) म्हणतो त्याच्याशी फटकून वागणारी असते.

समाधान मूलतः आपल्यावर अवलंबून असल्याने त्याची मोजपट्टी व्यक्तिगणिक बदलते. भावभावनांचा यामध्ये मोठा वाटा असतो. एखादी व्यक्ती दोन खोल्यांच्या घरात समाधानी असू शकते तर दुसरीला त्यासाठी महाल हा निर्देशक असावा असे वाटू शकते. प्रत्येक जण आपापले कारणीभूत ठरणारे महत्वाचे घटक निवडत असतो.

**मानसशास्त्रातील जीवनामधील समाधाना कडे बघण्याचे दोन दृष्टिकोन-**

**१) पायथ्यापासून शिखराकडे-** जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये समाधानी असलो की आपण म्हणतो- मी आता समाधानाने डोळे मिटायला मोकळा आहे. आयुष्याकडून आता काही मिळावं याची आस राहिलेली नाहीए.

**२) शिखराकडून पायथ्याच्या दिशेने-** एखाद्या विचारक्षेत्राने आयुष्याच्या समाधानावर सर्वंकष प्रभाव टाकणे. आपलं समाधान आपोआप वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांवर प्रभाव टाकते. हा दृष्टिकोन हेडी, विन्होवेन आणि विअरींग यांनी १९९१ मध्ये मांडला.

या दोन्ही दृष्टिकोनांवर वाद सुरु असतो आणि तो राहिलंच पण त्यामध्ये फारसा फरक नाहीए.

**आता एवढाच प्रश्न उरतो-** आपलं आयुष्य नेमकं कसं वाटचाल करीत असतं? त्याची यंत्रणा कितपत क्लिष्ट असते? आपण समाधानी आहोत म्हणजे काय? ते कसे ठरविले जाते? आणि मुख्य म्हणजे- आपण समाधानी नसलो तर ते कसं ठरवायचं?

जुस्सी सुईक्के या संशोधिकेने आयुष्यातील समाधानाची जी मांडणी केलेली आहे ती अतिशय मनोवेधक आहे. तिचं म्हणणं आहे. जेव्हा आपलं तर्कशुद्ध आणि माहितगार रूप आपल्याला संतुष्ट करतं तेव्हा जीवनाचं आदर्श, यथार्थ नियोजन साध्य झालंय असं मानायला हरकत नाही. मात्र या विचारसरणीला एक घटक छेद देतो, तो म्हणजे आयुष्य कसं जातंय यापेक्षा तात्कालिक, उत्स्फूर्त आनंद आपण विचारात तर घेत नाहीए नं हा आहे.

**या विषयावरील अध्ययन आणि संशोधन-**

सकारात्मकतेच्या तत्वज्ञानाने सुमारे दोन हजाराहून विषयांना स्पर्श करीत आनंद, सुख, समाधान या संकल्पना अधोरेखित केलेल्या आहेत. हे सगळे विषय मानसशास्त्रामध्ये अनेक दशके प्रचंड लोकप्रिय आहेत. यासाठी एड डिएनेर आणि सहकाऱ्यांनी केलेल्या कामगिरीपासून सुरुवात करता येईल.

एड डीएनेर आणि व्यक्तिसापेक्ष मानवी कल्याण

जगभरात एड डीएनेर आणि समाधान यांना समानार्थी संबोधिलं जातं. त्यांनी जीवनातील समाधान मोजण्यासाठी तयार केलेली मोजपट्टी ही जगभरात प्रसिद्ध आहे. १९८० पासून डीएनेर जीवनातील समाधान या विषयावर संशोधन करीत आहेत. व्यक्तिसापेक्ष मानवी कल्याण हा त्यांनीच तयार केलेला शब्दसमूह आहे. सुखसमाधानाचा निकष मोजण्यासाठी कसा वापरायचा हे त्यांनी प्रथम प्रस्थापित केले. डीएनेर असं मानतो की आयुष्यात एका टप्प्यानंतर माणसे सामान्यतः तक्रार करणे सोडून देतात आणि जे काही मिळालंय त्यांत समाधान मानण्यासाठी मनाची तयारी होत जाते. आणखी एक- समाधानाची व्याख्या व्यक्तिगणिक बदलत असल्याने ते कोठेही एका ठिकाणी बद्ध करता येत नाही आणि प्रत्येकासाठी स्वतःचे समाधान सर्वोच्च असल्याने त्या भूमिकेला ना आव्हान देता येत ना तिचा अव्हेर करता येत. त्यांनीच १९९६ साली अमेरिकेत केलेल्या एका सर्वेक्षणात असं आढळून आलं होतं की साधारण एक तृतीयांश लोकसंख्या अत्यंत समाधानी आहे आणि फक्त एक दशांश लोकसंख्येने आम्ही असंतुष्ट आहोत असं नोंदवलं.

सामान्यपणे स्वतःला खिन्नमनस्क आणि दुःखी मानणारे सुद्धा आश्चर्यकारक रित्या स्वतः किती समाधानी असतात, हेही या सर्वेक्षणाने स्थापन केले. समाधान हे वंशशास्त्रानेही मान्य केलेलं आहे. बाह्य परिस्थितीचे मानवी समाधानावर फारसे प्रभाव पडत नाहीत किंवा पडलेच तर ते फार काळ टिकत नाही. (अगदीच तो अपघात किंवा तत्सम जीवघेणा आघाताचा प्रसंग असला तर अलाहिदा). डीएनेर च्या या क्षेत्रातील विस्तृत कामाच्या आधारे मानवी जीवनात समाधानाचे चार स्तंभ मानले गेलेले आहेत-

१) पैशांपेक्षा मानसशास्त्रीय संपत्ती अधिक मोलाची असते. आपली प्रवृत्ती, ध्येयधोरणे आणि कामातील गुंतवणूक म्हणूनच महत्वाची असते.

२) समाधान फक्त संवेदनांच्या पातळीवर टिकाऊ नसते तर ते स्वास्थ्य, व्यवसाय आणि नात्यांमध्येही दिसून येते.

३) जीवनातील समाधान वास्तववादी अपेक्षांची पातळी टिकविण्यात मदत करते. कोणीही पूर्णकाळ समाधानी नसतो.

४) आपल्या आकलनाची क्षमता वाढविली की समाधान आपोआप वाढते.

**जीवनातील समाधानाचे घटक-**

जरी सगळ्या घटकांचे आकलन अजूनही झालेलं नसलं आणि जे घटक आहेत त्यांच्यातील वरचष्मा सहजी स्थापन करता येत नसला तरीही संशोधनाने चार कप्प्यांमध्ये जीवनाच्या समाधानाचे वर्गीकरण केलेले आहे.

**१) आयुष्यातील बदल-**

सामाजिक संसाधने- आर्थिक स्वास्थ्य, समानता, राजकीय इच्छाशक्ती, संस्कृती, नैतिकता याव्यतिरिक्त व्यक्तिगत घटक- समाजातील/संस्थेतील पद /स्थान, स्थावर जंगम, राजकीय प्रभाव, कौटुंबिक बंध, तंदुरुस्ती, मानसिक धैर्य आणि बौद्धिक क्षमता

**२) परिणाम करणाऱ्या घटनांचा क्रम-**

घटनांचे वार अथवा संरक्षण, सन्मान, दैनंदिन आव्हाने, कुरूप अथवा सुंदर प्रसंग. अशा घटनांचे बरेवाईट परिणाम रोज जगण्यावर होत असतात आणि त्यानुसार आपला कल बदलू शकतो. यामुळे समाधान अथवा असमाधान संभवते.

**३) अनुभवांचे प्रवाहीपण -**

वेगवेगळ्या भावनांचे ठसे आपले अनुभव बनून आपली साथ देत असतात- एकाकीपण, प्रेम, आदर, नकार, उत्साह, काळजी, सुरक्षितता वगैरे. वरील सामाजिक आणि व्यक्तिगत घटकांशी ते निगडित असतात. नदीच्या पाण्यात आता हात बुडविला आणि थोड्या वेळाने बुडविला तर दोन्ही वेळी तेच पाणी असेल असे नसते. ते थेंब पुढे निघून गेलेले असतात. पाणी असते नदीत पण प्रवाह निराळा असतो. तसेच एका घटनेला दोन वेगवेगळ्या प्रसंगी आपला प्रतिसाद भिन्न असू शकतो.

**४) आयुष्याचे सर्वंकष मूल्यमापन -**

वरील सर्व मुद्द्यांची सरासरी काढली की मूल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण होते. सध्याचे वास्तव जीवन आणि आपल्या कल्पनेतील आदर्श जीवन यांचा तुलनात्मक आढावा घेतला की बऱ्यावाईटाचा लेखाजोखा मांडता येतो.

**देशादेशांमधील समाधानाचा लेखाजोखा**

देशपरत्वे जीवनातील समाधानाचा शोध घेणाऱ्या अभ्यासांमध्ये एक घटक सामाईक आढळतो- जगण्याची अवस्था, परिस्थिती! ज्या परिस्थितीत माणसे जगतात तिचा फार मोठा प्रभाव त्यांच्या समाधानाच्या पातळीवर पडतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम देशांमधील मंडळींना तुलनेने गरीब देशातील लोकांपेक्षा सरासरी समाधान मिळते. हेलिवेल, लयार्ड आणि स्चस यांनी २०१७ साली असेही सिद्ध केले की ज्या देशांमध्ये नोकरीच्या /व्यवसायांच्या अधिक संधी उपलब्ध असतात, तेथील जनता अधिक समाधानी असते. त्यामानाने बेरोजगारी अधिक असलेल्या देशांमधील जनता अधिक असंतुष्ट असते. गरीब देशांमध्ये आय आणि व्यय यांच्यातील फरक जीवनातील समाधानावर प्रभाव टाकत असतो. तसेच समतावादी देशांमध्ये जीवन अधिक समाधानी असते. समानता मानणाऱ्या देशांमध्ये तेथील रहिवाशांना जीवनशैली निवडण्याचे अधिक स्वातंत्र्य असते, त्यांच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी अधिक पर्याय उपलब्ध असतात,

साहजिकच त्यांच्यामध्ये समाधानी वृत्ती अधिक प्रमाणात आढळते. ज्या देशांमध्ये अधिक शिकलेली मंडळी वास्तव्य करीत असतात, ती तुलनेने अधिक संतुष्ट असतात. शिक्षणाच्या संधी असतील त्याप्रमाणात जीवन समाधान वाढत जाते. मानसिक तसेच शारीरिक स्वास्थ्य, ऊर्जापातळी, समानुभूती, बहिर्मुखता या साऱ्या घटकांचा समाधानाशी जवळचा आणि घनिष्ठ संबंध असतो, हेही आता दिसून आलंय. फक्त या गोष्टी समाधानाचे कारण असतात की परिपाक का दोन्ही यामध्ये गोंधळ होऊ शकतो.

ओंजळीत मावेल एव्हढंच घ्यावं हे स्वतःला सातत्यानं बजावणं सुखकारक असतं.! समाधान हे मानण्यावर अवलंबून असते या टप्प्यावर प्रवास येऊन ठेपला की साहीर च्या भाषेत - जो भी जितना साथ दे,एहसान हैं एवढीच कृतज्ञता मागे उरते. कारण थोडा हैं थोडे की जरुरत है हेच खरं. जिंदगी फिर भी यहाँ खुबसूरत हैं हे मानलं की कोठलीही तृषा मागे उरत नाही. अपेक्षांवर नियंत्रण आणलं, आत्मसंयमाचा मार्ग धरला तर शोध आपोआप संपतात.

---

# शोध नामदेवरायांचा...

संत प्रबोधन

नितीन बोरावके

**महाराष्ट्र से आया हूँ , बाबा नामदेवजी पर पढाई कर रहा हूँ... अशी ओळख करून दिली की घुमानमधील अनेकांच्या चेहऱ्यावरील भाव बदलायचे. कोणीतरी ‘आपला’ दूरून भेटायला आल्यानंतर जसे वाटते, तशी भावना त्यांच्या बोलण्या-वागण्यातून जाणवायची. उरलेल्या पंजाबमध्येही अनेक ठिकाणी असाच अनुभव आला. ही सारी संत नामदेवांची पुण्याई होती. ते आपल्या आयुष्याची शेवटची २० वर्षे पंजाबमध्ये होते. गुरू नानकदेवांनी शीख धर्माची स्थापना करण्याआधी सुमारे २०० वर्षे त्यांनी पंजाबी समाजात समतेचे, मानवतेचे अंकुर फुलवले. आज साडेसहाशे वर्षानंतरही पंजाबी मनात असलेले त्यांचे स्थान फार मोठे आहे. ते पाहिले की, ‘नामदेवांनी शीख धर्माचा पाया घातला’ या अभ्यासकांच्या मताची मनोमन साक्ष पटते... हा थेट पंजाबमध्ये जाऊन घेतलेला नामदेवरायांचा शोध...**

पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील घुमान हे तसं गावही नाही आणि शहरही नाही...पंजाबात त्याला ऋकसबाऋ म्हणतात. मराठीत आपण बाजारपेठेचं गाव म्हणतो तसं... गावात दुकानं, दुकानांच्या वर किंवा मागे राहती घरं. ज्यांची दुकानं नाहीत त्यांची नुसतीच घरं आणि गावाभोवती लांबचलांब पसरलेली शेतं, असं हे गाव. गावातल्या प्रत्येक दुकानात आणि प्रत्येक घरात एक दाढीवाल्या बाबांचा फोटो, डोक्यारील केसांचा बुचडा बांधलेला आणि हातात जपमाळ घेतलेला. ते म्हणतात हा बाबा नामदेवांचा फोटो. पण आपल्याला हे नामदेव वेगळेच भासतात. चकाचक दाढी करून बा विठ्ठलापुढे वीणा वाजवत कीर्तन करणाऱ्या नामदेवांचा फोटो आपल्याला परिचयाचा. त्यामुळे त्यांचा हा पंजाबी अवतार पूर्णपणे अनोळखी वाटतो. पण संपूर्ण पंजाबमध्ये नामदेव याच रुपात भेटत राहतात. अगदी घुमानमध्ये जेथे बाबा नामदेवांची समाधी असल्याचं पंजाबी लोक मानतात, त्या अंतिम स्थानावरही याच रुपातील त्यांची सोन्याची प्रतिमा घडवण्यात आलीय. त्यांचा हा फोटो घुमानमधील नामदेव दरबार कमिटीने तयार केलाय. या मंदिराची देखरेख सध्या ज्यांच्या घरात आहे ते सुखबीर सिंग सांगतात की, त्या काळी फोटोग्राफी कुठे होती? पण बाबा नामदेव पंजाबात राहिले तेव्हा त्याची जीवनपद्धती एखाद्या तपस्वी साधूसारखी होती. तेव्हापासून रूढ असलेल्या बाबाजींच्या प्रतिमेवरून हे चित्र तयार करण्यात आलंय. पण आम्ही महाराष्ट्रातील बाबाजींचे चित्रही आमचं मानतो. आखिर जैसा देश वैसा वेश.

सुखबीरजींच्या या उत्तरानंतर डोक्यात विचार येतो. संत नामदेव पंजाबात जवळपास वीस वर्षं राहिले. पंजाबी भाषा शिकले. आपल्याला आजही पंजाबी भाषा सहजगत्या कळत नाही. नामदेवांनी ती त्या काळात आत्मसात केली. तिथलं हवमान, खाणं-पिणं, जगणं-वागणं सारं सारं स्वीकारलं. शेतात राबणाऱ्या कष्टकरी पंजाबी माणसांमध्ये ते विरघळून गेले. त्यांनी जर एवढे केले तर त्या काळी सर्वसामान्य पंजाबी शेतकऱ्यांचा पेहराव स्वीकारला नसणार? हळहळू फोटोतील दाढीवाल्या बाबा नामदेवांची ओळख घट्ट होऊ लागते आणि संत नामदेव ते बाबा नामदेव हा प्रवास सुरू होतो.भगत शिरोमणी नामदेव, बाबा नामदेव किंवा नुसतंच बाबाजी... अशा नावांनी पंजाबी माणूस संत नामदेवांना हाक मारतो. पण आपल्या मराठी जीभेला ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ याप्रमाणे फक्त नामदेव अशी फक्त नावाने हाक मारण्याची सवय. त्यामुळे नामदेव यहां पे आये तब..., यहां नामदेव पंजाबी सिख गये अशी हिंदी भाषांतरीत वाक्ये तोंडातून यायची. मग बोलताबोलताच लक्षात यायचे की, फक्त नामदेव असा उल्लेख इथे उद्धटपणा ठरू शकतो. मग प्रत्येक वेळी बोलताना नामदेव शब्द आला की पुढे जी जोडायचा आणि नामदेवजी करायचे. पण भाषेची ही अडचण शरीराप्रमाणे मनानेही हट्टेकट्टे असणाऱ्या नामदेवांच्या पंजाबी भक्तांनी समजून घेतली आणि नामदेवांचा हा पंजाबमधला शोध सोपा झाला.

जालंधरहून बियास, बियासवरून मेहता आणि तिथून हरगोविंदपूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर असेलेलं घुमान... घुमान नाक्यावर सायकल रिक्षावाल्याला सांगितलं बाबा नामदेवजी के गुरुद्वारा जाना है... त्याने भगत नामदेव जी यादगारी गेट असं लिहिलेल्या भव्य कमानीतून आत नेत अगदी गुरुद्वाराच्या दारावर रिक्षा उभी केली. आत शिरलो तर समोरच गुरुद्वाराचे ऑफिस दिसले. पायातले बूट उतरवून आत शिरण्याआधीच एक वयस्कर गृहस्थ सामोरे आले. ओळख करून देण्यापूर्वीच प्रेमाने म्हणाले, दूरसे आए दिखते हो. पहले पीठ से बॅग उतारो. थंडा पानी पी लो. बाद मे बात करेंगे. जणू पंजाबमध्ये वसलेले नामदेव ऋत्यांच्या महाराष्ट्रातून आलेल्या माणसाची आपुलकीने विचारपूस करताहेत असा भास झाला. ओळख करून देण्याचा कार्यक्रम झाला आणि म्हटलं, ‘आजचा दिवस इथे कुठे आसपास राहायची व्यवस्था होईल का?’ प्रश्न पूर्ण होण्याआधी उत्तर आले... ‘इधर-उधर क्यू, यहां ही रह जाओ. जितना मर्जी है उतने दिन रहो.’ लगेच ते गृहस्थ उठलेही. म्हणाले, ‘चलो’. समाधी मंदिराच्या परिसरातच यात्रेकरूंसाठी राहायची व्यवस्था केली होती, तेथील एक खोली उघडून दिली. आणि म्हणाले, ‘अब यहां सामान रखो. और जितनी पढाई करनी है, उतनी करो. आप बाबाजी के लिए काम कर रहे हो, तो आपकी मदद करना हमारा काम है’. त्यांची ही भावना पाहून मला ‘सर्वाभूतीं केशव’ असे सांगणाऱ्या नामदेवांनी इथे काय रुजवलंय त्याचं दर्शन घडलं... तेही त्यांच्या पंजाबमधल्या स्मृतिंचं दर्शन घेण्याआधीच.



‘बाबा नामदेवजी का गुरुद्वारा’ म्हणून ओळखला जाणारा हा परिसर तसा बराच मोठा आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरण्याआधी डावीकडे एक तलाव आहे. सरळ आत शिरणाऱ्या माणसाला तो पटकन दिसत नाही, मुद्दाम पाहावा लागतो. आत आल्यानंतर उजवीकडे आंघोळ करण्याची व्यवस्था आणि स्वच्छतागृहं आहेत. दर्शनाला जाण्याआधी प्रत्येकाने स्वच्छ होऊन आत जावं अशी अपेक्षा आहे. इथे गुरुद्वारा आणि मंदिर असा अनोखा संगम आहे. त्यामुळे आत उघड्या डोक्याने जाऊ नका असं सांगितलं जातं. डोक्यावर किमान रुमाल बांधा, अशी विनंती केली जाते.मंदिर परिसरात प्रवेश केल्यावर उजव्या बाजुला शुभ्र रंगातील इस्लामी पद्धतीची घुमटी दिसते. बादशाह तुघलकच्या चुलतभावानं हे मंदिर बाधलं असल्याने त्याची रचना अशा पद्धतीची आहे, असं इथल्या विश्वस्तांचं म्हणणं आहे. पायऱ्या उतरून मंदिरात शिरलो की, षटकोनी चौथऱ्यावर योगीरुपातील बाबा नामदेवांची सुवर्णप्रतिमा दिसते. त्यापुढ्यात एक शीला असून त्यावर कायम रेशमी वस्त्र पांघरलेले असते. त्याखाली पंजाबी म्हणजे गुरुमुखी लिपीत लिहिलंय... अंतिम समाधी.


नामदेवांनी या इथे अखेरचा श्वास घेतला आणि आपली इहलोकीची यात्रा संपवली, असं पंजाबी लोकांचं म्हणणे आहे. पण महाराष्ट्रात मात्र पंढरपूरातील विठ्ठल मंदिराच्या पायरीवर नामदेवांची समाधी असल्याचा विश्वास आहे. आयुष्याची अखेरची सुमारे वीस वर्षं नामदेव पंजाबात होते. तिथून फक्त समाधी घेण्यासाठी ते पंढरपूरला आले यावर त्यांच्या पंजाबी भक्तांचा विश्वास नाही. ते म्हणतात, इथेच घुमानमध्येच त्यांचं महानिर्वाण झालं. पण महाराष्ट्रातील श्रद्धेनुसार आणि रा. चि. ढेरे यांच्यासारख्या संशोधकांच्याही मतानुसार, नामदेव पंजाबमधील आपलं कार्य संपवून अखेरीस महाराष्ट्रात आले आणि त्यांनी पंढरपूरात समाधी घेतली. ज्या भागवतधर्माची पताका खांद्यावर घेऊन नामदेव पंजाबमध्ये गेले, त्या भागवतधर्माचं केंद्र असलेल्या पंढरीच्या विठ्ठलाचं अखेरीस दर्शन व्हावं, आपल्या आईची सेवा व्हावी ही नामदेवांची आस होती, असं ढेरे यांचं म्हणणं आहे. त्यासाठी ते ‘नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे, संत पाय हिरे वरी देती’ या नामदेवांच्याच अभंगासह, परिसा भागवत, गोंदा-विठा ही नामदेवांची मुलं, आदींच्या वचनांची साक्ष देतात. त्यामुळे पंजाबला निरोप देऊन नामदेव अखेर पंढरीला आले आणि समाधिस्थ झाले, हे ढेरे निसंदेहपणे मांडतात. नामदेवांच्या पुण्यतिथीच्या तारखाही पंजाब आणि महाराष्ट्रात वेगवेगळ्या आहेत. पंजाबमध्ये माघ शुद्ध द्वितीया ही पुण्यतिथी मानली जाते.

घुमानमध्ये दरवर्षी या दिवशी मोठा उत्सवही होतो. गावात जत्रा भरते, समाधी मंदिरावर रोषणाई केली जाते. पण महाराष्ट्रात मात्र आषाढ वद्य त्रयोदशी हीच नामदेवांची पुण्यतिथी म्हणून ओळखली जाते. पंजाबमधील पुण्यतिथीचे नक्की वर्ष कोणते, यावरही मतमतांतरे आहेत. पण ढेरे यांच्या मते, नामदेवांनी पंजाब सोडले तो दिवस पंजाबमध्ये त्यांचा अखेरचा दिवस म्हणून ओळखला जातो, तर महाराष्ट्रात त्यांनी समाधी घेतला तो दिवस पुण्यतिथी म्हणून पाळली जाते. असे असले, तरी पंजाबला निरोप देणे हेदेखिल नामदेवांसाठी अवघड गेले असणार. त्यामुळे त्यांनी सर्वांना न सांगता पंजाब सोडलं असेल, अशीही एक शक्यता वर्तवली जाते. पण दुसरीकडे, नामदेवांच्या अस्थी किंवा फुले पंजाबमधून महाराष्ट्रात नेऊन ती पंढरपूरच्या पायरीवर ठेऊन त्यांची समाधी उभारली असेल, असं पंजाबी भक्तांचं म्हणणं आहे. त्यामुळे नामदेवांची नक्की समाधी कोणती यावर पंजाब आणि महाराष्ट्रातील भक्तांमध्ये मतभेद आहेत, पण वाद नाही.... आणि या मतभेदामुळे त्यांच्या श्रद्धेला किंचितही बाधा पोहचत नाही. या समाधीच्या मुद्दयावर नामदेव मंदिरातील पूजेची जबाबदारी सांभाळणाऱ्या भाई काश्मीर सिंग यांना विचारले. त्यांनी दिलेले उत्तर म्हणजे खऱ्या अर्थानं, या मतभेदावर उमटवलेला समन्वयाचा पूर्णविराम आहे. ते म्हणाले की, ‘बेटा, बाबाजीकी एक कहानी सुनाता हूं. एक कुत्ता एक दिन रोटी लेके भागा. तो बाबाजी उसके पिछे घी की बाटी लेके भागे. बोले, सुखा रोटी कैसे खाओगे? बाबाजी को दुनिया के हर जीव में, हर जगह में भगवान दिखता था. अब जिसे हर जगह भगवान दिखते है, वो यहां भी हो सकते है और पंढरपूर में भी...’’

नामदेवांच्या या पंजाबमधील समाधीमंदिराच्या घुमटाच्या आतील बाजूवर त्यांच्या आयुष्यातील प्रसंग चितारण्यात आले आहेत. यात वर सांगितलेल्या कुत्र्याची गोष्टही आहे. पण आणखीही मजेशीर आणि चमत्काराने भारलेल्या गोष्टी आहेत. या गोष्टी भाई काश्मीर सिंहांनी सविस्तर सांगितल्या. महाराष्ट्रात जशा ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखे वदवलेले वेद, चालविलेली भिंत, तुकारामांचे वैंकुठगमन अशा कथा सर्वांना माहीत आहेत, तसंच नामदेवांच्या या कथा इथल्या प्रत्येकाला पाठ आहेत. या कथा ऐकताना, संतमहात्म्यामध्ये या चमत्कारांच्या गोष्टी अपरिहार्य असतात का? असा प्रश्न डोक्यात भूणभूण करत होता. पण लोकांमध्ये संतविचारापेक्षा या कथाच अधिक लोकप्रिय असतात. त्या किती खर्या किती खोट्या हे सिद्ध करण्यास कोणताच पुरावा नाही. पण या कथांमधून संत अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचले हे मात्र नाकारता येत नाही. नामदेवांच्या या कथांमधून चमत्काराचा भाग काढला तरी त्यातून त्यांच्या पंजाबमधल्या स्मृती नोंदल्या गेल्या आहे, हेही आवर्जून समजून घ्यायला हवे. याच घुमटावरील चित्रांचा संदर्भ देत काश्मीर सिंग सांगत होते, एकदा नामदेवांची लोकप्रियता पाहून दिल्लीच्या बादशाहाने त्याना दरबारात बोलावले. त्यांच्यापुढे एक मेलेली गाय आणली आणि सांगितले की, तुम्ही स्वतःला तपस्वी म्हणवता ना? मग ही मेलेली गाय जिवंत करा. नामदेवांनी बादशाहाला सांगितले, जीवन आणि मरण परमेश्वराच्या हातात आहे, माझ्या हातात नाही. या गाईला जिवंत करणं मला शक्य नाही. नामदेवांच्या या उत्तरावर बादशाह चिडला. त्याने नामदेवांना सांगितले तुम्ही गाय जिवंत केली नाहीत, तर तुम्हाला हत्तीच्या पायी देईन. नामदेव आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. अखेर राजाने पिसाळलेला हत्ती बोलावला. पण ध्यानस्थ बसलेल्या नामदेवांजवळ हत्ती आल्यावर तो शांत झाला. त्याने मारण्याऐवजी नामदेवांपुढे डोकं झुकवलं. नामदेवांची ही शक्ती पाहून राजा आवाक् झाला आणि त्याने नामदेवांची माफी मागितली.या कथेमधील हत्तीचा चमत्कार सोडला तरी, दिल्लीवरून नामदेव अमृतसरजवळच्या भूतविंड गावात आले, असे काही संशोधकांचेही म्हणणे आहे. त्यामुळे या कथांमधूनही नामदेवांच्या उत्तरेतील प्रवासाचा संदर्भ सापडतात, असंही म्हणता येतं. याच घुमटावरील चित्रांमध्ये नामदेवांची महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली औंढा नागनाथाचे मंदिर फिरवल्याच्या कथेसह बादशाहाची आणखी एक कथा चितारली आहे. काश्मीर सिंहांनी तीही कथा सांगितली. म्हणाले, एकदा बादशाहानं बाबा नामदेवांना झोपायला बिछाना पाठवला. तर बाबाजींनी समोरच्या नदीमधून हात फिरवला आणि अनेक बिछाने तरंगत येऊ लागले. ते पाहताच बाबाजी बादशाहाला म्हणाले, माझ्यासाठी अनेक बिछाने आहेत. पण माझ्यासारख्या साधकाने बिछान्याचा मोह बाळगून कसं चालेल? त्यामुळे मला तुमचा हा बिछाना नको.

नामदेवांच्या अनासक्त संन्यस्त जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी कथाकारांनी ही कथा रचली असणार, हे कोणत्याही सूज्ञ माणसाला मान्य होईल. पण या कथांनीच भारतीय संस्कृती पिढ्यानपिढ्या पुढे सोपवली आहे, हे विसरून चालणार नाही. नामदेवांच्या या चित्रमालिकेत बालपणी वाघासोबत खेळणारे नामदेव तसेच चुलीमध्ये जाऊनही काहीही न होणारे नामदेव असे चमत्कारही दाखवण्यात आले आहेत. या सर्व चित्रांमध्ये आणखीही एक चित्र आहे. ते चित्र पाहिले आणि आत खोल खोल कुठेतरी काहीतरी जाणवले... मराठी मन शहारून उठले... ते चित्र होते, विठ्ठल कीर्तनात तल्लिन झालेल्या नामदेवांचे. लहानपणापासून नामदेवांचे जे चित्र पाहत आलो ते हेच चित्र. आपण ज्या ‘आपल्या’ नामदेवांच्या शोधासाठी इथपर्यंत आलो ते हेच, ही खूणगाठ पटली आणि हात आपोआप जोडले गेले. जोडलेल्या हातांसोबत डोक्यात विचारांचे कल्लोळ सुरू होते. नामदेव जन्मले ते महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील नरसी कुठे? नामदेवांचा निजध्यास असलेले पंढरपूर कुठे? आणि नामदेवांनी आपल्या अमोघ वाणीने जिंकेलेलं पंजाब कुठे? भूगोलाच्या भाषेत पाहायचं तर सुमारे दीड हजार किलोमीटरचं हे अंतर. आजही घुमानमध्ये येण्यासाठी करावा लागणारा प्रवास खूप मोठा आहे. चौदाव्या शतकात कोणतीही दळणवळणाची साधने नसताना नामदेवांनी हा प्रवास कसा केला असेल? अशी काय प्रेरणा असेल जी त्यांना इथवर घेऊन आली. (पूर्वार्ध)

# पुन्हा 'पिग बुचरिंग स्कॅम'चा विळखा



नोंद
कैलास ठोळे
आर्थिक विषयाचे जाणकार

**ऑनलाईन फसवणुकीचा फटका 'मेटा'ला बसला आहे. 'पिग बुचरिंग स्कॅम'मुळे 'मेटा' त्रस्त आहे. 'मेटा'ने २० लाख खाती सील केली आहेत. गेल्या दोन वर्षांपासून 'पिग बुचरिंग स्कॅम' वेगवेगळ्या प्रकारामुळे चर्चेत आहे. गुंतवणूकतज्ज्ञ त्याबाबत वारंवार सावध करीत असूनही स्कॅम थांबायला तयार नाही. हा प्रकार काय आहे आणि त्याने 'मेटा' का त्रस्त आहे, याचा घेतलेला वेध.**

अनेक देशांमध्ये पिग म्हणजेच डुकराचे मांस आवडीने खाल्ले जाते. मांस मिळविवण्यासाठी डुकरांना पाळले जाते, तेव्हा त्यांना खाऊ-पिऊ घालून आधी मोठे करतात. भरपूर मांस मिळावे, हा त्यामागचा उद्देश असतो. अशाच प्रकारे 'पिग बुचरिंग स्कॅम'मध्ये स्कॅमर्स एखाद्याला मोठी रक्कम जिंकण्याचे आमिष दाखवतात. सुरुवातीला त्याला काही रक्कम जिंकू दिली जाते. रक्कम जिंकत गेल्यामुळे व्यक्तीचा हॅकर्सवर विश्वास बसतो आणि ते मोठी रक्कम गुंतवतात. यानंतर हॅकर्स कोणतीही ओळख मागे न ठेवता गायब होतात आणि मग या व्यक्तीला आपली फसवणूक झाल्याचे कळते. अशाच ऑनलाईन फसवणुकीविरुद्ध 'मेटा'ने एक मोठे पाऊल पुढे टाकले. त्यांनी 'पिग बुचरिंग' नावाच्या धोकादायक घोटाळ्यात गुंतलेली २० लाख खाती बंद केली. या घोटाळ्यात फसवणूक करणारे लोक ऑनलाईन मैत्री करून लोकांचा विश्वास जिंकतात आणि नंतर त्यांना खोट्या योजनांमध्ये पैसे गुंतवण्यास राजी करतात. या योजना अनेकदा क्रिप्टोकरन्सीशी जोडल्या जातात.

'पिग बुचरिंग स्कॅम' हे तंत्र फसवे लोक वापरतात. हे लोक लोकांचा विश्वास जिंकतात आणि हळूहळू त्यांच्याकडून सर्व पैसे घेतात. हे लोक 'सोशल मीडिया', 'डेटिंग ॲप्स' किंवा 'टेक्स्ट मेसेज'द्वारे लोकांशी संपर्क साधतात. हे घोटाळे मोठ्या गुन्हेगारी टोळ्यांद्वारे चालवले जातात. ते मुख्यतः आशियातील आहेत. या टोळ्या कंबोडिया, लाओस आणि म्यानमारसारख्या देशांमधील लोकांना नोकरीचे खोटे आश्वासन देऊन आपल्या देशात घेऊन जातात. तेथे गेल्यावर या लोकांना धमकावले आणि इतर लोकांची फसवणूक करण्यास भाग पाडले जाते. ही एक जागतिक समस्या बनली आहे.

२०२३ च्या अहवालानुसार, या टोळ्यांमध्ये सुमारे तीन लाख लोक अडकले असून या टोळ्या दरवर्षी सुमारे ६४ अब्ज डॉलर्सची चोरी करतात. फसवणूक करणारे लोक सोशल मीडिया किंवा 'डेटिंग ॲप्स'वर बनावट खाती तयार करून लोकांशी मैत्री करतात. ते हळूहळू लोकांना अडकवतात आणि विश्वास जिंकतात.

मग ते क्रिप्टोकरन्सी किंवा इतर कोणत्याही बनावट स्कीममध्ये पैसे गुंतवण्याचे महत्त्व पटवून देतात. यासाठी ते अगदी खऱ्या वाटणाऱ्या बनावट वेबसाईट्स किंवा ॲप्सचा वापर करतात. 'मेटा' गेल्या दोन वर्षांपासून या घोटाळ्यांविरोधात लढा देत आहे. यासंदर्भात संस्थेने अनेक 'एनजीओ' आणि पोलिसांसोबत काम केले आहे. प्रथम त्यांनी कंबोडियावर लक्ष केंद्रित केले; परंतु आता त्यांनी आपला तपास संयुक्त अरब अमिरातीसारख्या इतर देशांमध्ये वाढविला आहे.

'मेटा'ने लाखो बनावट खाती बंद केली असून आपल्या तपासांची माहिती शेअर केली आहे; जेणेकरून लोक या फसवणूक करणाऱ्यांच्या जाळ्यात येऊ नयेत. एका ३२ वर्षीय महिलेला टेलिग्राम चॅनलमध्ये जोडण्यात आले, तेव्हा ती त्यातील मजकूर पाहून प्रभावित झाली. गट सदस्य नियमितपणे त्यांच्या दैनिक परताव्याबद्दल पोस्ट करत. त्यांच्यामध्ये एक 'गुरू' होता. तो शेअर बाजाराचा अभ्यास करण्यासाठी स्टडी मटेरियल आणि बुकलेटसह स्टॉक टिप्स शेअर करत असे. यातून प्रेरित होऊन त्या महिलेनेही गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. काहीशे रुपयांच्या रकमेसह, त्याच्या पोर्टफोलिओने लवकरच सहा आकड्यांना स्पर्श केला आणि डॅशबोर्डनेदेखील चांगला परतावा दर्शविला. तिच्या ठेवी २५ लाखांच्या आसपास पोहोचल्या होत्या. मग अचानक असे काही घडले की, तिची संपूर्ण गुंतवणूकच नष्ट झाली. या महिलेला तिच्या सल्लागारांनी अचानक वेठीस धरले. अखेर तिला पोलिसांशी संपर्क साधावा लागला. अशा प्रकारे 'पिग बुचरिंग स्कॅम'मध्ये अडकणारी ती महिला एकटी नव्हती.

या ग्रुपमध्ये आणखी किमान २०० सदस्य होते; ज्यांच्यासोबत असेच काहीसे घडले. त्यापैकी बहुतेकांना गुंतवणूक करायची होती; परंतु शहरात सुरू असलेल्या 'पिग बुचरिंग स्कॅम' मालिकेत ते बळी ठरले. हे टेलिग्राम, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्स ॲप ग्रुपद्वारे केले जात आहे. त्याच्या फसवणुकीची कार्यपद्धती अगदी सोपी आहे. स्कॅमर चांगल्या परताव्याच्या आश्वासनांसह संभाव्य लक्ष्यांना आकर्षित करतात. आधी त्या लोकांच्या अपेक्षा वाढवतात आणि नंतर काही वेळाने खाती रिकामी करतात. गेल्या वर्षभरात दिल्ली पोलिसांनी अशी फसवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई केली.

पीडितांना आमिष दाखवून अशा १०० हून अधिक गुंतवणूक घोटाळेबाजांना पोलिसांनी अटक केली आहे; मात्र अशा प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. बनावट वेबसाईट, संशयास्पद गट आणि 'बनावट स्टॉक इन्व्हेस्टमेंट ॲप्स'च्या माध्यमातून असे गेम खेळले जात आहेत. घोटाळेबाज अनेक पायाभूत सुविधांसह संघटित असल्याचे दिसते. बनावट वेबसाईट आणि ॲप्स तयार करण्यासाठी आणि चालवण्यासाठी ऑपरेटरकडे तांत्रिक संसाधने आहेत. मेसेज पाठविणाऱ्या लोकांचाही डार्क वेबवर खरेदी केलेल्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये समावेश होतो. शेअर मार्केटमध्ये रस असलेल्यांना हे गट अडकवतात. असे फसवणूक करणारे मार्केटिंग टूल्सच्या मदतीने शेअर मार्केटमध्ये स्वारस्य असलेल्या लोकांचा माग काढतात. मग ते नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याशी संपर्क साधतात. सुरुवातीला ते जलद आणि उच्च परतावा कसा मिळवावा याबद्दल विनामूल्य स्टॉक सल्ला देतात.

या काळात शिकार पकडण्यासाठी अनेक प्रकारच्या युक्त्या अवलंबल्या जातात. जसे की मोफत प्रशिक्षण देणे, नकली फुलप्रूफ ट्रेडिंग सिस्टिम उभी करणे. यामध्ये नवोदितांवर अधिक गुंतवणूक करण्यासाठी दबाव आणणे किंवा अवास्तव परतावा देण्याचे आश्वासन देणे समाविष्ट आहे. पीडितांचा विश्वास जिंकण्यासाठी अशा गटांचे लोक अनेकदा त्यांच्या वैयक्तिक अनुभवांचे संदर्भ देऊन लोकांना अडकवतात. अनेक प्रकरणांमध्ये एजंट स्वतःला एचडीएफसी, स्टेट बँक आणि आयसीआयसीआय यांसारख्या नामांकित बँकांचे सल्लागार म्हणून सादर करतात.

या टोळीतील सदस्य अनेकदा चांगला परतावा देणारे गुंतवणुकीचे आकडे दाखवून गटातील यशोगाथा दाखवतात. ते त्यांच्या मोठ्या परताव्याबद्दल पीडितांचे अभिनंदन करतात; परंतु एकदा पैसे आले आणि पीडितेने पैसे काढण्यास सांगितले की, घोटाळेबाज ते पैसे काढून गायब होतात. कधी कधी ते पैसे काढण्यात अडचणी निर्माण करतात किंवा तांत्रिक समस्यांचा हवाला देतात. त्यामुळे लोकांना त्यांचे पैसे मिळत नाहीत. छोट्याशा चुकीमुळे मोठे नुकसान होऊ शकते. अशा टोळ्या गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यापूर्वी खोटा नफा मिळविण्यासाठी, त्यांची हेराफेरी करण्यासाठी अनियंत्रित प्लॅटफॉर्मवर काम करतात. टेलिग्राम आणि इंस्टाग्राम अशा चॅनेलने भरलेले आहेत, जेथे फसवणूक करणारे वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी सापळे रचून ठेवतात. लवकर पैसे कमावण्याच्या आशेने गृहिणी आणि सेवानिवृत्त लोक सर्वात सोपे लक्ष्य बनतात. वरवर उपयुक्त वाटणाऱ्या काही 'ॲप स्कॅमर'साठी हा फसवणूक करण्याचा एक नवीन मार्ग बनला आहे. हे घोटाळेबाज अशी ॲप्स तयार करतात, जी शैक्षणिक वाटतात आणि त्यात सावज अडकते.

अलिकडे काही ॲप्सबद्दल तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. जी काही गणिती सूत्रे शिकवण्यासाठी तयार करण्यात आली होती; परंतु घोटाळेबाजांनी त्या ॲपमध्ये काही लिंक्स टाकल्या होत्या. त्या बनावट गुंतवणूक प्लॅटफॉर्म किंवा क्लोन ट्रेडिंग ॲप्सकडे रिडायरेक्ट करत होत्या. अशा बाबी अनेकांना समजत नाहीत आणि जास्त पैसे कमावण्याच्या लोभापोटी ते त्या दलदलीत पडतात. आजच्या काळात गुंतवणुकीशी संबंधित अनेक घोटाळे होत आहेत; पण 'पिग बुचरिंग स्कॅम'बाबत अधिक काळजी घेण्याची गरज आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे यामध्ये घोटाळेबाज मोठ्या प्रमाणात पैशांचा घोटाळा करतात.

वस्तुतः अशी कोणतीही गुंतवणूक नाही, ज्यामध्ये जोखीम नसते. म्हणूनच सर्वप्रथम नफ्याची हमी देणाऱ्या कोणत्याही गुंतवणुकीपासून दूर राहावे. कोणतेही ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी नीट तपासावे. त्याच्या रेटिंगकडे लक्ष देऊन विकसकाबद्दल माहिती मिळवावी. लक्षात ठेवण्याची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या ॲपमध्ये कोणत्याही प्रकारची लिंक किंवा कोड नसावा, जो इतर कोणत्याही ॲप किंवा प्लॅटफॉर्मवर घेऊन जाईल. गुंतवणुकीचा प्रश्न येतो, तेव्हा फक्त नोंदणीकृत प्लॅटफॉर्म वापरावेत. ॲप्स आणि गुंतवणूक प्लॅटफॉर्मची वैधता दोनदा तपासावी. या जटिल आणि स्मार्ट फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी सतर्क राहणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.



# हवामान परिषदेत तोंडाला पुन्हा पाने

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

बाकू येथे झालेल्या 'कोप' २९ या जागतिक हवामान शिखर परिषदेत श्रीमंत देशांनी हवामान वित्तपुरवठा स्वरूपात दरवर्षी ३०० अब्ज डॉलर देण्याचे मान्य केले. विकसनशील देश १,३०० अब्ज डॉलर्सच्या मागणीवर ठाम होते. श्रीमंत देश आणि विकसनशील देशांमधील विवादामुळे २२ नोव्हेंबरला 'कोप २९' ची सांगता होऊ शकली नाही. परिषद आणखी दोन दिवस चालवावी लागली. ही रक्कम विकसित देशांच्या मदतीने इतर स्रोतांकडून दिली जाईल. १० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर, दोन वर्षांहून अधिक वाटाघाटी, तांत्रिक विश्लेषण आणि दोन आठवडे राजकीय सौदेबाजी आणि वादविवादानंतर, नवीन हवामान वित्त लक्ष्य (एनसीक्यूजी) वरील निर्णयाला अखेर मंजुरी मिळाली. हवामान वित्तपुरवठ्यावरून श्रीमंत आणि विकसनशील देशांमध्ये वाद सुरू आहे.

परिषदेच्या शेवटच्या दिवसांमध्ये सहभागी गटांनी नवीन लक्ष्यांमध्ये किती आणि कोणत्या प्रकारचा हवामान वित्तपुरवठा समाविष्ट केला पाहिजे यावर चर्चा केली. तथापि, अध्यक्षांनी जारी केलेला मसुदा फेटाळला. विकसनशील देशांनी जोरदार विरोध केला. सर्व श्रीमंत राष्ट्रांनी २०३५ पर्यंत विकसनशील देशांसाठी प्रती वर्ष १,३०० अब्ज डॉलरपर्यंत हवामान वित्तपुरवठा वाढविण्यास मदत करण्याचे आवाहन हा मसुदा करत होता. हा मसुदा अशा प्रकारे लक्ष्यांतर्गत संपूर्ण वित्तपुरवठा करण्याच्या श्रीमंत देशांच्या कायदेशीर दायित्वाला कमकुवत करतो. यामुळे विकसित देशांची जबाबदारी कमी होते. या मसुद्यात १०० अब्ज डॉलरचे मागील लक्ष्य २०३५ पर्यंत प्रती वर्ष ३०० अब्ज डॉलर इतके वाढविले गेले आहे. विकसित देश यामध्ये आघाडीची भूमिका बजावतील. तथापि, ३०० अब्ज डॉलरचा हा आकडा आवश्यकतेपेक्षा खूपच कमी आहे.

जी-७७ आणि चीनसह १३० हून अधिक विकसनशील देशांनी हवामान बदलाचा सामना करण्यासाठी श्रीमंत देशांकडून ६०० अब्ज डॉलरचा वित्तपुरवठा करण्याची मागणी केली होती. त्याच वेळी २०३० पर्यंत दरवर्षी १,३०० अब्ज डॉलर्सची मागणी करण्यात आली. तथापि, नंतरच्या चर्चेच्या शेवटच्या दिवसांमध्ये ही मागणी ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत कमी करण्यात आली. तज्ज्ञांच्या मते हवामान बदलामुळे होणाऱ्या भरपाईपोटी १००० ते १३०० अब्ज डॉलरची आवश्यकता असेल. या रकमेद्वारे गरजू देशांना हवामानाच्या परिणामांमुळे होणारे नुकसान हाताळण्यासाठी मदत केली जाईल. त्यांच्यासाठी प्रतिबंध, अनुकूलन उपाय केले जातील आणि स्वच्छ ऊर्जेच्या नवीन प्रणाली तयार केल्या जातील. 'यूएनएफसीसीसी'ने क्लायमेट फायनान्स गरजांवर जारी केलेल्या अहवालानुसार, विकसनशील देशांना त्यांचे हवामान लक्ष्य साध्य करण्यासाठी २०३० पर्यंत ५,०१२ ते ६,८५२ अब्ज डॉलर्सची आवश्यकता असेल. भारताने विकसनशील देशांकडून १.३ ट्रिलियन डॉलर्स मागितले. आव्हाने अजूनही प्रचंड आहेत. तथापि, केवळ रूपांतरणासाठी अर्थसाह्यातील तफावत १९४ ते ३६६ अब्ज डॉलर आहे. यावरून विकसित देशांच्या मजबूत बांधिलकीचा अभाव दिसून येतो. शेवटी जारी केलेला मसुद्याचा मजकूर निधी प्रदान करणे आणि निधी उभारणे यातील फरक स्पष्ट करीत नाही. यामुळे विकसित देशांना त्यांच्या आर्थिक जबाबदाऱ्या खासगी क्षेत्राकडे हलवता येतात. नवीन उद्दिष्ट हे विकसित देशांच्या विद्यमान सहाय्याव्यतिरिक्त असले पाहिजे किंवा नवीन योजनेंतर्गत अनुदानासाठी कोणतेही विशिष्ट लक्ष्य निश्चित केले पाहिजे याचाही त्यात उल्लेख नाही. यामध्ये स्पष्ट शब्दांचा अभाव आहे. याव्यतिरिक्त मसुद्याची कालमर्यादा लक्षात घेता विकसनशील देशांना २०३४ पर्यंत खूप कमी रक्कम मिळू शकते आणि नंतर ही रक्कम २०३५ पर्यंत ३०० अब्ज डॉलरपर्यंत वाढविली जाऊ शकते. 'कोप२९'मधील चर्चेची फेरी खूप कठीण होती. अनेक मुद्यांवर वाद इतके वाढले की, चर्चा अयशस्वी होण्याच्या जवळ आली. सर्वात कमी असुरक्षित देश (एलडीसी) आणि लहान बेट विकसनशील राज्ये (एसआयडीएस) च्या प्रतिनिधींनी २३ नोव्हेंबरच्या संध्याकाळी चर्चा सोडली. कारण चर्चा त्यांच्या गरजा आणि मागण्यांकडे लक्ष देत नव्हती. हे देश जी-७७ आणि त्यांच्या देशांसाठी विशिष्ट निधी राखून ठेवण्यासाठी भरीव वित्त लक्ष्याची मागणी करीत होते. समारोपाच्या सत्रात अध्यक्षांनी 'न्यू क्लायमेट फायनान्स टार्गेट' (एनसीक्यूजी) लाँच करण्यास अंतिम रूप दिले.

भारतीय शिष्टमंडळाने त्यावर तीव्र आक्षेप घेतला. प्रक्रियेत 'आत्मविश्वासाचा अभाव' असल्याचे कारण देत भारताने मसुद्याशी असहमती व्यक्त केली. एकूणच श्रीमंत देशांनी केवळ ३०० अब्ज डॉलरचे आश्वासन दिले आहे. कमकुवत देशांना मदत करण्यासाठी ते पुरेसे नाही. इतक्या कमी पैशात ते त्या देशांना अधिक काही करण्यास सांगू शकत नाहीत. करार अस्पष्ट असल्यामुळे पैशांचा मागोवा ठेवणे कठीण होईल. श्रीमंत देशांना पुढे जाण्याची, त्यांचा योग्य वाटा उचलण्याची आणि ज्या जागतिक प्रक्रियेत ते अयशस्वी झाले आहेत, त्यामध्ये पुन्हा आत्मविश्वास निर्माण करण्याची ही शेवटची संधी होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत 'क्लायमेट चेंज परफॉर्मन्स इंडेक्स' (सीसीपीआय) अहवालातील क्रमवारीमध्ये भारताची घसरण झाली आहे. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या ६० हून अधिक देशांच्या यादीत भारत १० व्या स्थानी आहे; मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताची यंदा दोन स्थानांनी घसरण झाली आहे. हा अहवाल बाकू येथील वार्षिक संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषद 'कोप-२९' मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

'क्लायमेट चेंज परफॉर्मन्स इंडेक्स' (सी-सीपीआय २०२५) अहवालातील पहिली तीन पदे रिक्त आहेत. हा अहवाल 'सीसीपीआय' उत्सर्जन, नवीकरणीय ऊर्जा आणि हवामान धोरणावर जगभरातील देशांच्या प्रगतीचा मागोवा घेतो. सर्वात मोठे प्रदूषक हवामान परिषदेतून गायब आहेत. 'सीसीपीआय'ने युरोपियन महासंघ आणि ६३ देशांच्या कामगिरीचे मूल्यांकन केले. ते जगातील ९० टक्के उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. भारत यंदा १० व्या स्थानावर असून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या देशांपैकी एक आहे. 'सीसीपीआय'च्या अहवालात म्हटले आहे की, ऊर्जेची वाढती मागणी आणि वाढती लोकसंख्या यामुळे भारतात हवामान बदलाशी लढण्याच्या प्रयत्नांना वेग येण्याची अपेक्षा आहे.

अहवालानुसार जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असूनही भारतामध्ये दरडोई उत्सर्जन आणि ऊर्जा वापर कमी आहे. याशिवाय हरित ऊर्जेच्या वापरात भारताने प्रगती दाखविली आहे. भारतातील एक व्यक्ती सरासरी २.९ टन कार्बन डाय ऑक्साईड समतुल्य (टीसीओ२ ई) उत्सर्जित करते. हे प्रमाण जागतिक सरासरी ६.६ टनाच्या खूपच कमी आहे. भारताच्या अधिकृत आकडेवारीवरून दिसून येते की, देशाने २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जन आणि २०३० पर्यंत ५०० गीगावॉट अक्षय ऊर्जा क्षमता साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

भारताने गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्प आणि छतावरील सौर योजनांद्वारे अक्षय ऊर्जेमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. या अहवालात भारत इलेक्ट्रिक वाहने, विशेषतः दुचाकी वाहनांच्या वापरात वेगाने प्रगती करीत असल्याचे सांगण्यात आले आहे; मात्र भारताचे कोळशावरचे अवलंबित्व हा चिंतेचा विषय आहे. अहवालानुसार भारत कोळशाचा सर्वाधिक साठा असलेल्या जगातील १० देशांपैकी एक आहे. अहवालानुसार कोणत्याही देशाने सर्व श्रेणींमध्ये रेटिंग मिळविण्यासाठी पुरेशी कामगिरी केली नाही.

जी-२० देशांबद्दल बोलायचे झाले तर भारत आणि ब्रिटन हे दोनच देश चांगली कामगिरी करीत आहेत. भारताच्या अक्षय ऊर्जा उद्योगात कुशल कामगारांची कमतरता जाणवते. यावर्षी अर्जेंटिना सर्वात वाईट कामगिरी करणाऱ्या देशांमध्ये ५९ व्या क्रमांकावर होता. अर्जेंटिनाने बाकू येथे झालेल्या 'कोप-२९'मध्ये सहभागी होण्यास नकार दिला होता. डेन्मार्क चौथ्या स्थानासह अव्वल, त्यानंतर नेदरलँड्स आणि ब्रिटन अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या स्थानावर आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वेळी ब्रिटनची कामगिरी सर्वोत्तम होती. जगातील सर्वात जास्त उत्सर्जन करणारा चीन ५५ व्या क्रमांकावर होता तर सर्वाधिक उत्सर्जन करणारा अमेरिका ५७ व्या क्रमांकावर होता. जगात सर्वाधिक तेलाचे उत्पादन करणारे देश या अहवालात तळाशी राहिले. रशिया (६४ व्या), संयुक्त अरब अमिराती (६५ व्या), सौदी अरेबिया (६६ व्या) आणि इराण (६७ व्या) तळावर राहिले. एकूणच 'कोप-२९' परिषदेला तसे मर्यादित यश मिळाले. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)




## द्रौपदी अजूनही...

महाभारतातील द्रौपदी तेव्हा तुझे झालेले
वस्त्रहरण, आजही आम्ही सांगत
असतोच अनेक व्याख्याने अन्
इतिहासातील नोंदींमधून मात्र अनेक वर्षे
झाल्यानंतरसुद्धा तुझे वस्त्रहरण रोजच होत
आहे. आजही पारधी बेड्यावरील स्त्रीला
रोजच विकल्या जाते आहे?
अनेक बेड्यावर किंवा उंच गगनचुंबी
इमारतीत दिवसाढवळ्या रोजच होत
असतात बलात्कार! आता तर लहान
मुलीसुद्धा सुरक्षित राहील याची कोणतीही
शाश्वती राहिलेली नाही तरी ते वाजवित
असतात स्त्री स्वातंत्र्याच्या गप्पा
येथे अजूनही कोणतीही स्त्री
सुरक्षित नाही खून, बलात्कार,
हिंसाचार तिच्या पाचवीलाच पुजली आहे
आपण एकविसाव्या शतकात प्रवेश करतो
आहे मात्र ती अजूनही, वेश्या व्यवसाय
करून जगते आहे, कुठे जळते आहे?
रोजच पुरुषांच्या हिंसेची बळी ठरते आहे
अहोरात्र हे मात्र सुरू आहे तरी सुद्धा ते
म्हणतात की ती सुरक्षित आहे, निर्भय आहे
पण ते अर्धसत्य आहे द्रौपदीचे वस्त्रहरण
तेव्हासुद्धा झाले होते आजही रोज होते
आहे हाच खरा प्रश्न आहे!

विष्णू सोळंके

## मन पेरणी

पावसाच्या सरींसह बुद्धी ही धुतली
जावी दूषित विचारांच्या धारा सोडाव्या
माघारी निर्मळ विचारांनी मग वाट
ती सरळ धरावी स्वच्छ प्रवाह सह मन
ओलं रहावं, आणि हृदयाला मृदुता यावी
थेंबसरींचा असा पाऊस खुशाल पडत रहावा मना
मनाला हा प्रसाद कायमच मिळत रहावा घरोघरी
जपू दे तुझ्या कृपेचा साष्टांग नमस्कार ईश्वरा
प्रसन्न हो रे देवा.

अवनी सप्रे

## पुन्हा...

हसतो आहे फसतो आहे
फुरंगटुन मी बसतो आहे!
लढतो आहे घडतो आहे ठेच लागता
अडतो आहे! पळतो आहे जळतो आहे
घाव सोसुनी कळतो आहे!
फुलतो आहे खुलतो आहे
तुटता फांदी झुलतो आहे!
हरतो आहे मरतो आहे
पुन्हा तग मी धरतो आहे!

शशी त्रिभुवन